## डॉ. नितीन मोरे



# दिलदार कजरी

# दिलदार कजरी

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# दिलदार कजरी

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १४ फेब्रुवारी २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे छप्पन्नावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# दिलदार कजरी

Dr Nitin More

9869673415, 8828070235

drnmore@yahoo.com

या कथेतील सर्व पात्रे प्रसंग व नावे काल्पनिक असून त्यांचे कोणाही वास्तविक प्रसंग वा नावांशी साधर्म्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

१

# दिलदार

त्याचे नाव दिलदारसिंग! नावाप्रमाणेच दिलदार. खरेतर एखाद्या डाकूला न शोभेल असे नाव त्याचे. दिलदार! त्याच्या जन्माच्यावेळी त्याच्या बापास, संतोकसिंगास, त्याचे पाय पाळण्यात दिसले की काय कोणास ठाऊक, भर जंगलात दिलदारने पहिला ट्यांहा केला. संतोकसिंग खूश झाला. आपल्या डाकू घराण्याचे नाव उज्वल करायला वारस मिळाला म्हणून. संतोकसिंग ठाकूर म्हणजे चंबळमधील सिनियर डाकू. रेप्युटेड म्हणावी अशी दरोडेखोरांची टोळी चालवणारा. त्याच्या क्रूरकर्मांमुळे गावागावातून प्रसिद्धीस पावलेला. नुसत्या नावानेही गावातले लोक चळचळा कापत. संतोकसिंग तसा कर्तृत्ववान. कमी वयात अंगावर टोळीची जबाबदारी येऊन पडली. संतोकसिंगाचा बाप नटवरलालसिंग एका डाक्याच्या वेळी बंदुकीची गोळी लागून गेला. त्याने देह ठेवला तेव्हा संतोक उणापुरा सोळा वर्षांचा असेल. पण आपल्या मिडिऑकर म्हणाव्या अश्या टोळीचे दिवस संतोकसिंगाने आपल्या मेहनतीचे पालटवले. जंगलात दुसरे डाकू नटवरलालसिंगच्या उदार धोरणाने सह अस्तित्व करून होते. 'खुद खाओ.. औरोंको खाने दो' असल्या समाजवादी डाकूगिरीने उत्कर्ष होऊन होऊन किती होणार? देश परदेशातून बदलाचे वारे अर्थव्यवस्थांवरून वाहू लागले तेव्हा कदाचित त्यातील एखादी झुळूक

चंबळच्या जंगलावरून वाहत गेली असावी. भांडवलशाही व्यवस्थेत खुद ज्यादा खाओ आणि इतरांना मिंधे बनवून त्यांच्याच वाटच्या चतकोर तुकड्यातील काही त्यांना उदार बनून खिलाओ अशा मताचा संतोकसिंग त्या दृष्टीने कामाला लागला. बदलती अर्थव्यवस्था.. आणि काय!

तर संतोकसिंगाने आपली दरोडेखोरी एका उंचीवर नेऊन ठेवली. काही वर्षातच त्याचे नाव सगळीकडे झाले. मेहनत आणि नियोजन यांच्या बळावर संतोकसिंगाच्या टोळीला वैभवाचे दिवस आले. डोंगरदऱ्यातून घोडेस्वारी, अचूक अशी नेमबाजी, एकदा डाका घालण्याची योजना आखली की तहान भूक हरपून ती तडीस नेण्याची जिद्द .. आणि आजोबा पणजोबांकडून वारशात संक्रमित होऊन आलेले क्रौर्य.. संतोकसिंगकडे हे सारे गुण होते. दिलदारसिंगाच्या जन्मानंतर संतोक काही दिवस थोडा स्थिरावला. मंदावला. आपल्या कुलदीपकाचे लाड करत एकाच गुहेत एखादे वर्ष त्याने काढले असेल. मग परत कामास लागला. दिलदारसिंगास डाकूगिरीचे बाळकडू पाजले गेले. लहानपणापासून खरेखुरे घोडे नि थोडा मोठा झाल्यावर खरीखुरी बंदूक त्याच्या हाती आली.. इतर शहरी नि ग्रामीण मुलांमागे असते तसे शाळेचे लचांड त्याच्या मागे नव्हतेच. त्यामुळे स्वच्छंदी वृत्तीने काही वर्षे गेली. नद्यानाल्यांतून आणि डोंगरदऱ्यांतून बागडणे.. कधी बापाच्या मागे लागून डबलसीट घोड्यावर रपेटी मारणे.. थोडा मोठा झाल्यावर मात्र संतोकसिंगाने दिलदारसिंगाला आपल्या खऱ्या जीवन शिक्षण शाळेत घेतले. खुद्द टोळीच्या सरदाराचा मुलगा म्हणून त्याची लहानपणीही अशी वट होती. म्हणजे तसा संतोकसिंगचा राजकारण्यांशी संबंध तोवर फार जवळून आलेला असे नाही, पण घराण्यातील पुढच्या पिढ्या आपोआपच आपला वारसा चालवतात एवढे त्याच्या

ध्यानी आले होतेच. तसा वारस घडवण्याची तयारी संतोकसिंगाने केली तर आपल्या देशात त्याचे आश्चर्य वाटायला नको. पण दिलदारसिंग तसा हूड होता. संतोकसिंगच्या शिक्षणात लक्ष नसलेला. बंदुकीच्या नेमबाजीपेक्षा उडती पाखरे टिपून ती भाजून खाणे यात जास्त रस असणारा. कधी कधी संतोकसिंगास आपल्या मुलाच्या भविष्याची चिंता वाटू लागे. टोळी चालवणे काही ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही. त्यासाठी हिंमत मेहनत आणि नेतृत्वगुण लागतात. एखाद्या नेत्याप्रमाणे दूरदृष्टी लागते. दिलदार तरूण होत होता. पण त्याच्या नजरेत ती चमक दिसेना. लहानपणी उडती पाखरे टिपणारा आता पक्ष्यांची ही शिकार करताना मनातून साशंक होऊ लागला तर माणसाची हत्या नि लुटालूट कशी करणार? दरोडेखोराचे काळीज कसे घट्ट आणि पाषाणाचे हवे. त्यात असे सशासारखे काळीज घेऊन दिलदार आपल्या टोळीचे लाखाचे बारा हजार करण्यास वेळ लावणार नाही .. हे हृदय असे बापाचे दिनरात्र अशा विचारात गढून जाई.

दिलदार विशीत आला नि संतोकसिंगने एक निर्णय घेऊन टाकला. डाकूगिरीचा त्याग करण्याचा.

आपल्या तंबूत तो दिलदारच्या हाती सूत्रे देण्याचे सूतोवाच करत म्हणाला,

"बेटा दिलदार, आम्ही आता थकलो आहोत. दमलो आहोत.. आमच्या हातून ही टोळी आता चालवत नाही. डोळयात प्राण असेतोवर तुम्ही ती हाती घ्या.."

"असे काय म्हणता तात? सरदार तुम्ही. आणि आम्ही तसे मनाने तयार नाही झालोत अजून."

"दिलदार, पाण्यात पडले की पोहता येतं.. आणि पाण्यात पडल्यावाचून पोहता येत नाही. आम्ही या चंबळच्या खोऱ्यात कित्येक पावसाळे पाहिले. ते ही

छत्री न घेता. नद्यांना आलेले पूर पाहिले. त्यात तुम्ही कालपर्यंत कागदी बोटी चालवायच्यात. आता बास. तुम्ही मोठे झालात. कागदी घोडे नाचवू नका. खरे घोडे दौडवा. आम्ही निवृत्त होत आहोत.."

"असे काय म्हणता तात.."

"दिलदार, सगळ्यांचे भले त्यातच आहे. तुम्ही टोळीचे मुखिया बना. आम्ही आता ही डाकूगिरी सोडून वेगळ्या पद्धतीने काम करू इच्छितो. हे लपूनछपून दरोडे घालणे आता आम्ही बंद करू.. शेवटी काय पैसाच कमवायचा.. राजरोस कमवू. आम्ही राजकारणात जात आहोत. लवकरच या प्रातांत निवडणुका होतील. आम्ही निवडून येऊ.. आणि मग असे दरोडे घालण्याची गरज नाही .."

"म्हणजे तात आम्ही पण .."

"नाही. आम्ही फक्त जात आहोत ते तुमच्या काळजीपोटी. आणि आपले वंशपरंपरागत काम सुरू राहिलेच पाहिजे. वारसा जपून ठेवलाच पाहिजे. आपल्या सात पिढ्यांची उज्ज्वल परंपरा आहे ती. तुमच्या आजोबा, पणजोबांनी आणि खापरपणजोबांनी आपल्या टोळीची बसवलेली दहशत अजून आहे. ती परंपरा चालवण्याची जबाबदारी आहे आता तुमच्यावर. पण दिवस बदलत आहेत. पूर्वी सरकारे आपल्याला वचकून असत. पण आता काही कमीजास्त झाले तर सरकार दरबारात वजन पाहिजे.."

"पण आम्हाला मनाची तयारी .."

"होईल. ज्यावेळी लुटलेल्या मालास तुमचा हात लागेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल .. मेहनतीचे फळ हे नेहमीच गोड असते. जिवावर उदार होऊन लुटलेल्या

त्या पैशांचा स्पर्श होईल तेव्हा तुम्ही अंतर्बाह्य बदलून जाल. आणि मग मनाची तयारी आपोआप होऊ लागेल .. या गोष्टीची झिंगच वेगळी. गावोगावी आपल्या नुसत्या नावालाही घाबरणारे घाबरट लोक पाहिले की आपण त्या देवाच्या खालोखाल नंबर दोन वर.. डेप्युटी देव झाल्यासारखे वाटेल. गगनास हात पोहोचतील.. आतंक पसरवणे हे आपले नीयत कर्म. डाकूधर्माचे पालन करा. अधिक काय सांगावे?"

"पण आम्हाला वाटते असे कशाला ..?"

"कशाला? तुम्ही असे विचारावे? डाकू धर्म वाढवण्यासाठी आम्ही खस्ता खाल्ल्या. जिवाची पर्वा न करता काल परवा पर्यंत घोड्यावरून दहशत फिरवत वणवण फिरलो. एका गुहेतून दुसऱ्या गुहेत भटकत राहिलो. एका ठिकाणी न थांबता ही जागोजागी फिरतीची नोकरी असावी असा व्यवसाय पकडला.. आणि तुम्ही म्हणता कशाला? आम्ही कमवून जमवून ठेवू पण ते किती वर्षे पुरेल? आणलेले दाणापाणी संपुष्टात आले की मग खाणार काय? आपण एकटे नाही. इतकी सारी डाकूंची फौज आहे सोबत. त्यांची जबाबदारी आहे आपल्यावर. डाकूधर्म सोडला तर या सगळ्यांस पोसणार कोण?"

"तात,तसं काही नाही. जो चोच देतो तो चारा देतो. जो बंदुकीच्या गोळया देतो तो बंदूक ही देईल.. किंवा जो बंदूक देतो तो गोळया ही देतो .. आम्ही डोंगरावरच्या घंटाई देवीच्या दर्शनास जाऊन आलो.."

आता संतोकसिंगास खरा पेच पडला. म्हणजे राजकारणात जाण्याबाबत नाही, तर दिलदारसिंगच्या छातीतल्या कोमल हृदयाबद्दल. घंटाईदेवी त्यांची कुलदेवता.

पण स्वतः संतोकसिंग कधी देवदेव करत बसला नव्हता. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवावा. उगाच देवाला नवस नि पूजाअर्चा यात वेळ दवडू नये असे एखाद्या संतसज्जनांनी सांगावेत असे त्याचे विचार. आणि हा दिलदारसिंग अजून करियरला सुरूवात होते न होते तो देवादिकाच्या नादी लागावा?

जे जे होईल ते पहावे.. उसासा टाकत संतोकसिंग त्यादिवशी तळमळत झोपी गेला. पुत्राबद्दलची माया नि चिंता खात असणाऱ्या पित्यास निद्रा येणार कशी. पहाटे कधीतरी डोळा लागला असावा.. स्वप्नात संतोकसिंग राजभवनात मंत्रिपदाची शपथ घेत होता. इकडे दिलदारच्या दिलात सुधारणा झालेली. घोड्याच्या टापांच्या आवाजात खांद्यावर बंदूक टाकून डाकू दिलदार शेजारच्या गावागावातून लुटालूट करत होता.. स्वप्न पहाटेचे. सत्यात येणारच.. पहाटे जाग आली तसे समाधानाने त्याने डोळे उघडले.

२.

# दिलाची हाक

आपल्या बापाने सोडलेला हुकूम ऐकून दिलदार खरेच गोंधळला. खरेतर घाबरला म्हणावे. आजवर शहरी संस्कृती त्याने पाहिली नव्हती. पण देशाची प्रगती झाली तशी गावागावातून वीज खेळू लागली. म्हणजे वीज प्रत्यक्षात ही खेळू लागली नि त्यानंतर लपंडाव ही खेळू लागली. पण सदैव भुकेल्यास खायला काहीही मिळाले तरी चालते. त्यामुळे विजेचे दिवे रात्री एक तास जरी मिणमिणता उजेड पाडत असले तरी गावे खुश होती. पाठोपाठ गावात टीव्ही पोहोचला. गावच्या चावडीवर सामायिक टीव्ही नि सामायिक कार्यक्रम दर्शनाचा कार्यक्रम होऊ लागला. गावातील वारे चंबळच्या खोऱ्यात न वाहते तरच नवल. चंबळच्या डाकूवर्गात ह्या उजेड पाडणाऱ्या दिव्यांची बात पसरली नि त्या पाठोपाठ हलती चित्रे दाखवणाऱ्या डब्याची ही. त्यानंतर गावोगावी नि चंबळच्या खोऱ्यात चित्र अजून बदलत गेले. शेजारच्या एका गावातून धान्याऐवजी टीव्ही लुटून आणला गेला. त्यात रात्रीच्या प्रहरी सगळे बसून चित्रपट पाहू लागले .. आजवर फक्त डोंगर दऱ्या बघितलेल्यांना टीव्हीतील सुखी आयुष्य दिसले, आपल्या ओबडधोबड आयुष्याऐवजी या चकचकीत आयुष्याचा हेवा वाटू लागला तर नवल नव्हते. काही थोडे टोळीकर मात्र आपल्या व्यवसायाशी इमान राखून होते. उगाच स्वत:च्या डोळ्यांनी प्रत्यक्षात कधी न पाहिलेल्या चकचकीत आयुष्याची झगमगीत स्वप्ने पाहणे म्हणजे आपल्या दरोडेखोरीच्या व्यवसायाशी नि त्यातून मिळणाऱ्या दोन घासांशी प्रतारणा .. असे

जुने जाणिते नि संतोकसिंगाचे निष्ठावान सेवक म्हणू लागले, काहींना ते पटत होते, काहींना नाही.

**आणि इकडे दिलदारसिंगच्या दिलात तर काही वेगळेच घडत होते ..**

टीव्ही आला नि त्यावरील चित्रपटांनी सगळयांवर गारूड केले. कुणाला त्यातील श्रीमंती आवडली, कुणाला त्यातील चकचकीतपणा. तो आपल्या खडबडीत आयुष्यापुढे कधी कधी जास्तच जाणवू लागला. पण दिलदारच्या दिलात बसला तो शोले.

समशेरसिंग त्याचा दोस्त. खरेतर टोळीतील एक, पण दोस्ती होती ती दोघे एकाच वयाचे म्हणून. समशेरसिंगचा बाप ही त्याच टोळीतील. संतोकसिंगचा निष्ठावान सेवक म्हणावा असा. शोले पाहून दिलदार अस्वस्थ झाला. समशेरला म्हणाला,

"यार समशेरा.."

"जी सरदार .."

"तुला कसा वाटला हा शोले?"

"खूप जुना आहे सरदार. खूप जुना चित्रपट."

"जुना असू देत. पण तुला कसा वाटला?"

आपल्याकडे ही एक पद्धत आहे. कुणाच्या हाताखालील कुणाला जर एखाद्या गोष्टीबद्दल मत विचारले तर तो आपल्या वरील जो कोणी असेल त्याच्या मताचा

आधी अंदाज घेतो. मग 'जो तुमको हो पसंद वही बात' सांगतो.. त्या पद्धतीला जागत समशेर म्हणाला,

"तसा चांगलाच आहे सरदार .."

"आणि गब्बरसिंग?"

"ठीकच आहे म्हणायचा सरदार.."

"तुला पटतो तो?"

"मला?"

"मला अजिबात नाही पटत. शेवट तर नाहीच पटत .."

"सरदार .. खरंय. तो शेवट काय बरोबर नाही."

'शेवट? सगळाच सिनेमा बरोबर नाही. त्यात जय मारला गेला, पण जिवंत असता तर एक मिळाली असती. वीरूला बसंती मिळाली. दोघे साधे चोर.. गुंड. आणि गब्बर? एवढा मोठा दरोडेखोर. त्याची अशी बेइज्जती? त्याच्यासाठी कोणीच नसावी? दरोडेखोरांचा असा अपमान? डाकू बनण्यासाठी केलेली इतकी मेहनत पाण्यात जावी? समशेरा, दरोडेखोरीला प्रतिष्ठा नाही यार .."

"सरदार, इतके मनाला लावून नाही घेऊ. सगळेच काल्पनिक. गोष्टच आहे नुसती ..एका डोळ्याने पहावी नि दुसऱ्या डोळ्याने सोडून द्यावी."

गोष्ट? एखाद्या काल्पनिक गोष्टीतही एका काल्पनिक गुंडास काल्पनिक बसंती पटावी.. आपल्याच अलाइड ब्रांच मधला तो.. ती ब्रांच मात्र काल्पनिक नाही. डाकू गब्बरसिंग पण खराखुरा. पण त्याच्यासारख्या स्पेशालिस्ट दरोडेखोरास कोणीच मिळू नये? इतकी दरोडेखोरी अप्रतिष्ठित का असावी? दिलदारासिंगाच्या मनी वैषम्य दाटून आले. काय करावे? काय करावे की अशी कोणी बसंती आपल्यालाच

मिळेल? पण इथे बसंती आहेच कुठे? आणि या डोंगरखोऱ्यात घोड्यावरून बंदुका घेऊन फिरण्यात एखादी ती सापडावी तरी कशी? नि सापडलीच ती तर आपल्यावर फिदा व्हावी ती कशी?

तारूण्यसुलभ विचारांच्या अग्नीत टीव्हीवरच्या हिंदी चित्रपटांतील प्रेमकथांचे तेल ओतले जाऊ लागले. 'वन्ही तो चेतवावा' म्हणत तो अग्नी धगधगू लागला. माणसे मारण्याहून नि लुटालूट करण्याहून ही गोष्ट जास्त भुरळ पाडू लागली.. संतोकसिंग त्याला डाकूगिरीत पुढे आणू पाहात होता, पण दिलदारसिंगच्या दिलाची हाक काही और होती. संतोकसिंग आपली राजकीय कारकीर्द घडवण्यात मग्न होता नि दिलदार आपल्या दिलाचे तगादे ऐकत काहीतरी घडवण्याच्या प्रयत्नात. अशात टोळीकडे दुर्लक्ष झाले तर नवल नव्हतेच.

.. पण टोळीचा दबदबाच इतका.. खरेतर संतोकसिंगाची पुण्याई म्हणा.. म्हणजे समाजशास्त्रात सांगितले जाते, समाज व्यवस्थित चालायचा असेल तर व्यवस्था निर्माण करा, ती सुरळीत चालली तर ती चालवणारी व्यक्ती असो वा नसो, ती तशीच चालत राहिल. संतोकसिंग कधी न शाळेत गेला, न कधी शिक्षण घेतले. पण त्याने आपल्या टोळीत ही अशी व्यवस्था लावून दिली होती. त्यामुळे त्याची टोळी एखाद्या सुनियोजित कंपनीसारखी चालली होती. सारे टोळीतले सदस्य आपापली नेमलेली कामे इमाने इतबारे करत होते. संतोकसिंगचा दबदबा कायम होता. दिलदारसिंगचे नाव अजून झाले नव्हते. खरेतर आजवर दिलदार कोणत्याच डाकू मोहिमेत सामील झाला नव्हता. अगदी उमेदवारीच्या दिवसांत ही. म्हणजे बाप संतोकसिंग मागे लागे.. प्रत्यक्ष आॅन फिल्ड ट्रेनिंग महत्त्वाचे हे सांगण्याचा प्रयत्न

करे.. पण दिलदार काही ना काही कारण सांगून ते आजवर टाळत आलेला. नाही म्हणायला लहानपणी हौस म्हणून बापाच्या घोड्यावर बसून एक दोनदा त्याने दरोडेखोरीचा अनुभव घेतलेला. लुटून आणलेल्या सामानाला हात लावून ऐटीत परतलेला. पण नंतर त्याला त्यात गंमत वाटेनासी झालेली. बडे बापका बेटा नसता तर टोळीत त्याला कुणी विचारलेही नसते. पण कित्येकदा जन्मावर गोष्टी अवलंबून असतात. खरेतर खूप काही. म्हणजे एखाद्याचा धर्म, जात, सामाजिक उतरंडीतील पायरी नि ती सांभाळून राहण्याची गरज, एखाद्याला मिळणारा किंवा न मिळणारा सन्मान .. वगैरे गोष्टी सर्व त्याच्या हातात नसलेल्या, कोणाच्या पोटी जन्म होतो यावर ठरत असतात. त्यामुळे बाकी समाजापासून फटकून असलेला हा चंबळमधील डाकूवर्ग याबाबतीत तरी मुख्य प्रवाहातच होता. आणि दिलदारसिंगला सरदार म्हणून आपला बाॅस मानत होता, जरी दिलदारसिंगला आपल्या वडिलोपार्जित व्यवसायात फारसा रस नव्हता तरीही. म्हणजे त्याला रस आधीही नव्हताच.. आणि आता तर..

दिलदारच्या दिलाचा तगादा वाढत चाललेला. दिलाची हाक काही और होती आणि वास्तव काही और. त्यात आजवर न जाणवणारी गोष्ट त्याला नव्याने जाणवू लागलेली. स्वतः दिलदारची आई.. तिला संतोकसिंगाने आपल्या बंदुकीच्या जोरावर पळवून आणलेले. जिंकून नव्हे. आजूबाजूचे साथीदार आपापल्या वकुबाप्रमाणे तसेच करताना दिसत होते. आणि इकडे चितचोर नि रजनीगंधा सारखे जुने हळुवार चित्रपट पाहून दिलदार हळवा होत होता. धाकदपटशाने असली नाती जुळवण्यात कसली आलीय गंमत? हळुवार प्रेमकथा या चंबळच्या खोऱ्यात

घडावी.. अशी की चंबळवासियांना उचंबळून यावे.. सोहनी महिवाल.. हीर रांझा सारखी दिलदार.. नि कुणाची तरी प्रेमकहाणी वर्षानुवर्षे सांगितली जावी.. पण हे घडावे कसे? आजवर गावागावातून फिरताना कुणाला पाहून 'कुछ कुछ होता है' असे काही झाले नव्हते. आणि डाकूंच्या टोळीतील कोणावर कुणी गाव की छोरी भाळेल अशी शक्यता ही नव्हती .. मग भलेही त्या रांगड्या,ओबडधोबड नि काटेरी रानटी झुडुपांसारख्यांच्या जंगलात हा रानटी का होईना पण गुलाबासारखा फुललेला कुणी असो..

दिलदार असा रानटी का होईना पण गुलाबाच्या फुलासारख्या मनाचा होता. बाहेर काटे दिसत असतील, ते आजूबाजूच्या परिस्थितीचे असतील, पण दरोडेखोरीत त्याचे कोमल मन काही रमेना. आणि यातून बाहेर पडण्याचा मार्गही काही दिसेना. सरदार संतोकसिंगचे कितीही दुर्लक्ष झाले तरी दिलदारचे मन काही या दरोडेखोरीच्या परंपरागत व्यवसायात नाही हे त्याला दिसत होतेच. अशा तरण्या वयातील कोणास काही समस्या दिसली तर लगेच त्याचे लग्न उरकून टाकायची पद्धत आपल्याकडे आहे. पण संतोकसिंग शहाणा होता. इतके पावसाळे अंगावर झेलल्याने त्याला समोर जाणवत होते.. ते एकच.. दिलदारला विवाह बंधनात अडकवणे हा काही त्यावर उपाय नाही. अर्थात त्याच्यासाठी कोणत्याही गावातून कोणालाही उचलून आणणे अशक्य तर नव्हतेच.. पण दिलदारची लक्षणे काही ठीक दिसत नाहीत .. करावे तर काय नि कसे करावे?

३.

# दिलाच्या हाकेला दिलदारचा 'ओ'

दिलाने दिलेल्या हाकेला 'ओ' देत दिलदारसिंगने पहिला निर्णय घेतला.. तो म्हणजे आधी गावच्या देवीचा आशीर्वाद घेणे.. मग गावोगावी फिरून कुठे 'कुछ कुछ होता है' का ते पाहणे. पोरं शाळा नि काॅलेजात जातात, तिथे या गोष्टींची 'सोय' आपोआप होते. पण दिलदार कधी शाळेचीही पायरी न चढलेला. त्यामुळे त्याला ही सोय नाही. त्याने कित्येक चित्रपटांतून हे ज्ञानाचे कण गोळा केलेले. शेजारील गावातल्या घंटाई देवीच्या पुढची घंटा त्याने वाजवली. डोळे मिटून हात जोडले.

समशेरसिंग बरोबर होताच..

"सरदार, तुम्ही आपला घोडा गावाबाहेर सोडून चालत आलात? हाती बंदूक ही नाही .."

"समशेर, अरे देवीच्या दर्शनास घोडा आणि बंदूक कशाला?"

दिलदार अगदी दिलदारपणे म्हणाला असेल, पण खरे कारण त्याला ठाऊक होतेच. हातातली बंदूक पाहून कुणी जवळ येऊ पाहणारी त्याला हवी असलेली देवी.. म्हणजे एखादी कन्यका घाबरून दूर पळायची. आणि घोड्यावरून कुणाला घेऊन जायचे.. वरातीतून.. तर त्या गोष्टीला वेळ आहे अजून. नवरीचाच नाही पत्ता तिथे कोणाला घोड्यावर बसवणार? वरातीआधीच घोड्यावर मिरवावे? यातले तो समशेरला काही बोलला नाही. बाकी घंटाई देवीच्या दर्शनाने काही होवो न होवो,

पण मनोमन दिलदार आपल्या डाकूगिरीचा त्याग करून बसला. ती लुटालूट, धाकदपटशा नि पैशांसाठी हाणामारी.. हे सारे कशाला? त्यापेक्षा काव्यशास्त्रविनोदात रमावे नि त्या जोरावर कुणी एखादी आपल्यावर जीव ओवाळून टाकेल.. एखाद्या चित्रपटात पहावी तशी प्रेमकथा घडून येईल. मनोमन डाकूगिरी सोडली त्याने, अर्थात मनोमन म्हणजे मनातल्या मनात! कारण ते सांगायची हिंमत त्याला होणार नाही. बापाची प्रतिक्रिया काय होईल कोणास ठाऊक. तिरीमिरीत त्याने बंदूकच उचलली तर? त्यापेक्षा थोडा धीर धरावा.. आणि आपल्या प्रेमकथेच्या जडण घडणीकडे लक्ष पुरवावे.

गद्धेपंचविशीचे वयच तसे असते.

गद्धेपणा करण्याच्या त्या दिवसांत काय करायचे नाही ते तर ठरवले, पण प्रेमकहाणी घडून येण्यासाठी काय करायचे ते ठरवावे लागेल याचा विचारही त्याच्या मनात नाही .. अशात गाणी ऐकणे नि गुणगुणत बसणे हा एक चाळाच दिलदारला लागला. दरोडेखोर, ते अस्सल. म्हणजे चंबळच्या खोऱ्यातले.. त्यांनी कसे तडकफडक संगीत ऐकावे.. कव्वाली नाहीतर तत्सम काही. तर हा गझल नि हळुवार गाणी ऐकत बसतोय.. शेरवानी घालून 'मेहबूबा मेहबूबा' गाणाऱ्या डाकूंच्या कळपात दिलदार झब्बा पायजमा घालून एखाद्या तंबोरा घेऊन बसलेल्या शास्त्रीय गायकासारखा.. हे कमी म्हणून की काय, अगदी जमेल तसे स्वतःचे शब्द शब्द जोडून कविताही करतोय.. दरोडेखोरांच्या घराण्यास न शोभेल असे सारे .. हम में है क्या कि हमें कोई हसीना चाहे.. ही संगीतमय तक्रार दिलदारच्या मनात चाललेली. संतोकसिंगच्या नजरेतून त्याचे हे बदललेले वागणे सुटले तर नव्हते, पण त्याबद्दल करावे काय हे त्यास समजत नव्हते.

जे घडावेसे वाटते त्या बद्दल अष्टोप्रहर विचार केला की ती गोष्ट घडून आल्यावाचून राहात नसावी. म्हणजे झाले असे, त्या दिवशी जवळच्या एका गावातील एका गावदेवीच्या देवळातील घंटा दिलदारने वाजवली नि देवीस आपण आल्याची वर्दी त्याने दिली. दोन्ही हात जोडून तो गाभाऱ्यात उभा राहिलेला. समशेर बाहेरच उभा होता. आणि आतून 'ती' बाहेर पडली. ती .. तिच्याकडे पाहून दिलदारच्या दिलाचे पाणी पाणी झाले. ती बाहेर आली नि तशीच काही क्षणात नाहिशी झाली. क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास जणू. देवळाबाहेरच्या मातीच्या रस्त्यावरून ती जात होती. दिलदार तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होता. आज प्रथमच देवी पावली असे वाटत होते त्याला. संमोहित झाल्यासारखा तो एकाएकी देवळातून बाहेर पडला. रस्त्यावर येता येता दोघा तिघांना त्याचा धक्का लागला .. एका मावशीच्या हातची पूजेची थाळी उधळली गेली.. एका म्हाताऱ्याची काठी त्याचा पाय अडकून हातातून सटकली. पण दिलदारसिंग सगळ्याची तमा न बाळगता पुढे निघाला .. प्यार यह सब दुनियाकी चीजें नहीं जानता म्हणत. अर्थात तोवर ती निघून नाहीशी झालेली.. पाठोपाठ समशेर दिलदारच्या मागे येत होता. आणि दिलदारला त्याची खबरबातही नव्हती. ती पूर्णपणे दिसेनाशी झाली..

"सरदार .. काय खबरबात?"

"खबर आणि बात? ती.. ती कोण होती?"

"ती? तुम्हाला काय तिचे?"

"मला काय? जवानीच्या जोशात निघालेल्या मला विचारतोस?"

"जवानी? जवानी दिवानी असेल पण ती भवानी कोण ते ठाऊक करून घ्यायचेय?"

"समशेर, मला आवडली ती.."

"छान. शेवटी हीच एक सापडली तुम्हाला?"

"का? माझ्यासारख्या तरण्याबांड जवानास ती सापडली नि आवडली.."

"सरदार, तरणाबांड वगैरे ठीक आहे, पण हे होण्यातले नाही. तुमच्याने तर नाहीच नाही .."

"का? आमच्याने का होणार नाही? आम्ही कित्येक चित्रपटांची पारायणे केलीत. आता आम्हाला काय नि कसे करावे ह्या बद्दल अंदाज आहे .."

"सरदार, तोच तर प्रश्न आहे. अंदाज आहे पण चित्रपटात जे दाखवतात ते सत्य असेल तरच .. पण ते तसे नसते. तसे नसतेच. तुम्ही हिला पाहिलेत. काही क्षणांसाठी. आता विसरून जावे."

"म्हणजे? समशेर तू ओळखतोस हिला?'

"सरदार, ही ह्या देवळाच्या पुजाऱ्याची मुलगी. कजरी. देवळातील पुजारी एका डाकूच्या टोळीत आपली मुलगी धाडेल.. तुम्हाला वाटते नि पटते ते?"

"पटते असे नाही. वाटते मात्र खरे.."

"पण तसा एक मार्ग आहे.."

"सांग. कजरी.. तिच्याइतकेच छान नाव आहे. कजरी.."

"ऐका सरदार, मार्ग एकच.. घोड्यावरून या. आजूबाजूस लूटालूट करा.. गोंधळ होईलच. त्यात वाड्यावरून उचलून कजरीभाभीला घेऊन पळून जा."

"समशेर.. तुला माहितीय असले काही मी करणार नाही."

"अर्थात सरदार, पण मार्ग एकच आहे हा. म्हणूनच म्हटले, विसरून जा. कजरीचे पिताजी मोठे भटजी आहेत. गावात मान आहे. अगदी गेलातच तुम्ही त्यांच्या घरी तर सांगणार काय? भटजीबुवा, तुमच्या गोठ्यातील गाय या घोड्याच्या तबेल्यात बांधा म्हणून?"

"ते मला ठाऊक नाही समशेर, या दिलदाराचे दिल चोरून गेली.. हे चुकीचे आहे समशेर! डाका उसने डाला. आणि डाकू म्हणून नाव आमचे. कजरी.. काहीतरी मार्ग काढ समशेर."

"सरदार, मी? मार्ग काढू? असे म्हणता जसे मी तुमच्या भाभीला घरी आणून ठेवलीय. मला माहिती असते तर.."

"तर? सांग.. कळू देत तुझी प्रेमकथा.."

"सरदार, ते जाऊ द्यात. आपल्यासारख्या डाकूंच्या आयुष्यात असले काही होत नाही. होणार नाही. उगाच नसता विचार कशाला?"

"समशेर, तूच खरा शेर. पण तूच तुझी समशेर म्यान केलीस तर नाही खैर. आता पुढे कसे होणार?"

दोन मिनिटापूर्वी दोन सेकंदासाठी दिसलेल्या पुजारी कन्यकेने, कजरीने दिलदारसिंगची दुनिया बदलवून टाकली. कजरीच्या दर्शनाने घायाळ होऊन तो

परतला. नजरोंके तीर चलाए म्हणायला तिने तर त्याच्याकडे पाहिलेही नव्हते. पण काही क्षणात असे हृदय चोरून जावे तिने. आता पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर सापडणे अशक्य. की समशेर म्हणतो तेच खरे? तिला विसरून जावे? एका पुजारी कन्येची जोडी एका डाकूपुत्राबरोबर जमेल? राजपुत्रासारखा डाकूपुत्र शब्द दिलदारला सुचला नि ह्या गोष्टीची अशक्यता जाणवून तो अधिकच अस्वस्थ झाला. दिलदारचे वागणे बोलणे बदलले. कजरीच्या विचारात तो रंगला.. दंगला. संतोकसिंगचे बारकाईने लक्ष होतेच. पण दिलदारचे कशातच ध्यान नाही .. आणि समोर होते ते स्वत:स हरवून बसलेल्या दिलदारचे ध्यान .. संतोकसिंग वैतागला. पण काय करावे कळेना. त्याच्या राजकीय कारकीर्दीची सुरूवात करावी म्हणून आटापिटा करता करता हे नवीन त्रांगडं.. अर्थात दिलदारच्या दिलाची अवस्था ह्यास कारणीभूत आहे हे त्या संतोकसिंगच्या रांगड्या मनास कळणे अशक्यच होते, पण अशा हातातोंडाशी आलेल्या जवान मुलाने असे डाकूगिरीस न शोभल असे खाली मान घालून दिवसेंदिवस बसून रहावे? आपल्या कष्टाने उभारलेल्या साम्राज्याची अशाने वाताहात होईल. आणि दिलदार असाच हातावर हात धरून बसून राहिला तर स्वकष्टाने मिळवलेली टोळीची पत निघून जाईल..

४.

# घेई छंद..!

त्या नंतर दिलदारच्या दिलाने एकच आवाज दिला.. 'कजरी कजरी.' कजरी नामात तो गुंगला, गुंतला. ध्यानी मनी स्वप्नी.. कजरी दिसू लागली. रोज सकाळ संध्याकाळ त्या देवळाकडे पाऊले पडू लागली. समशेरसिंगाने लाख समजावले पण दिलदार है कि मानता नहीं.. असे व्हायला लागले. रात्रंदिन तो ती दिसेल याच्या विचारात मग्न बसू लागला. लागले नेत्र ते कजरीतीरी असे काहीतरी. देवळाबाहेर नि देवळाच्या आत, चुकला फकीर मशिदीत सापडावा तसा दिलदारसिंग सापडायला लागला.

न राहवून समशेर सांगे,

"सरदार, तुम्ही हा नाद सोडा. ज्या गोष्टीला शेवट नाही ती अशी पुढे रेटू नका.."

"समशेर, तू माझा एकुलता एक यार, तू पण असे बोलावेस?"

"सरदार, हे धोकादायक आहे."

"प्रेमात कोणत्याही धोक्याची नाही मला परवा.."

'आज, उद्या, परवा .. नसेल परवा पण म्हणून सबंध टोळीला असे धोक्यात टाकावे? सरदार, पोलिस आपल्या टोळीचा माग काढतील अशाने .."

"टोळी? मी मनातून डाकूगिरी काढून तिथे कजरीला बसवले आहे.. या दिलदारसिंगने दरोडेखोरी नि डाकूगिरी सोडली.."

"सरदार.."

"असे ही मी एकाही डाक्यात सामील नव्हतो कधी.. शरीराने मी टोळीत होतो. मनाने कधीच नाही. सरदार म्हणून मी कधीच काहीच केले नाही .."

"पण तरीही सरदार .."

"समशेर, आज पासून मी तुझा सरदार नाही. फक्त मित्र. हे सरदारपण सोडले मी.."

"पण मोठे सरदार ..?"

"ते असतील सरदार. मी लवकरच त्यांना सारे सांगतो.."

"तुम्ही परत विचार.."

"यार.. तुम्ही वगैरे सोड.. तू म्हण.."

"पण सरदार .."

"परत सरदार? नको.. यातून काहीतरी मार्ग काढायला हवा.."

"ठीक आहे.. सरदार.. नाही दिलदार, जशी तुझी मर्जी. आता पुढे काय करणारेस तू?"

"विचार! विचार तू मला.. नि मी करतो नुसताच विचार! चार दिवस की चार महिने झाले तरी नुसता विचार .. विचार .."

"तुला मी पहिल्याच दिवशी सांगितलेले.. ज्या गोष्टीत पुढे काही घडण्यासारखे नाही अशा गोष्टी पुढे नेऊच नयेत. पण तू.. कजरीनामाचा जप करतोयस. ती तिकडे देवीच्या भजनात गुंग.. तू कजरीदेवीच्या.. विचार कर.. देवळातील भटजीबुवा तुझ्या टोळीत, नव्हे झोळीत त्यांची मुलगी देतील?"

"समशेर, ते सोडून दुसरे काहीही सांग. कजरी माझ्या दिल आणि दिमागवर येऊन बसलीय. तिकडून ती उठणार ही नाही नि जाणार ही नाही. तेवढे सोडून बोल.."

"तेवढे सोडून काय बोलू? एकतर आजूबाजूच्या टोळ्या भारी व्हायला लागल्यात. परवा त्या दिवाणसिंगानी एका गावाला लुटले. आजवर कोणाची हिंमत होती? आपले थोरले सरदार निवडणूक लढवण्यात गुंग.. तू असा.. तोळामासा झाल्यासारखा.."

"तोळामासा? नाही .. खरे तर हो.. मासा.. पाण्यावाचून मासा. कजरीबिन दिलदार .. तडपतोय. तडफडतोय.."

"आणि बडबडतोय सुद्धा. दिलदार जरा दिलावर हो उदार आणि सोड ते एकतर्फी प्रेमप्रकरण.. सरदारांना पत्ता लागला ना तर काही खरं नाही.."

"तेवढे सोडून बोल समशेर.. उनके सिवा रौनक नहीं मैफिल में .. कहता है दिलदार .. ऐ दिलवर .."

"रौनक? पहन ले ऐनक.. गा आता गाणं.. रघुपति राघव कजरी कजरी.."

समशेरच्या समजवण्यातून समजेल अशा अवस्थेत दिलदार नव्हताच. दिनरात कजरीनाम जप .. ध्यानी मनी स्वप्नी एकच ध्यास.. जेवताना ही हाती एकच घास.. जिथे तिथे एकच भास.. आणि नाही झाला भास तर भासाचा आभास.. कजरी.. कजरीची मूर्ती डोळ्यासमोर आणून दिवसरात्र बसलेला दिलदार. तरणाताठा टोळीचा प्रमुख असा बसून काढतो दिवस.. संतोकसिंगाला काय करावे ते कळेना. कजरीकथा तर त्याला ठाऊकही नव्हती. नाहीतर आतापर्यंत तिला पळवून आणणे

त्याला कठीण थोडीच होते? पण दिलदारसिंगला तिला पळवून आणायचे नव्हतेच.. तिचे हृदय पळवून आणायचे होते. त्या टीव्ही नामक डब्यातून पाहिलेल्या चित्रपटांची शिकवण म्हणा की परिणाम म्हणा.. त्याच्या प्रेमक्षुधेला हे परिमाण मिळालेले. शम्मी कपूरच्या धसमुसळेपणाहून अमोल पालेकरचे हळूवार प्रेम आवडू लागलेले. मुग्ध कजरी नि पाठोपाठ गुलाबाचे लाल फूल घेऊन तो. आजवर कोणा टोळीतल्या सदस्याने गुलाबाच्या फुलाला असे हळूवारपणे हाती घेतले नसेल. आवडले फूल की आणले तोडून .. इतके सोपे जीवन तत्वज्ञान त्यांचे. यात दिलदारसिंगसारखा कोणी अ तत्वज्ञानी त्या टोळीतच असावा .. दिलदारच्या ध्यानी मनी दिसणारी कजरी प्रत्यक्षात कमी नि स्वप्नात जास्त दिसू लागलेली. दिलदार गावाबाहेरच्या त्या देवळातल्या देवीच्या दर्शनाचे पुण्य गाठीशी बांधत होता. काही वेळा कजरी दर्शन झालेले. पण बहुतेक वेळा खरीखुरी देवीच बघून परतावे लागायचे. दिसली कजरी तरी तिच्याशी काय कसे कधी बोलावे.. दिलदारच्या दिलात हा प्रश्न सतत घर करून होता. एकाएकी तिच्यासमोर जाऊन तिला सर्व सांगून टाकावे असे वाटे त्याला, पण ते क्षणभर. अशी हिंमत आपल्यात नाही हे त्याला ठाऊक होतेच.

कजरीचे पहिले दर्शन होऊन काही महिने उलटून गेलेले. प्रेमकथेची रेका ॅर्ड एकाच ठिकाणी अडकलेली. ती पुढे सरकण्याचे नाव नाही. आणि पुढे काही होईल अशी शक्यताही नाही. पण ते वयच वेडे असते म्हणतात. त्यामुळे वेडेपणा करत दिलदार 'मैं शायर तो नहीं' म्हणत कविता करायला लागला. प्रेम माणसाला कवी बनवते म्हणतात. चंबळच्या खोऱ्यात नि डोंगरदऱ्यात आजवर त्याच्या पूर्वजांपैकी कुणी कविता लिहिली नसेल कधी. लिहायला वाचायला तर तो शिकला नव्हता,

पण त्याची कविता आतून बाहेर आपोआप पडत असावी. शब्द आपसूक तोंडातून येत होते. आणि ऐकायला, खरंतर ऐकवायला एकुलता समशेर होताच ..

"यार समशेरा, तुला कधी असे झालंय का रे?"

"असं म्हणजे कसं?'

"म्हणजे मला दिनरात तीच दिसते. तिचाच विचार चार प्रहर.."

"मला असं कसं होईल दिलदार. मला इतरही कामं असतात. लुटालुटीचा हिशेब मलाच ठेवावा लागतो दिलदार. तू सरदार पुत्र.. तुला चालते तसे मला कसे चालेल.. आणि असं व्हायला कोणी दिसली तर पाहिजे की नाही?"

"अरे, मला तर कविता सुचायला लागलीय हल्ली." "गाणं? आपल्या टोळीत अशा शब्दात कोणी गाणं लिहिलं नसणार .."

"अरे, प्रेमाची गाणी आपण लिहित नाही. प्रेमच लिहून घेतं आपल्याकडून."

"सरदार काय म्हणतील दिलदार? पण मला सांग तू खरंच कविता करतोयस?"

"अर्थात, समशेर. मी करत नाही. प्रेमच माझ्याकडून करवून घेतंय.. ऐक जरा.. जरा काव्यमय आहे.. पण समजून घे.."

"तू म्हणतोस तर ऐकावेच लागेल."

"ऐक.. मी म्हणजे एक भुंगा. भ्रमर. कजरी एखाद्या कमळाच्या फुलासारखी. होतं काय ना, कमलदलं मिटली की आत भुंगा अडकतो.. गुंततो. कमलपुष्पास हे भ्रमराचे गुंतणे ठाऊकच नाही. पण भ्रमरास तर ठाऊक आहे.. क्षणार्धात ती नाहीशी झाली पण भेटीची हुरहूर लावून.. मी अशा भुंग्यासारखा..

शोधत फिरतो मी तुला
फुलाफुलांतूनी
न दिसशी कुठेच तू
म्हणूनी उदास मी मनी

ताटव्यात त्या फुलांच्या
आहेस का सांग तू
की नभीच्या चांदण्यांत
सांग ना आहेस तू

रात दिन ध्यास तुझा
गेलो मी गुंतूनी ..

सुंदर जे दिसते मला
वाटते तू असशी तिथे
न दिसशी तू तशी
वाटते ते रिते रिते

झुरणाऱ्या या मला
देशील का संजीवनी..

भासे तुजविन सारे पोकळ
न अर्थ कुठल्या गोष्टीला
दिसशील तू हुरहूर मनी
छंद एकच तो लागला

एकदातरी दिसूनी मला
आणिशी अर्थ जीवनी ..

कशी आहे?"

"कोण? कजरीभाभी की कविता?"

"भाभी? काय कसे कधी होईल.. माहिती नाही."

"कविता चांगलीय.. पण चंबळच्या खोऱ्याने डाकूंच्या तोंडून असली शुद्ध भाषा नि कविता ऐकली नसणार.. शाळेतही न जाता शिकलास तू.."

"शिकलो नाही .. ही आतून आलेली कविता आहे. आपोआप.."

"म्हणजे आपली टोळी गावात शिरली की आपोआप सारे गावकरी गुडूप होतात.. तसे काहीतरी. पण नाही. इथे सारे शब्द बाहेर येऊन उभे राहतात. कवितेत जाऊन बसायला!"

"समशेर, तुला पण लागले की कळायला.."

"तुला सांभाळून घ्यायचे तर कळून घ्यायलाच हवे ना!"

५.

# स्वप्नात रंगला तो..

शेजारचे गाव. कजरीचे. दिवालपूर. गाव मोठे. म्हणजे खाऊन पिऊन सुखी. हिरवीगार शेते. पाण्याने भरलेली तळी. देवीचे देऊळ. त्याबाहेर पिंपळाचे मोठे झाड. त्याच्या बाजूचा पिंपळाचा पार. घोड्याच्या टापांचा दूरवरून आवाज येतो. हळूहळू वाढत जातो. पारावारचे गावकरी एकेक करून उठतात. आवाजाच्या दिशेने बघतात. मग धावाधाव सुरू होते. घोडे मातीचा धुरळा उडवत गावात भरधाव शिरतात. ही दिवाणसिंगाची टोळी. दिवालपूर लुटायला आलेली. दिवाणसिंग शेफारलाय हल्ली. त्याचे साथीदार हवेत गोळीबार करतात. गावकरी घाबरून घरात नि बाहेर चिडीचुप शांतता. दिवाणसिंगाची माणसं इकडेतिकडे मोकाट सुटतात. सगळीकडे धूळच धूळ. मग दिवाणसिंग स्वतः देवीच्या देवळामागच्या घरात शिरतो. कजरी त्याच्या नजरेतून सुटलेली नाही. तशी कोणाच्या नजरेतून सुटावी अशी नाहीच आहे ती. पुजारी कापत उभा आहे. बंदुकीच्या टोकावरून दिवाणसिंग कजरीला उचलतो.. आपल्या घोड्यावर पुढ्यात टाकून निघतो.. मोहिम फत्ते झाली.. समाधानाने कजरीला सांगतो..

"चिंता मत करना.. तुम्हें रानी बनाकर रखूंगा.."

एकाएकी बंदुकीची एक गोळी दिवाणसिंगाच्या कानाजवळून सुर्रकन जाते.. घोडा बुजून एकाएकी थांबतो.. मग टाच मारल्यावर पुन्हा धावू लागतो.

दिवाणसिंगामागे काही जण लागलेत. दिवाणसिंग घोडं दामटतोय. गोळीबार होतोय.. सगळीकडे टापांचा आवाज. शेवटी दिवाणसिंगाचा घोडा पाय घसरून पडतो. पाठोपाठ तो आणि कजरीदेखील. पाठून दिलदार आपल्या घोड्यावरून पोहोचतो.. दिवाणसिंगच्या दिशेने दोन गोळया झाडतो. दिवाणसिंगकडे न पाहता शिताफीने कजरीला उचलून घोड्यावर घालून परत निघतो. भरधाव. घोड्यावर स्वार असताना विचारचक्र सुरू आहे.. तिचे मन जिंकायचे तर काय करावे? आपल्या गुहेत घेऊन यावे की तिच्या घरी सुखरूप पोहोचवून सगळयांची मने जिंकावीत? त्याचा निर्णय होत नाही. कजरीला तो तिच्या घरी सोडतो .. ही घ्या तुमची ठेव परत म्हणत पुजारीबुवाच्या पाया पडतो.. एकदम ओठांवर नुकताच ऐकलेला डायलाॅग येतो.. 'हमें आशीर्वाद देना पिताजी..' कजरी त्यापाठोपाठ पाया पडते.. नि लाजते..

दिलदारसिंगचे डोळे उघडले तेव्हा समोर समशेर उभा होता.

"काय दिलदार.. स्वप्न वाटतं.. कजरीभाभी वाटतं स्वप्नात आलीय. हसतोयस तोंड फाड फाडून.."

दिलदार एकाएकी भानावर आला. दिवाणसिंग नि त्याचा डाका नि कजरीला पुढ्यात घालून आणलेली.. स्वप्नच सारे.. पण सकाळ सकाळी पडलेले. ते खरे व्हायला पाहिजे.

"यार समशेर.. काय स्वप्न पाहिलं सांगू .. कजरीला घोड्यावरून घेऊन आलो.. त्या दिवाणसिंगाच्या तावडीतून.."

"तू नुसती स्वप्नं पाहात बस.. मला कामं आहेत. कालच्या धाडीचा हिशेब करायचा आहे. आणि काल आपल्या त्या गुलजारसिंगानी एकीला उचलून आणलीय. त्या लक्ष्मणगढमधून. त्याची खबरबात घ्यायचीय. तू बस इथे.. मी निघतो."

समशेरसिंग निघून गेला. दिलदार विचार करत तसाच पडून राहिला. पुढे काय करायचे नि काय होणार? तसे कजरीला जबरदस्ती पळवून आणणे कठीण नाही, गुलजारसिंगने कसे एक घाव दोन तुकडे सारखे केलेय.. पण दिलदारच्या दिलास ते पटत नाही. ही डाकूगिरीच पटत नाही त्याला. ताकदीच्या बळावर लुटालूट एकवेळ ठीक पण माणसाच्या हृदयास लुटणे कसे शक्य आहे? पण त्याच्या कजरीस कोणी पळवून नेले तर? त्याआधी काहीतरी केले पाहिजे. एकाएकी त्याला वाटले, समशेरसिंगाला सांगून खोटा डाका घालावा. कुणी कजरीला उचलून पळू जाऊ लागले की दिलदारने जिवावर उदार होऊन तिला वाचवावे नि तिच्या दिलाचे दार त्याच्यासाठी उघडून घ्यावे.. ह्या विचाराने तो उठला. समशेर तोवर आपल्या कामासाठी निघून गेलेला. नंतर असे काही शक्य आहे का ते पाहू म्हणत ओढाळ वासरू गायीकडे जावे तसा दिलदार उठून परत आपसूक त्या देवळाकडे निघाला.

आज देवळात सगळीकडे सजावट नि रोषणाई होती. माणसांची लगबग सुरू होती. पाठून सनईचा आवाज येत होता. इकडेतिकडे सगळीकडे घाई गर्दीचा माहोल होता. माणसं येत जात होती. लगीनघाई जणू. शेवटचा लगीनघाईचा विचार मनात आला नि दिलदार चपापला. कजरीचेच तर नसावे शुभमंगल? या विचाराने तो

अस्वस्थ झाला. बरोबर समशेरपण नव्हता सगळ्या बित्तंबातम्या द्यायला. पण त्याला कजरी विवाहाबद्दल माहिती असती तर तो आधीच बोलला असता. त्यातल्या त्यात दिलदारला धीर आला.. बाजूला उभा राहून निमूटपणे तो पाहू लागला. वातावरण लग्नाचेच होते. देऊळ म्हटले की गावातील कोणाचेही असू शकते लग्न.. कजरीचेच कशाला? पण मन चिंती ते वैरी न चिंती.. दिलदार उगाच येरझाऱ्या घालू लागला.. कोणाला तरी विचारावे कोणाचे लग्न आहे असा विचार करून तो पुढे झाला. अर्ध्या तासभर फेऱ्या मारून धैर्य एकवटल्यावर विचारून मिळालेली माहिती ऐकून तो मटकन खाली बसला.. पुजाऱ्याच्याच मुलीचा विवाह समारंभ होता तो. भर मंडपातून तिला पळवून नेणे सोडून आता उपाय दिसत नव्हता, पण पळवून नेणे दिलदारच्या उदार दिलास पटत नि परवडत नव्हते. आता शुभमंगल झाले की डोक्यावर अक्षता टाकू नि हा अध्याय समाप्त करू म्हणत दिलदार तसाच बसून राहिला. कजरी विवाह घटिका समीप येत होती नि दिलदारच्या धडधाकट दिलाची धडधड धडाधड वाढत चालली होती.. आता ते धडधाकट दिल धड चालेल याची शाश्वती नाही म्हणत तो मटकन बसलेला ..

खरेतर या परिस्थितीत दोन पर्याय होते. तडक निघून परत जाणे अथवा आपल्या टोळीस घेऊन कजरीचे अपहरण करणे. दुसरा पर्याय तसा खोऱ्यात सर्वमान्य होता. परत येऊन रडत बसण्यास मात्र मान्यता नव्हती. पण दोन्हीपैकी काही न करता थिजल्यासारखा दिलदार गपगार बसून नुसता पाहात राहिला.. वेळ जात होता. घटिका नि पळे जात होती. दिलदारच्या नजरेस नवऱ्यामुलाची वरात पडली..

गावच्या प्रथेप्रमाणे मुंडावळयांमुळे न मुलाचे तोंड दिसत होते.. ना ही नंतर नव्या नवरीचे.. लग्न लागले. दिलदार सुन्न बसून होता.. ठणाणा करीत.

.. आणि एकाएकी त्याचे ध्यान गेले, तर कजरी नवरानवरी बरोबर खिदळत बोलत उभी होती.. पुजाऱ्यास दोन मुली असू शकतात, कदाचित तीन ही .. ही शक्यता त्याच्या मनात आलीच नव्हती अजूनपर्यंत. दिलदारच्या अंगात अचानक त्राण आले. वीज संचारावी तसा तो उठून उभा राहिला. जणू काही कजरी त्याच्या हातीच लागली अशा उत्साहाने सर्व पाहात उभा राहिला. एखादा बेशुद्ध पडलेला कुणी एकाएकी अंगात ताकद येऊन उभा रहावा तसा दिलदार उभा राहिला. बदलले काहीच नव्हते, पण जणू कजरी हाती लागलीच असा विश्वास त्याला मनात वाटायला लागला. देवळाबाहेर एका पारावर त्याने बस्तान ठोकले. लोकांच्या जेवणाच्या पंगती उठत होत्या. कजरी मधून मधून दर्शन देत होती. पहिल्यांदा तिला पाहिले त्यानंतर तिला इतका वेळ तो प्रथमच पाहात होता. नाहीतर श्रावणातल्या पावसासारखी क्षणिक दर्शन देऊन नि आनंदाचा शिडकावा करून ती नाहीशी होत असायची. दिलदार तळ ठोकून बसल्यासारखा बसलेला. इतक्या गर्दीत दिलदारकडे कोणी बाहेरून आलेला म्हणून पाहत नव्हते, नि बिन कामाचा बसलाय म्हणून कोणी विचारत ही नव्हते. लग्नाच्या गर्दीचा फायदा म्हणून दिलदार खूश होता. मध्येच त्याच्या मनात विचार आला.. ह्या मुंडावळयांमागे कोण आहे ते दिसत नाही. लग्न लागता लागता त्याच्या टोळीने नवरीचे अपहरण केले असते तर? कजरीची मोठी बहीण हाती लागली असती! नसती आफतच म्हणायची. म्हणजे तिला परत पाठवायचे अजून एक काम मागे लागले असते. एकूण नवरीला पळवून न नेल्याचेच योग्य होते.. त्याने मनाशी म्हटले.

लग्न सुरळीत पार पडले. बिदाई झाली. तहानभूक हरपून दिलदार कजरीला पाहात बसलेला. तसा दूर होता तो, म्हणजे कोणाच्या नजरेत यायला नको असा. कजरी त्याच्या नजरेत आज अधिकच सुंदर दिसत होती. सगळीकडे सामसूम झाली नि दुपारी तो मग नाखुशीनेच परत फिरला. एखाद्या लहान मुलासारखे मागे वळून पाहात चालता चालता एका सायकलीवर धडकला..

"अरे, देखकर नहीं चलता.. पूरी डाक गिरा दी हाथ से.."

"माफ करना डाकिया बाबू.."

या शिवाय दिलदार काय बोलणार होता? निमूटपणे ती डाक म्हणजे पत्रे हातात गोळा करत त्या डाकियाच्या हाती दिली. तसा तो पोस्टमन शांत निघाला म्हणून ठीक.. नाहीतर गावात शोभा व्हायची.

मग दिलदार नाकासमोर पाहात सरळ जंगलात परतला. सकाळपासून तो भुकेला होता ते त्याला परतल्यावर ध्यानात आले. तरीही सर्वप्रथम समशेरच्या कानावर आजचा साद्यंत वृत्तांत देण्याची, एखाद्या शाळेतून घरी परतून मुलाला घरी सर्व सांगायची घाई असते, तशी घाई झालेली.

सगळे ऐकून झाल्यावर समशेर म्हणालाच, "दिलदार, नीट विचार कर. झाले काहीच नाही अजून. अजून सगळे पहिल्या सारखेच आहे. तू पण तोच नि ती पण तिथेच.." दिलदारच्या उधळलेल्या घोड्याला लगाम घालत समशेर म्हणाला नि दिलदारचे उडणारे विमान जमिनीवर त्यामुळे एकाएकी जमिनीवर उतरले. तरीही

दिवस मावळला तरी त्याचे कवित्व राहिलेच. प्रेमी जीव इतक्यात कसली हार मानतोय.. स्वतःशीच हसत नि मनातल्या मनात कजरीशी बोलत दिलदार पडून राहिला.. नि कजरीची स्वप्ने पाहात केव्हातरी निद्राधीन झाला..

असं ठरवून स्वप्न कोणी पाहात असेल का? दिलदार मात्र तयारीचा गडी निघाला. आजच्या स्वप्नात थेट सकाळच्या लग्नसमारंभाचा रिप्ले पाहिला त्याने. फक्त नवरा नि नवरी बदललेले. कजरी नि तो एकमेकांना हार घालत होते. स्वप्नातल्या स्वप्नात सारी हौस पुरवून घेत तो उठला तेव्हा सगळे टोळीतले साथीदार नव्या मोहिमेची तयारी करण्यात गुंतलेले. गुलजारसिंगने पळवून आणलेली 'ती' कौतुकाने दुरून पाहात होती. दिलदारला आश्चर्य वाटले, पळवून आणलेली ती.. इतकी हरखून कशामुळे गेली असेल.. ती ही एका दिवसात? की तिची हौस फिटवली गुलजारसिंगने? म्हणजे कजरीदेखील अशीच खूश होईल? पण गुलजार तसा पूर्णवेळ डाकू .. दिलदारने तर मनानेही डाकूत्वाचा त्याग केलेला. अशा कोणाशी कजरी खुशीत राहिल? आणि डाकूंच्या टोळीचा त्याग करावा तर जावे कुठे आणि पोटापाण्याचे काय? विचार करता करता दिलदारला जाणवले, आजकाल त्याला प्रश्न फारच पडतात .. उत्तरे न माहिती असणारे .. नुसतेच प्रश्न!

६.

# पहिले पाऊल

पुढील काही दिवस गावात फेऱ्या मारून मारून दिलदार थकला. घनघोर फेऱ्या झाल्या पण गावात कजरी दर्शन झाले नाही. देवळात देवीचे दर्शन होई. नि ती पावेल तर कजरी भेटेल.. कदाचित. विचारात मग्न दिलदारला कसलीच शुद्ध नव्हती आजकाल. समशेर आणि बाकी साथीदार तसे मोहिमा आखण्यात मग्न होते. आणि दिलदार आपल्या दुखऱ्या दिलाची मलमपट्टी करण्यात. येता जाता आता कजरीच्या गावचे पण ओळखीचे होतील की काय.. दिलदार त्या विचाराने अस्वस्थ होई, पण इतर काही न सुचून परत त्या देवळाकडे पुजारी कन्येच्या शोधात जाई. शेवटी काही दिवसांनी कजरी दिसली आणि दिलदारच्या दिलात दिल आले, म्हणजे जिवात जीव आला! थोड्याच दिवसांत मग अजून दोन गोष्टी घडल्या. पुढे होणाऱ्या मोठया घटनांची नांदी म्हणाव्या अशा! जे घडले ते अघटित होते.. अभूतपूर्व म्हणावे असे. आधी कोणी या डाकूवर्गातील कोणी कविता केली नसेल नि अशी गोड गुलाबी स्वप्ने पाहिली नसतील. दिलदारचे ते आधीच करून झालेले. आता पुढची पायरी! म्हणजे सात पिढ्यात कधी झाले नव्हते ते दिलदार करू पाहात होता.. पहिले पाऊल पडत होते.

हरीनामपूर चंबळच्या खोऱ्यापासून तसे दूरचे गाव. नदीकिनारी वसलेले. फार समृद्ध नसेल, पण गावात एक शाळा होती. तशा स्वतंत्र भारतात शाळांच्या इमारती गावागावातून दिसतात, पण इथे शाळेत एक मास्तर ही होते. शिक्षणबाह्य सरकारी कामे संपवून मुलांना शिकवण्याबद्दल त्यांची ख्याती होती. अशा गोष्टी लपून राहात नाहीत. म्हणजे गावातील शाळा, त्यात शिकवणारे शिक्षक असले आक्रित घडत असेल तर चर्चा तर होणारच. मास्तर असे आजूबाजूच्या गावात प्रसिद्ध होते. दररोज ते आपल्या सायकलीवरून ये जा करत नि गावकरी त्यांना मान देत. तशी गावातील शाळामास्तरांना मान देण्याची पद्धत आपल्याकडे नाही. पण हे हरिनाथ मास्तर एक अपवाद. तर ह्या हरिनामपुरात सकाळ सकाळी संतोकसिंगाच्या टोळीचा डाका पडला. घोड्यांच्या टापांचा आवाज गावात घुमला. धुरळा उडवत डाकू आले. गावकरी आपल्या घराघरात दडून बसले. अर्ध्या तासाने सारे शांत झाले.. तेव्हा गावकऱ्यांच्या ध्यानी आले, ते हे की गावातून लुटालूट झालीच नाही. नुसतेच दरोडेखोर येऊन गेले.. दोन दिवसांनी त्यांच्या लक्षात आले की हरिनाथ मास्तर बेपत्ता आहेत!

समशेर आणि त्याच्या साथीदारांनी हरिनामपुरातून अपहरण केले ते हरिनाथ मास्तरांचे. ते ही त्यांच्या सायकलीसकट! असे सगळे करण्याची तशी सवय होती सगळ्यांना, अपहरण करावे, खंडणी गोळा करावी, त्या जोरावर कमाई करावी, ती पैशाचीच नाही तर टोळीच्या दहशतीची. टोळी अशानेच प्रसिद्धी पावते. दहशत जितकी जास्त तितकी टोळीची सुरक्षा जास्त. म्हणजे कोणी पोलिसांना खबर वगैरे देण्याच्या फंदात पडत नाही. पण मास्तरांचे अपहरण करण्याचा उद्देशच वेगळा होता.

मास्तर आणि त्यांची सायकल, दोन्ही जंगलात पोहोचवण्यात आले. मास्तरांच्या डोळयावरची नि तोंडावरची पट्टी निघाली, तेव्हा मास्तरांना कळले की कुठल्या तरी जंगलात त्यांना आणण्यात आले आहे..

तत्त्वत: दिलदार अशा अपहरणाच्या विरूद्ध होता. कजरीला तो कधीच असे पळवून आणायला तयार झाला नसता. पण मास्तरांची गोष्ट वेगळी. स्वतः दिलदार हरिनामपुरात डाका घालायला गेला नसला तरी प्रेमात सारेच क्षम्य म्हणत मास्तरांच्या अपहरणास त्याने समशेरला मूक संमती दिली होती. म्हणजे झाले असे की, आधी दिलदारने आपल्या दिलाची इच्छा समशेरला सांगितली. समशेरच्या सुपीक डोक्यातून ही मास्तरांना सायकली सकट पळवून आणण्याची कल्पना उगवली.. उगवली आणि तिची अंमलबजावणीही तत्काळ झाली. अर्थात संतोकसिंगास यातील काही कळू न देता.

अपहरण पार पडले. हरिनाथ मास्तर त्या जंगलात टोळीच्या तंबूबाहेर थरथरत उभे होते. इतका वेळ डोळयावरच्या पट्टीमुळे अजूनही बाहेर जरा अंधुक अंधुकसे दिसत होते. 'गुरूर्देवो नम:' दिलदारला असे काहीसे आठवले, तसा पुढे होत तो मास्तरांना म्हणाला,"नमस्ते गुरूजी."

एखाद्या डाकूला कोणाच्या पाया पडणे शोभले नसते, पण दिलदार त्यांच्या पाया पडला. असे ही दिलदार आजवर त्या टोळीत राहात होता, इतके सोडले तर त्याच्यात डाकूत्वाची लक्षणे होतीच कुठे? संतोकसिंगाला तर आपल्या घराण्याची बेअब्रू करणारा दिवटा असे वाटू लागलेले त्याच्याबद्दल ते उगीच नाही. अपहृत

कोणाच्या पाया पडण्याचा त्या टोळीतला हा पहिलाच प्रसंग. सात पिढ्यात झाले नसेल अशा गोष्टी घडण्याची ती सुरूवात म्हणावी!

समशेर आणि दिलदारने मास्तरांना जवळच्या तुटक्या खुर्चीवर बसवले. तुटकी असली तरी ती खुर्ची होती, आणि मास्तरांना मान देण्याची त्यांची ती पद्धत होती.

"आधी खाऊन घ्या गुरुजी. मग निवांत बोलू.."

समशेर म्हणाला तेव्हा घाबरलेल्या मास्तरांना आपल्या तोंडाला पडलेली कोरड जाणवली. आजवर अपहरणाच्या गोष्टी ऐकलेल्या त्यांनी. अपहृताचे होणारे हाल पाहिलेले. पै पै गोळा करून खंडणी देत लोक आपलेच आयुष्य विकत घ्यायचे ते पाहिलेले. एखाद्या मास्तराचे अपहरण करून या डाकू लोकांना कसली कमाई होणार याचा त्यांना अंदाज येत नव्हता. एकतर ते स्वतः सदाफटिंग. आगेमागे कोणी नसताना त्यांच्या सुटकेसाठी कोण कशाला त्या डाकूंना खंडणी देणार? पण इकडे माहौलच वेगळा वाटत होता. मास्तर अधाशासारखे पाणी प्यायले. मग आजूबाजूला पाहिले. समशेर आणि दिलदारसिंग दोघेच बाजूला होते. दोघांचे वेश डाकूसारखे असतील पण हातात ना बंदूक होती न राकट चेहऱ्यावर उर्मट वा उग्र भाव..

"गुरुजी, तुम्ही इकडे सुरक्षित आहात. कोणी तुमचा बाल ही बाका करणार नाही."

"ते ठीक आहे. पण मला आणून काय मिळणार आहे तुम्हाला? माझ्या पुढे मागे नाही कोणी.."

"गुरुजी, तुम्ही करू शकाल ते अन्य कोणीच करू शकणार नाही."

"अरे, पण माझा काय दोष की मला पळवून आणलेत. नि माझ्या सुटकेची वाट पाहणारे तर कोणीच नाहीत."

"आम्ही आहोत गुरुजी. आमचे काम करून द्या. तुम्हाला सन्मानाने गावात परत सोडतो. हा एका ठाकूराचा शब्द आहे."

"तुमचे काम? आणि मी? एक शिकवणे सोडले तर मला दुसरे येते ते काय?"

"तेच हवे गुरुजी. तेच हवे."

शिकण्यासाठी लागते ते पुस्तक आणि पाटी पेन्सिल नाहीतर वही आणि पेन.. पेन्सिल. मास्तरांनी हे सांगितले तसा समशेर उठून उभा राहिला. घोड्यावर टाच मारून निघणार तोच मास्तर म्हणाले,

"लुटून नको. विकत आणणार असशील तर शिकवेन.. विद्या हवी ती ओरबाडून घेता येत नाही .."

समशेर थोडा चपापला.

"ठीक आहे गुरुजी. गावातून पैसे देऊन आणतो."

"गावात ना? मग तू कशाला? मीच जातो.." दिलदार म्हणाला. कजरीला पाहून दोन दिवस उलटून गेलेले. त्या निमित्ताने बाहेर तर पडता येईल.. मोठया उत्साहाने दिलदार उठला.

"गुरुजी, तोवर तुम्ही जेवून घ्या. मी येतो परत.."

"दिलदार, पण लगेच परत यायला विसरू नकोस.. नाहीतर तिकडेच राहशील उभा बघत.. आणि येताना सामान आणायला मात्र विसरू नकोस..नाहीतर होशील दंग नि ज्या कामासाठी गेलास तेच विसरशील."

या जंगलात शिक्षण? हे शिक्षणाचे वेड दिलदारच्या दिलात कुठून शिरले असेल? ते ही एका शिक्षकाचे अपहरण करून? मास्तरांनी जास्त चौकशी केली नाही, पण मामला काही और आहे हे कळले त्यांना. त्यांना घाई तर नव्हतीच आणि शाळेत काय नि इकडे काय, हाडाच्या शिक्षकाला शिकवायला मिळणे महत्त्वाचे. दिलदार गावातून खुशीत परतला. कजरी दर्शन झाल्याने गाडं खुशीत होतंच. मास्तरांनी सांगितलेले सारे वह्यापुस्तकांचे नि पाटी पेन्सिलीचे सामान त्याने खाली टाकले. मास्तरांनी जेवून घेतलेले. तसे जेवण तिखटजाळ होते. त्या डाकू संप्रदायाच्या एकूण वागण्याला शोभावे असे. पण दिलदार आणि समशेर दोघेही त्यांच्याशी अदबीने वागताना मास्तर पाहात होते.. जे जे होईल ते ते पहावे म्हणत मास्तर बसून राहिले. दिलदार नि समशेर दोघे त्यांची काळजी घेत होते. आजवर डाकूंबद्दलचा अनुभव त्यांचा असा काही नव्हता. या मागे काय कारण असावे याचा अंदाज त्यांना मात्र लागत नव्हता.

७.

# लेखन वाचन

मास्तरांचे शिकवणे सुरू झाले. दोन गोष्टी .. एक अक्षर ओळख, आकडे, लिहिणे वाचणे आणि दुसरे.. सायकल चालवणे. घोडा दौडवणे कठीण नसेल पण दुचाकी सायकलीवर तोल सांभाळत ती चालवणे मात्र कठीण. आपल्या हातातील लगामाने सारे काही कंट्रोल करण्याची सवय डाकूलोकांना. अगदी जिभेच्या लगामापासून सुरूवात. आजूबाजूच्या गावांवर दहशतीचा लगाम लावूनच इतकी वर्षे टोळी पोलिसांपासून बचावली होती. घोड्याचा लगाम म्हणजे त्या जंगलातील आयुष्याचे प्रतीक होते जणू. आणि दिलदार शिकतोय या सायकलीला तर असा लगामच नव्हता! ब्रेक मारला की थांबते ती सायकल, पण लगामासारखी 'मर्दानी' मानावी अशी गोष्टच सायकलीत नाही. टोळीत होणाऱ्या बदलाचे तर संकेत नव्हते हे? दिलदार विद्यार्थी म्हणून तसा चांगला. मुख्य म्हणजे त्याच्या सगळ्या शिकण्याला एक उद्देश होता. एक प्रकारे जीवनोपयोगी शिक्षण होते ते! मास्तरांना तो भलेही ठाऊक नसेल. काही दिवसांतच दिलदार बाराखडी नि अक्षर ओळख शिकला. मग लिहिणे वाचणे.

एक दिवस तो मास्तरांना म्हणाला,"गुरूजी, पत्र कसं लिहितात ते शिकवा ना.."

"पत्र लिहिण्यात काय कठीण? आधी लिहायला शिक की मग पत्र लिहिता येईल आपोआप.. पण तुला रे पत्र कोणाला लिहायचेय? मी पाहिलंय.. या सगळ्या डाकूंमध्ये तू वेगळा आहेस. तू कधी यांच्यासारखा जात नाहीस दरोडे घालायला. ते लोक लिहायला नि वाचायला शिकलेत थोडेफार म्हणजे खंडणी नि धमक्यांच्या चिठ्ठ्या पाठवायला. बरे, तुला तर ते करायचे नाही .."

दिलदार लाजला. पण बोलला काही नाही.

"काही नाही गुरूजी. उगाच .."

"ठीक आहे. शिक. शिक्षणानेच पुढे जाशील तू."

दिलदारला ते मनोमन पटले. या 'शिक्षणा'नेच पुढे काही होईल. सायकलचा तोल सांभाळता सांभाळता आयुष्याचा तोलही सांभाळला जाईल. मास्तर मन लावून शिकवत होते. डाकूंच्या वस्तीत राहण्याचा अनुभव खास होताच. पण समशेर नि दिलदार दोघांनी त्यांना बाकी जणांपासून दूर ठेवलेले. आजवर मास्तरांना दिलदारची शिकण्याची इच्छा कळून तर चुकलेली. त्यामुळे तिकडून पळून जाण्याचा विचारही न करता ते शिकवत होते. कुठे का होईना शिकवायचेच तर आहे. आणि न जाणो यातून कोणी या डाकूच्या आयुष्यातून बाहेर पडला तर त्यांच्यासारख्या हाडाच्या शिक्षकाला बरेच वाटणार होते. दिलदारची दिवसागणिक प्रगती होत होती. आणि सायकलीवर आता दिलदार स्वार होऊ लागला होता. मास्तरही आता खुलले होते.. खरेतर दिलदार त्यांच्याशी दिलखुलास बोलू लागला होता. मास्तरांचा अंदाज खरा होता. एक दिवस दिलदार स्वतःच त्यांना सारे सांगणार होता..

दिलदार आता बऱ्यापैकी शिकून तयार झाला होता. मध्ये गावात सायकलवर जाऊन दुसरीची पुस्तके घेऊन आलेला. एका महिन्यात त्याची चांगलीच प्रगती झालेली.

"गुरुजी आता मी पत्र लिहू शकेन?"

"अर्थात. तुला आता लिहिता येईल. वाचता येईल. इतक्या वर्षात तुला अशी इच्छा व्हावी.. याचाच आनंद आहे मला."

"खरं सांगू गुरुजी, मला सारे तिच्यासाठी करायचे आहे?"

"ती? कोण?"

"आहे एक.."

"ती तुला काय म्हणाली, लिहा वाचायला शिक?"

"नाही गुरूजी. तिच्याशी तर मी एक शब्दही बोललो नाहीये. ती मला ओळखतही नाही."

"मग? तिला पत्र लिहायचे आहे?"

"हो गुरुजी .." दिलदार लाजत म्हणाला. "पण तेवढेच नाही गुरूजी.."

"म्हणजे?"

"तुम्हाला सगळेच सांगून टाकतो. म्हणजे तुम्हाला इकडे का आणावे लागले ते ही कळेल. आणि तुम्ही त्याबद्दल आम्हाला माफ कराल."

दिलदारने आपली दिलकी पुकार नि त्यासाठी चाललेला आटापिटा याचे वर्णन केले. मास्तर ऐकत होते. त्यांचा अंदाज बऱ्यापैकी खरा निघत होता.. काही ठिकाणी मात्र अजिबात चुकीचा होता तो.

"गुरुजी, आम्ही हे असे. दऱ्याखोऱ्यातील राहणे, न शिक्षण, न नोकरी न धंदा. सगळे काही दहशतीने आणि बंदुकीच्या जोरावर. आमच्याकडे आजूबाजूच्या गावातून कोणालाही उचलून नि पळवून आणतात. असली तर लग्नं होतात. मी आजवर एकाही दरोड्यात गेलो नाही. संतोकसिंगचा मुलगा म्हणून टोळीत टिकून आहे, नाहीतर कधीच खलास करून टाकला असता सगळ्यांनी. इथल्या सगळ्यांना याशिवाय दुसरे जीवन असू शकते हेच ठाऊक नाही. ते कसे असते मला ठाऊक नाही, पण असणार हे मात्र ठाऊक आहे.. मला कजरी आवडली. आवडते. पण तिला उचलून नाही आणणार मी. नाहीतर बाकीच्यात नि माझ्यात काय फरक उरणार?"

"म्हणजे आता तू तुझ्या कजरीला पत्रे लिहिणारेस?"

"हो गुरूजी .." बोलताना ही दिलदार लाजत होता.

"अरे पण लिहायला मी शिकवतो.. पण प्रेमपत्रे मात्र पहिली दुसरीच्या अभ्यासात नाही शिकवत.."

"काय गुरुजी. तुम्हीपण.."

"पण मला तुझं आश्चर्य वाटते.. तुझी भाषा इतकी चांगली कशी?"

"माझ्या आईकडून गुरुजी. ती एक शिक्षिका होती. बाबांची इच्छा झाली नि एका दरोड्यात तिला उचलून आणले गेले. माझ्या वयाच्या आठ दहा वर्षांपर्यंत ती होती. तिने बोलायला शिकवलं. खूप गोष्टी सांगायची. तिच्याकडून खूप काही

शिकलो. माझ्यामुळे असेल पण ती या जंगलात शांतपणे राहिली. मग एकदा खूप ताप आला त्यात गेली ती. तिने कधी वचन मागितले नाही, पण ती अंथरूणात होती तेव्हा मनातल्या मनात वचन दिले मी, मी डाकू होणार नाही. संतोकसिंग टोळीत हे कोणाला ठाऊक नाही. पण समशेरला माहितीय, मी कुठल्याच डाक्यामध्ये जात नाही."

"म्हणून तुला हे सगळे शिकायचेय?"

"माहिती नाही गुरुजी. मलाच ठाऊक नाही. मी फक्त कजरीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतोय.."

"सायकलीवरून?"

"तुम्ही हसणार नसाल तर सांगतो .."

"बोल.."

"एकदा परत येताना मी एका पोस्टमनवर धडकलो. डाकिया म्हणे. त्याचे कपडे माझ्यासारखेच खाकी.. तो डाकिया.. मी डाकू.. म्हटले मी डाकू ऐवजी खोटा का होईना डाकिया होईन.. तो सायकलीवरून जातो तसा मी जाईन.. कजरीला पत्रे देऊन येईन.. नाहीतर मला कोण दारासमोर उभे करेल?"

"म्हणून हा खटाटोप?"

"डाकिया बनायला थोडं लिहा-वाचायला यायला पाहिजे ना. माझा आधी बेत तेवढाच होता. डाकिया बनून चकरा मारून ओळख काढायची. पण आता ठरले.. मीच तिला पत्र लिहिणार. ती डाकिया बनून देऊन येणार. पुढे काय होईल ते नाही माहिती. ती माझी होईल किंवा नाही .. पण तिला पळवून आणणार नाही."

दिलदार मास्तरांशी मनमोकळेपणाने बोलत होता. मास्तरही ऐकत होते. काहीच दिवसांत मास्तरांना परत पोहोचवण्याची वेळ आली.

"समशेर, गुरूजींना व्यवस्थित सोडून ये. गावात नीट. सायकल सकट.."

"सायकल? ती तुला दिली समज मी. एकदा तुझे ते काम झाले की आणून दे.. नाहीतर तुझे हे मित्र कोणा दुसऱ्याची पळवून आणतील.."

"गुरूजी.."

"आणि समशेर, डोळे बांधूनच सोड मला गावात. नाहीतर ते लोक चौकशा करतील. मग मला जेवढे माहिती ते सांगावे लागेल. पट्टी बांधली असली की सांगण्याची गरज नाही कुठून कुठे आलो त्याबद्दल. मला खोटं बोलणं जमणार नाही मला नि तुम्ही सारे पकडले जाल.. एकच करा जमलं तर, हे सारे सोडण्याचा प्रयत्न करा.. माणसासारखे जगा.."

मास्तरांना डोळे बांधून गावात सोडताना समशेर आणि दिलदार दोघांचे डोळे भरून आले.. एक दीड महिन्यात दिलदार अजून बदललेला नि समशेरही दरोडेखोरी सोडून जगात अजून काही आहे हे समजलेला..

मास्तर परतले. दिलदारचे पूर्वीचे दिवस परतले. फक्त आता कागदावर लिहिणे नि लिहिलेले वाचणे जमू लागलेले. आता डाकिया बनून पत्र देण्याची वेळ आलेली.. खरंतर त्या आधी पत्रलेखनाची.. ते किती कठीण आहे त्याची जाणीव त्याला कागद आणि पेन हाती घेतल्यानंतरच झाली. पण याचसाठी केला होता अट्टाहास .. पत्र तर लिहायला हवे.. गावात जाऊन कजरीच्या हाती द्यायला हवे. पत्र हाती देताना होईल ती पहिली भेट. पोस्टमन बनून पत्र देईन .. ती एकटी भेटेल ना त्यासाठी? आता खरी गोष्ट सुरू होणार. तरीही गुरूजींचे अपहरण आणि त्यांच्याकडून शिकून घेणे .. हे संकेत तरी त्याला चांगले वाटत होते. इतके जमले तर पत्र लेखन ही जमेलच .. नि त्यापुढे जाऊन कजरीशीही सूत जुळेलच..

८.

# पाऊल पडते पुढे ..

रात्रीची वेळ. खरेतर त्यांच्या आयुष्यात दिवस नि रात्र वेगळी काढणे कठीण. एकदा डाका घालायचा ठरला की टोळीत चैतन्य येई. दिवसरात्र न पाहता सारे कामाला लागत. आपापल्या घोड्याला प्रेमाने थोपटत खाऊ घालत. बंदुकीच्या गोळ्या व्यवस्थित भरून ठेवत. आता सरावाने सारे पटापट होत असे. दिलदार दुरून पाहात असे. या सर्वात मेहनत तर खरी. योजना आखणे पण महत्त्वाचे. गावाची निवड करणे, त्यासाठी नीट टेहळणी करून योजना आखणे, सगळ्या धामधुमीत आपली टोळी सुरक्षित ठेवणे, मग लुटालुटीची नीट व्यवस्था लावून देणे.. हे आयुष्य खरेतर खडतर आहे. पण मोहिम फत्ते केली.. गावात एखाद्याला जिवानिशी मारले की टोळीतील सारे कृतकृत्य होत. लहानपणापासून दिलदार हेच पाहात आलेला. संतोकसिंगचा दराराच इतका की सारे झटून कामाला लागत. काम हीच देवपूजा असे संतोकसिंग सगळ्यांना सांगत असे. आणि सारे त्यातून प्रेरणा घेत डाका दरोड्याच्या पंथाचे पाईक बनत. पोलिसांना कधी इतक्या वर्षात येताना पाहिले नव्हते, पण ते असतात हे इतर टोळ्यांवरील पोलिसी कारवाईने ऐकून माहिती होते. तरीही सांभाळून राहणे महत्त्वाचे हे संतोकसिंगचे सगळ्यांना सांगणे होते. तसे सर्व राहात होते. दिलदारला सारे पटत नसले तरी दुसरे काय करावे उमगत नव्हते. कजरी भेटल्यानंतर.. खरेतर दिसल्यानंतर, आयुष्याला काहीतरी उद्देश मिळाल्यासारखे वाटत होते. वयाच्या विशीत हाताला काम नाही पण मनाला तरी काहीतरी चाळा

मिळाला. प्रथम चाळा म्हणून सुरू झालेला तो विचार कजरीनाम जपता जपता अखंड मनभर भरून राहिला.

अशात तो रात्री पत्र लिहायला बसला. टोळीमध्ये शांतता होती. आपल्या तंबूतील एका जागी कागद आणि पेन घेऊन दिलदार सरसावून बसला. मास्तरांनी लिहिणे शिकवलेले नीट त्यामुळे अक्षर जरी फार सुंदर नसले तरी कागदावर हवे ते उतरवता येत होते. पण प्रेमपत्र हा मामला काही और असावा ..

पहिल्या कागदावर पेन टेकताच त्याला कळेना .. प्रिय कजरी लिहावे.. प्रिये लिहावे की प्रियतमे.. की राणी.. दिलकी रानी किंवा दिलदारके दिलकी रानी .. की प्राणप्रिये.. मायन्यावर गाडी अडली. पहिल्याच पत्रात जुजबी काही लिहावे की मुद्द्याला हात घालावा? पण जुजबी लिहायचे तर त्यासाठी कारण काय? एखाद्या अनोळखी माणसाकडून पत्र यावे, ते तिने वाचावे आणि त्यावर उत्तर ही द्यावे .. असे काय लिहिता येईल? प्राणप्रिये वगैरे लिहिणे जास्तच आगाऊपणा होईल? मायना सोडून तो मजकुराकडे वळला. नि तिथे अजूनच अडकला. सुरू कसे करावे.. काय लिहिले की तिला राग येणार नाही? परत तोच प्रश्न .. मुद्द्याला हात घालावा? धीर एकवटून त्याने चार ओळी लिहिल्या..

'प्राणप्रिये, तुला पाहिल्यापासून मी दिवाणा झालो आहे. रात्रंदिवस झुरतो आहे. अन्नपाणी गोड लागत नाही. माझ्या दिलाची राणी तू बनली आहेसच, पण तू त्यास संमती देशील? म्हणजे मी राजा होईन का? लवकरात लवकर हो असे उत्तर देशील ना?'

खाली काय लिहावे? तुझा की तुझाच? राजा की अजून काही? इतके लिहिलेच आहे तर हे ही होऊन जाऊदे.. म्हणत लिहिले त्याने..

'तुझा आणि तुझाच ..'

शेवटी नाव लिहिताना मात्र त्याचा हात थरथरला.. स्वतःचे नाव न घालता पत्र पूर्ण करून तो झोपायला गेला.. स्वप्न त्याची वाटच पाहात होते जणू..

सायकलीवर टांग मारून नि डाकियासारख्या वेशात वेडात निघालेला दिलदार गावातील मंदिराजवळ पोहोचला. सायकलीची घंटा ट्रिंग ट्रिंग वाजली.. हवेचा एक जोरदार झोका आला.. पाऊस पडू लागला.. मंदिराच्या आतून धावत धावत कजरी बाहेर आली. जणू त्या डाकियाचीच वाट पाहात असावी. ते पत्र हाती घेऊन ती धावत धावत आत निघून गेली. पोस्टमन दिलदार फक्त बघत राहिला.. जणू त्याचा रोल तितकाच मर्यादित असावा.. पण आतुरतेने पत्र वाचणारी कजरी.. अर्धी लढाई त्याने जिंकली.. कजरी आतून परत आली.. आणि काही बोलणार तोच समशेर दिलदारला झोपेतून उठवत होता ..

"यार.. आता ती काही बोलणार होती.. नि माझी झोप मोडलीस .."

"दिलदारा, उघडून डोळ्यांच्या दारा.. उठ. तुला जायचं आहे.. तुझ्या मोहिमेवर .."

"तरीपण .. पहाटेचे स्वप्न मोडलेस .."

"पहाट? सूर्य डोक्यावर येण्याची वेळ झाली. कजरीभाभी नंतर भेटायची नाही .."

स्वप्नात अडथळा आणल्याने दिलदार समशेरवर चिडला खरा, पण गावात जायचे तर उठणे भाग होते. ते प्रेमपत्र त्याने हाती घेतले.. निरखून पाहिले .. एकदा वाचले.. आणि एकाएकी हिंमत नाहीशी झाल्यासारखा तो मटकन खाली बसला.. हे पत्र कोणाच्या हाती लागले तर? तिच्या बापाने पाहिले तर तिथेच आपल्या प्रेमाचा शेवट.. तर लिहावे ते काय? मास्तरांनी अक्षरे शिकवली.. भाषा शिकवली.. पण हे प्रत्यक्ष उपयोगी पडेलसे काहीच नाही शिकवले? पहिले वहिले प्रेमपत्र सांभाळून त्याने ठेऊन दिले.. दुसरा कागद घेतला.. त्यावर मोजून चार शब्द लिहिले फक्त.. सायकलीवर टांग मारून डाकूचा डाकिया बनत कजरीच्या गावाकडे दिलदार निघाला. प्रेमाच्या गावा जाण्याचा हा पहिला दिवस. सायकलीवर टांग आणि मनात त्याच देवीची प्रार्थना करत तो निघाला ..

दरोडेखोरांच्या त्या टोळीतील सात पिढ्यांत झाले नसेल ते होऊ घातले होते. बंदूक सोडून हाती पेन तर आलेच होते. ते यावे म्हणून गावातून एका मास्तराला पळवून आणून त्याच्याकडून शिकवणी लावली होती.. आणि दिलदार तर म्हणे त्या मास्तरांच्या पाया पडलेला, गुरूजी,गुरूजी म्हणत. आता तर तो घोडा सोडून सायकलीवर बसून जातोय.. तिकडे गावातल्या कुण्या एका पोरीपायी वेडा झाला म्हणे.. डाकूंच्या इभ्रतीला हे शोभत नाही .. उचलून आणायची तिला.. दाखव की

हिंमत. पण सरदारांचा पोर. एकुलता एक. सरदार संतोकसिंगापुढे बोलायची कुणाची टाप नाही. सगळे टोळीतील निमूटपणे बघत होते आणि आपसात कुजबुजत होते.

दिलदार आपली सायकल दामटत गावाकडे निघाला होता. हातात त्याने पाच सहा खोटी पत्रे ठेवलेली.. डाकिया म्हणून वेशांतरासाठी आवश्यक म्हणून. जाता जाता कजरीची प्रतिक्रिया काय असेल व असावी याचा विचार करत होता.. आज हिंमत करून हे चार शब्दांचे पत्र तिच्या हाती दिले की त्याच्या प्रेमकथेचा भाग दुसरा सुरू होणार होता. पहिला भाग तसा मजेदार होता.. त्याची दिवसागणिक मनात उजळणी करत दिलदार गावात पोहोचला.

छोट्या गावात नवीन पोस्टमन आल्याचे पाहून सगळ्या नजरा त्याच्याकडे वळल्या. ह्याचा विचार त्याने आधी केला नव्हता. त्या गावातील नेहमीच्या पोस्टमनशी गाठ पडली तर? ह्या विचाराने त्याला धडधडू लागले. तशात समोर देवळाबाहेर कजरी दिसली आणि त्याच्या वाढणाऱ्या धडधडीला अजून एक कारण मिळाले. सायकलीवरून उतरत चालत चालत तो कजरीमागे गेला.. आणि तिच्या नावाची आयुष्यातली पहिलीच हाक तिला मारली,

"कजरीदेवी मौर्या .. पत्र आहे तुमचे."

कजरीने चमकून मागे पाहिले. आपल्या दिलाच्या वाढत्या धडधडीचा आवाज तिला ऐकू जाईल की काय.. दिलदारला भीती वाटली नि मध्येच एखादा ठोकाही चुकला.. तिचा आवाज कानी पडला..

"कोठून आलंय? आणि माझ्यासाठी?"

"होय. तुमचेच पत्र. हे घ्या."

दिलदारने लिफाफा हाती दिला.

"तुम्ही गावातले नेहमीचे पोस्टमन वाटत नाहीत..?"

कजरीच्या प्रश्नाने दिलदार क्षणभर गोंधळला, पण क्षणात सावरत म्हणाला,

"नाहीच. मी त्या दुसऱ्या गावात असतो. खास एवढे एक पत्र द्यायला आलोय.."

आपल्या त्वरित जबाबाने दिलदार स्वतःवरच खूश झाला. आपण या गावातील नाही म्हटल्यावर आपण त्या गावचे नाही हे दाखवणे सोपे होते!

कजरीने लिफाफा पाहिला ..

"पण यावर पत्ता नाही?"

"नाहीच. खास पत्र आहे. खास द्यायला आलोय."

"कोणी दिलंय?"

"ते नंतर सांगेन.. उत्तर घ्यायला कधी येऊ?"

"पत्रात काय आहे?"

"अहो मी फक्त पत्र वाटतो. वाचत नाही .."

"ते ही खरंच.. पण मला पोस्टाने उत्तर पाठवायचे असेल तर? पत्ता द्या.."

"नको.. नको. मी स्वतः नेऊन देईन.."

"पण त्यासाठी तुम्हाला खास इकडे यावे लागेल.."

"येईन की.. पत्रे वाटणे हे कामच माझे की.."

"अशी सर्वांची पत्रे वाटता तुम्ही? बिना पत्त्याची?"

"नाही हो.. खास फक्त हेच पत्र.."

"पण कोणत्या गावात असता तुम्ही?"

"हरिनामपूर."

ऐनवेळी दिलदारला मास्तरांच्याच गावाचे नाव आठवले..

"अहो.. इतक्या दूरवरून.."

"पोस्टमनला कसले आलेय दूर आणि जवळ .. आपले कर्तव्य करणे.."

"पण हे पत्र पोस्टाने नाही आलेय.."

"सांगितले ना.. खास पत्र, खास तुमच्यासाठी, म्हणून खास आलोय द्यायला .."

कजरीशी असेच बोलत रहावे असे वाटत होते, पण तितक्यात कुठूनतरी आवाज आला,

"कजरी, कोण आहे गं?"

"कोणी नाही मावशी .."

कजरीने पत्र हळूच लपवले आणि ती मागे वळली..

"उद्या येतो .. यावेळी .."

घाईघाईत दिलदार म्हणाला नि सायकलीवर टांग मारून परत निघाला .. मागे वळून पाहात कजरी मनाशी म्हणाली, 'हरीनामपूर? ते तर उलट्या बाजूला राहिले? आणि हा पोस्टमन चाललाय ह्या बाजूला?'

जाता जाता दिलदार कजरीच्या चेहऱ्यावरचे अवखळ भाव आठवत होता, तिचा मंजुळ आवाज कानात साठवलेला परत परत ऐकत होता.. एकाएकी त्याच्या ध्यानात आले, कजरीच्या मावशीने हाक मारली तसे तिने ते पत्र का लपवले? न वाचताच त्यातील मजकुराचा अंदाज तिला आला असावा? की मुली अशा जात्याच हुशार असतात? त्या पत्राच्या निमित्ताने पहिली भेट नि पहिली ओळख तर झाली. दिलदार स्वतःवर खूश झाला. आजवरच्या एकूण योजनेला फळ आलेले. हरिनाथ गुरूजींची मेहनत कामी आली होती. इथवर झालेय.. पुढेही काहीतरी चांगलेच होईल.. विचार करत त्याची सायकल पुढे निघाली. समोर लक्ष गेले तर त्या दिवशी ज्याच्यावर तो धडकलेला तोच पोस्टमन .. त्याचा स्फूर्तीदाता.. पुढ्यात पत्रांची बॅग लटकावून चालला होता. त्याने बघू नये म्हणून सायकलीचा वेग वाढवत दिलदार झरकन पुढे निघाला ..

९.

# पाऊल पडेल का पुढे?

दिलदार परतला. समशेर त्याची जणू वाटच पाहात होता. नाही म्हटले तरी समशेरला या प्रेमकहाणीत तसा रस वाटायला लागला होता. नेहमीच्या मारधाडीपेक्षा हे अधिक रम्य वाटायला लागले होते. दिलदारच्या दिलाची हाक नि भूक अशी गोड वाटेवर घेऊन जाणारी असेल तर हे दरोडेखोरीचे आयुष्य म्हणजे फुकट.. दिलदारच्या प्रयत्नात एक काव्य आहे. एक नाजूक भावना आहे. भले त्याचे ते स्वप्न पूर्ण होईल किंवा न होईल.. पण ती वाट वेगळी आहे. बंदुकीच्या दस्त्याहून गुलाबाच्या पाकळ्यांत जास्त ताकद आहे की काय? गुरूजींना पळवून आणले ते ही प्रेमाने बोलत होते.. त्यांना या बंदुकीच्या गोळ्यांची गरज भासत नव्हती. आणि गावातील लोक? ते ही असेच कोणाला धाकदपटशा न दाखवता जगतात.. आजवर पोलिसांनी पकडले नाही, कदाचित कधीच पकडले जाणार नाही पण मनाच्या पाठीशी ही सतत भीतीची भावना असतेच ना.. मुक्त कधी जगायला मिळणारच नाही का?

बाहेरच्या जगातील वाऱ्याची झुळूकही अशा बदलाला कारणीभूत होऊ शकते? खरेतर टोळीतील कोणालाही याहून दुसरा पर्यायच कधी दिला गेला नसेल तर त्यात त्यांची तरी चूक काय होती?

समशेरच्या मनात असे विचारांचे वादळ उठले असतानाच दिलदार तिथे पोहोचला. दिलदारच्या तोंडावरचे हासू पाहूनच तो समजायचे ते समजला..

"काय मग? मोहीम फत्ते?"

"आजची तरी.."

"कितीजणांचा केलास खातमा?"

"खातमा? ही मोहीम वेगळी .. तुझी वेगळी .."

"छे! तू असा.. दिलदार.. दिसायला गुलजार.. सायकलीवर स्वार.. नक्कीच गावातील मुलींच्या ह्रदयाला तुडवत आला असणार तू.. आमच्या मोहिमेत कोणी गेले तर समोर दिसते तरी.. तुझ्या मोहिमेत कोणाला कळणारही नाही .."

"तुझे काहीतरीच.."

"काहीतरीच? मग असा बन ठन कर का गेलास.. आपल्या तंबूत आजवर आरसा कोणी पाहिला नसेल .. दिलदार ए यार आरशासमोर किती वेळ उभा होता?"

"तुझे काहीतरीच.."

"मग मी खोटे सांगतोय .. आज सकाळची गोष्ट.. मी उठवले स्वप्नातून .. मग हा दिलका राजा नदीत घुसून किती घासूनपुसून बाहेर पडला.. नि हे साफसूफ कपडे घालून.. सायकलीला टांग मारता झाला.. ये वादियां ये फिजाएं गवाह हैं.."

"तू आता बस हां.."

"मग काय म्हणत होती भाभी?"

"भाभी? पण हुशार रे ती.. तिच्या मावशीने हाक मारली तर माझी चिठ्ठी लपवली तिने.."

"काय सांगतोस.."

"खरंच!"

"ते नाही .. तू तिला सांगितलेस.. चिठ्ठी तुझी आहे, पहिल्याच भेटीत.."

"छे रे.. इतकी हिंमत नाही यार. उद्या जाईन परत."

"मग आज आता जेवायची गरज नाही.. कोंबडीचे मटण आहे.. पण तुझे पोट तर कजरी दर्शनाने भरलेले दिसतेय.. तुडुंब!"

दिलदारचे पोट भरले असेल पण मन भरले नव्हते. कजरीशी बोलण्याची ती तीन चार मिनिटे त्याने जणू ध्वनिमुद्रित करून साठवून ठेवली होती. दिवसभर ती टेप त्याच्या मनात नि कानात वारंवार सुरू होत होती. त्यामुळे तो मध्येच हसत होता स्वतःशीच.. दुरून पाहणाऱ्यास वाटावे की नक्कीच मेंदूत कुठला तरी घोटाळा झाला आहे. पण तंबूत तो एकटाच होता.. संध्याकाळी संतोकसिंग त्याचा समाचार घ्यायला येईपर्यंत.

"खूप दिवसांनी इकडे येणे केलेत तात?"

"हुं. तुला भेटून खूप दिवस झाले. आम्ही शहरात काय गेलो.. तुम्ही अजून सरदारासारखे वागताना दिसत नाहीत."

"आम्हाला या डाक्या दरोड्यांत रस वाटेनासा झालाय.. बंदुका घेऊन भीती पसरवत फिरणे.. मुडदे पाडणे नि लुटालूट करणे.. नि मग पसार होऊन डोंगर दऱ्यातून लपून छपून बसणे.."

"खामोश! आपल्या ठाकूरांची उज्ज्वल परंपरा आहे. तो वारसा मिळाला आहे त्याचा अभिमान बाळगा. आपल्या सात पिढ्यांनी डाकू म्हणून नाव कमावले. आपले खापर पणजोबा गब्बरसिंग.. आजही त्यांचे नाव ऐकून गावातील लोक चळाचळा कापतात. त्यांचे काम मानसिंग म्हणजे तुमच्या पणजोबांनी पुढे नेलं.. आम्ही मेहनतीने संतोकसिंग डाकू झालो. दिवस-रात्र, उन्ह-पाऊस कसली तमा न बाळगता डाकूगिरीचा आदर्श उभा केला. आणि आमच्या पुढील पिढीने ते मातीमोल करायचे ठरवलेले दिसते. देवीच्या मनात काय आहे न कळे.."

"पण आम्ही डाकू नाही बनू शकत. आमच्या रक्तातच ते नाही .."

"संतोकसिंगाचे शुद्ध सात्विक डाकूगिरीचे रक्त तुमच्या धमन्या नि नसानसांतून वाहात आहे.. हे विसरू नका. आमच्या कीर्तीला काळिमा फासू नका.. प्रत्येक बापाला वाटते, पुत्र व्हावा ऐसा गुंडा .. ज्याचा तिन्ही लोकी झेंडा. आम्ही चंबळच्या खोऱ्यात या भागावर राज्य करतो. इकडे पोलिसही नजर वाकडी करून पाहात नाहीत. आता तर आम्ही राजकारणात उडी घेतली की अमरत्वाचा पट्टा मिळेल जणू. आणि तुम्ही आमचे दिल तोडत आहात.. आमच्याहून आपल्या मातेचे शिक्षकी रक्त अंगात जास्त खेळत असावे.. आम्ही कळकळीने सांगत आहोत, अजून सुधारण्यास वाव आहे. हे चुकीचे विचार तुमचे आयुष्य बरबाद करतील. सुधारा अजून आणि ठाकूर घराण्याचे नाव मोठे करा.. एक गब्बरसिंगानंतर तुमचे नाव झाले पाहिजे.

बायाबापडे नुसता तुमचा चेहरा डोळ्यांसमोर आला की कापले पाहिजेत थरथर.. अजून वेळ गेली नाही.."

संतोकसिंगाने अजूनही कितीतरी बडबड केली. दिलदारची सकाळच्या अत्यानंदात बुडालेल्या दिलाची नौका सत्यस्थितीच्या समुद्रात बुडण्यापासून वाचवण्याचा एक प्रयत्न बाप म्हणून आणि डाकूवर्गातील एक बापमाणूस म्हणून संतोकसिंगने केला. अर्थात दिलदार मनाने तेव्हा कजरीच्या गावी, कजरीच्या जवळ होता. त्यामुळे ते शब्द पालथ्या घड्यावर पडून वाहून गेले नि दिलदार बापाच्या इतक्या त्राग्यानंतरही कोरडाचा कोरडाच राहिला. एरवी तो चिडला असता. संतापला ही असता कदाचित. दोघांची खडाजंगीही झाली असती. पण आज त्याला कसलाच फरक पडणार नव्हता. वैतागून संतोकसिंग निघून गेला नि दिलदार शांतपणे उद्याच्या तयारीला लागला. तयारी म्हणजे मानसिक तयारी.. कजरीशी काय काय बोलायचे हे ठरवणे.. तिला अजून एखादी चिठ्ठी लिहावी का? ते ठरवणे.. कजरी विचारानंदात बुडून जाणे..

रात्री दिलदार मोठ्या अपेक्षेने झोपी गेला. हुकुमी स्वप्नात कजरीचा हुकुमी प्रवेश व्हायलाच हवा.. पण मध्यरात्र काय की पहाट काय.. आज स्वप्न पडले पण ते कजरीचे नाही.. तर संतोकसिंग त्याला घोड्यावरून कुठल्यातरी गावात डाका टाकायला घेऊन जात होता.. लहान मुलांना शाळेत बळजबरी सोडतात तसे. दिलदार नाही नाही म्हणत असतानाही संतोकसिंगाने त्याच्या खांद्यावर बंदूक दिलेली.. शेवटी नाइलाज को क्या इलाज म्हणत दिलदार जायला निघतो..

घोड्यावरून टापा टाकत दिलदार ऐटीत निघालेला .. लोक सगळीकडे स्तब्ध उभे.. त्याला घाबरून.. दिलदारचा गुलजार चेहरा हळूहळू उग्र होत जातो.. हवेत दिलदार चार गोळ्या झाडतो.. इतक्यात समशेर धावत येतो सांगत.. सरदार, कोणीतरी कजरी नावाची मुलगी भेटायला आलीय..

.. स्वप्नात कजरीचा प्रवेश होणार इतक्यात त्याची झोप मोडली.. घामाने डबडबून तो उठला..

पहाटेचे असो की नसो, हे स्वप्न काही खरे होणार नाही. आणि असे व्हायला लागले तर मात्र काही खरे नाही .. संतोकसिंगाने त्याला बळजबरीने डाकूत्व बहाल केले तर पर्याय कोणता? आजवर कजरीबद्दलचे प्रश्न डोक्यात घर करून असायचे.. त्यात हा नवीन .. अजून एक प्रश्न! प्रश्नांची संख्या वाढतेय.. उत्तर कोणाचेच ठाऊक नसावे?

सकाळी नदीत स्वत:ला घासूनपुसून काढताना विचार आला त्याच्या मनात .. कजरीला चिठ्ठी वाचून काय वाटले असेल? चार शब्दांची चिठ्ठी .. तिने वाचलीच नाही तर? पण ज्या पद्धतीने तिने ती चिठ्ठी लपवली, ती वाचणारच ती चिठ्ठी एवढे नक्की. मग तिला काय वाटेल? रागावेल की आतुरतेने दुसऱ्या चिठ्ठीची वाट बघेल? आरशासमोर उभा राहून स्वतःला न्याहाळताना मागून समशेर येऊन कधी उभा राहिला त्याला ध्यानातही आले नाही.

"बन ठन के चली.. दूल्हे राजाकी सवारी .. गुलजार तू दिलदार .. करके रूप संवार .. अब होंगे सायकल पर सवार .."

"चुप रे.. काल सरदार आलेले.. लंबेचौडे प्रवचन दिले.. डाकूपंथ सोडून वाममार्गी लागू नको म्हणाले .. त्यात नवीन ते काय म्हणा.."

"मग तू काय करणारेस..?"

"समशेर, तुला म्हणून सांगतो.. माझी आई गेली ना तेव्हा तिला मनातल्या मनात मी वचन दिलेय.. मी डाकूगिरी करणार नाही. तिला शेजारच्या कुठल्यातरी गावातून जबरदस्ती पळवून आणलेले.. पूर्ण आयुष्य फक्त माझ्यासाठी तिने जंगलात असे काढले. मी तिला दिलेले वचन पाळणार. तिने मला तसे सांगितले नाही कधी. पण तिची इच्छा तीच असणार. आणि आपले तर असे आहे.. मेरा वचन गंगा की कसम .."

"पण तुझ्या वचनाबद्दल तर कोणालाच ठाऊक नाही."

"भले ते कोणालाच ठाऊक नसेल.. मला स्वत:ला तर ठाऊक आहे. आईला ठाऊक असणार, इकडे या जंगलात मला डाकूगिरी सोडून जगण्यासाठी दुसरे काहीच करण्यासारखे नाही. म्हणून तिने ते वचन घेतले नसणार. पण मी दिलेले वचन पाळणारच. त्यात कजरी मिळाली तर अधिक उत्तम .."

दिलदारच्या मनातील विचारचक्रे सायकलीच्या चाकाबरोबर फिरत राहिली. हातात वेशांतर म्हणून घेतलेल्या चिठ्ठ्या नि कजरीला परत लिहिलेली चार शब्दांची चिठ्ठी .. कालच्या चिठ्ठीतला मजकूर आठवून त्याला खुदकन हसू आले.. त्यात

लिहिलेले एवढेच.. 'तू मला फार आवडतेस' .. मोजून चार शब्द.. आजच्या चिठ्ठीतही चारच शब्द.. 'खरंच.. फार म्हणजे फारच..' चिठ्ठी सांभाळून ठेवत तो गावात पोहोचला.

अशा चार शब्दी चिठ्ठीने त्याची ती मायना काय लिहावा नि शेवटी काय लिहू.. ही समस्याच सोडवून टाकली. विचार करून तो स्वतःवरच खूश झाला. गावाजवळ आला तेव्हा आज स्वागताला तोच पोस्टमन उभा असल्याचे दुरून पाहिले नि ब्रेक लावून तो मंदगतीने पुढे होऊ लागला .. त्याला संस्कृत येत असते तर तो नक्कीच प्रथमग्रासे मक्षिकापात: म्हणाला असता.. असली पोस्टमन निघून गेला नि हा नकली प्रवेशता झाला. फक्त एका व्यक्तीची चिठ्ठी ने आण करणारा.. व्यक्तीगत पोस्टमन!

१०

# द्वितीयोध्याय:!

प्रथमग्रासे माशीपतनाचा अनुभव खरोखरच येत राहिल असे दिलदारला वाटले नव्हते. म्हणजे गावाच्या वेशीवर त्याचा व्यवसाय बंधू दिसावा नि त्यामुळे सारंच बिघडू लागावे? हाती पत्रे घेऊन इकडेतिकडे न पाहाता तो देवळाबाहेर पोहोचला. सायकल उभी ठेऊन कजरी दर्शनाची वाट पाहू लागला. थोड्याच वेळात त्याला ध्यानात आले, हे असे उभे राहणे जास्त वेळ शक्य नाही कारण उभ्या उभ्या सवाल येऊ लागले,

"नवीन आलाय जणू?"

"मास्तर, शहरासून चिठ्ठी आली का?"

"सकाळची डाक कितीला निघते?"

"मास्तर, गाव कोणतं तुमचं?"

असल्या प्रश्नांचा मारा चुकवायचा असेल तर इथे थांबून चालायचे नाही.. तो देवळात शिरला. घंटी वाजवून देवीला आल्याची वर्दी दिली. एक डोळा आतून कजरीदेवीचे दर्शन होते का यावर ठेवत तो हात जोडून उभा राहिला. कजरीचे काही चिन्ह दिसेना.. आता काय करावे? आजवर तो साधा गावकरी म्हणून बिनकामाचा कितीतरी वेळ काढायचा. आता पोस्टमन म्हणून तसे करणार कसे? काही कल्पना सुचून त्याने देवळाच्या गाभाऱ्यात मांडी ठोकली. डोळे बंद करून हात जोडून

बसला. देवीचा परमभक्त, आराधना करायला बसलेला.. मग कोण त्याच्या वाटेस जातेय .. तो उठला तेव्हा पुजारीबुवा उघडेबंब भोपळ्यासारखे पोट घेऊन समोर उभे होते .. प्रसाद वाटत. त्यांच्याकडून प्रसाद हातावर घेता घेता दिलदार मनाशी म्हणाला, सासरेबुवा, प्रत्यक्ष आपल्या जावयाला प्रसाद देताय.. ध्यानी आलेय का तुमच्या? त्याची ओळख कुणास पटून पुजारीबुवांचा दुसराच कुठला प्रसाद मिळायच्या आत तो घाईघाईत देवळाबाहेर पडला. असेही बसून बसून तो बसणार होता किती वेळ? अर्धा तास उलटला होता.. आजचा दिवस भाकड समजत सायकलीवर टांग टाकून तो निघाला.

काल नि आज.. कितीतरी फरक होता. काल कजरीच्या चार शब्दांनी कान तृप्त झालेले. तिच्या दर्शनाने डोळे निवलेले. आणि परत दुसऱ्या दिवशी ती कधी भेटणार याची हुरहुर निघतानाच लागलेली. आज त्यातील काहीच घडू नये. एका क्षणी वाटले त्याला, हे डाकियाचे सोंग टाकून परत देवळाबाहेर मुक्काम ठोकावा. पण एकूण दूरदृष्टीचा विचार करता हे धोक्याचेच होते. काल अति उत्साहाने चाललेला दिलदार आज कशीबशी सायकल रेटत होता. परतताना त्या स्फूर्तीदात्या पोस्टमनचा उद्धार करत होता.. त्याच्या दर्शनानेच सारे काही बिनसले असावे .. बिचारा तो खराखुरा पोस्टमन .. कारण नसताना उचक्या लागून बेजार झाला असावा!

पण आज कजरी का दिसू नये? कजरी मुद्दाम तर बाहेर न येता आत बसून राहिली नसेल? म्हणजे उत्तर देणे टाळण्यासाठी. म्हणजे तिचा नकार .. की काहीतरी नक्कीच समस्या असू शकते. ती कामात गुंग असेल नाहीतर अजून काही.. कदाचित

तब्येत बरी नसेल? की तिला लिहिता वाचता येत नसेल? मग कुणाला तरी चिठ्ठी दाखवली असेल .. नि तिच्या त्या खाष्ट मावशीने तिला कोंडून ठेवले असेल? पण तसे असते तर पुजारीबुवांच्या चेहेऱ्यावर तशी लक्षणे दिसली असती.. किंवा नसतील ही दिसली. त्यांच्या तुकतुकीत चेहऱ्यावर अशा ताणतणावाच्या रेषा उमटावयास जास्त वाव होताच कुठे? अशा ढोलासमान पित्याच्या पोटी कजरीसारखी नाजूक सुंदरी जन्माला यावी? निसर्गाचे नियमच असे न्यारे..

दिलदार पोहोचला तेव्हा संतोकसिंग सगळ्या टोळीचे बौद्धिक घेत होता. टोळीतील सर्वांनी कसे अधिक दृढ निश्चयाने काम केले पाहिजे आणि टोळीचे नाव उज्ज्वल केले पाहिजे याबद्दल प्रवचन सुरू होते. अर्थात स्वतः सरदारपुत्राचे बेजबाबदार वागणे ही सरदार संतोकसिंगची दुखती नस होती. पण तसे उघड सांगण्याची टोळीतील कुणाची हिंमत नव्हती. नाहीतर कुणी उपदेश करे लोकां.. शेंबूड आपल्या नाका म्हणाला असता तर चुकीचे झाले नसते. संतोकसिंगचाही नाईलाज होता. आजचे प्रवचन, बौद्धिक आणि व्याख्यान संपवून त्याला परत शहरात राजकीय पक्षाच्या पंखाखाली जायचे होते. आता तर आपलाच मुलगा असा उडाणटप्पू निघाला म्हटल्यावर राजकीय आश्रय अधिकच महत्त्वाचा होता. दिलदार ते भाषण ऐकत बसला.. आज तो स्थितप्रज्ञावस्थेत पोहोचलेला.. त्यामुळे सोने आणि माती समान ते चित्ती या प्रमाणे डाका आणि देवपूजा समान ते चित्ती म्हणत ऐकत बसला. संतोकसिंगने भाषण संपवले नि दिलदारकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून तो निघून गेला. सगळे टोळीकर गप्प होते. दिलदारही आपल्या तंबूत परतला.

आजचा दिवसच असा.. प्रथम घासातच नव्हे तर सबंध जेवणातच मक्षिकापतन सुरू असावे जणू.

समशेर पाठोपाठ आलाच ..

"आज काय? ठीक दिसत नाही?"

"काहीच ठीक नाही यार.."

"का? ती सरळ नाही म्हणाली?"

"ती? नाही म्हणायला दिसली तर पाहिजे. मी पोस्टमनच्या वेशात कितीवेळ थांबणार. तरी अर्धातास देवळात जपजाप करत बसलो. सासऱ्याच्या हातून प्रसाद घेतला नि मग निघालो .."

"सासरा? मग इतका तोंड पाडून का बसलायस?"

"कजरीचा पत्ता नाही. माझी चिठ्ठी कोणाच्या हाती पडली नि तिला कोंडून तर ठेवले नसेल?"

"असं काय होते चिठ्ठीत?"

"तू नाही समजणार. त्यासाठी बंदुकीच्या ऐवजी हातात लाल गुलाबाचे फूल हवे.. माणसं मारण्याऐवजी .."

"बस.. कळलं.. इतकेच की आज भाभीदर्शन झालेले नाही. डाकियाबाबू हात हलवत परतले.. त्यात आल्या आल्या सरदारांचे भाषण.. थोडक्यात दिलदारच्या दिलाचे काही खरे नाही.. पण तिने अजून नाहीतर नाही म्हटले. मग इतका कोमेजलेल्या जास्वंदाच्या फुलासारखा का आहेस तू?"

"जास्वंद आणि मी?"

"अर्थात. अरे गुलाब वगैरे भाभीसाठी राखून ठेवलेस तू.. तर तू जास्वंदीसारखा.. सध्या कोमेजलेला .. पण आपला उसूल आहे यार.. जोवर सारे संपले नाही तोवर त्याला शेवट म्हणू नये.. थोडक्यात तुझ्या प्रेमप्रकरणात धुगधुगी अभी बाकी है मेरे दोस्त!"

"ते मला ठाऊक आहे. पण आजचे काय? तिला न बघता एकेक तास मुश्किलीने जातो मग दिवसाचे काय? आता उद्या परत ती नाही दिसली तर?"

आजचा दिवस ढकलला गेला. शक्य असते सूर्यास लवकर मावळून लवकर उगवायला सांगितले असते. पण सूर्यचंद्र वगैरे आपल्या मर्जीचे मालिक.. त्यामुळे चोवीस तास वाट पाहाणे आले. काल हुकुमी स्वप्नाने दगा दिलेला.. तर आज स्वप्न न पडले तरच बरे.. पण स्वप्न पडायला डोळ्याला डोळा लागावा लागतो.. इकडे दिलदार तळमळत पडलाय.. केव्हातरी तो झोपला. उठला तो थेट समशेरच्या हाकेमुळे. तयार झाला.. नदीत डुंबून लागोपाठ तिसऱ्या दिवशी अंघोळ करण्याची वेळ खूप दिवसांत पहिल्यांदाच आलेली. त्यामुळे त्याचा मूळ रंग पाण्यात विरघळून जातो की काय असे वाटायला लागलेले. सायकलीवर निघताना आज तरी कजरी भेटू देत.. एवढाच विचार नव्हता, तर कालचा तो मक्षिकापतनास निमित्त डाकिया आजतरी दिसू नये हा ही होता.

कालचा दिवस भाकड गेल्यावर आजतरी कजरी दिसेल अशी आशा.. माशीरूपी पोस्टमन न दिसूनही फोल झाली. आजही जपजाप्याचेच पुण्य गाठीस पडले. भावी सासऱ्यांच्या हातचा प्रसाद मिळाला. देवी दर्शन झाले. चार

गाववल्यांनी इकडतिकडची खबरबात विचारली.. पण ज्या कामासाठी हा मार्ग धरला ते कजरीदर्शन मात्र नाही झाले ते नाहीच. दिलदार उदास मनाने परतला. फक्त आज संतोकसिंग परत गेल्याने टोळीतील वातावरण सैलावले होते. हेडमास्तर शाळेत फिरत असतील तर चिडीचुप शातंता नि त्यांची पाठ वळली की दंगा.. असे टोळीतील सर्वांचे झाले होते. एरवी ही सरदार हल्ली शहरातच जास्त असायचे, तेव्हा टोळी इमानेइतबारे कामे करायची. पण सरदार परतून आले नि गेले की टोळीतील सर्वांना शाळेला सुट्टी झाल्यासारखा आनंद व्हायचा. त्यात दुर्मुखलेला तो एकटा दिलदार.. समशेरने त्याला विशेष काही विचारले नाही. दिलदारही आपल्या तंबूत आपल्या अधांतरी भविष्याबद्दल विचार करत बसला.

पुढे काही दिवस थोड्याफार फरकाने हीच गोष्ट होत राहिली. रोज रोज प्रसाद घेऊन परतताना खरा कजरीचा प्रसाद कधी मिळेल यावा विचार करत दिलदार सायकल दामटत असे. त्या आठ दहा दिवसांत झाले ते इतकेच.. तीन वेळा सायकलीच्या टायरांत हवा भरावी लागली. कशी कोणास ठाऊक पण सायकलीची घंटी बिघडली.. आणि ती दोन नंबरची चार शब्दी चिठ्ठीच डिलिव्हर न झाल्याने पुढे लिहावे काय नि कसे हा प्रश्न दिलदारला पडेनासा झाला.

शेवटी दिलदारच्या मनाने घेतले ते हे की, कजरीला घरात डांबले गेले आहे.. नि काही करून पुजारीबुवांच्या घरात प्रवेश करून तशी खात्री करणे आणि तिची सुटका करणे हे त्याचे परम आणि आद्य कर्तव्य आहे. पण पुजारी निवासात प्रवेश कसा होणार? पोस्टमन भले असो लाडका सर्वांचा.. पण म्हणून त्याला कोणी घरात

बसवून घरातील चार गोष्टी सांगत बसत नाहीत. पोस्टमनशी जिव्हाळा असलाच तर फक्त दिवाळीचे पोस्त देण्यापुरता. कोण शिरू शकेल त्या देवळापाठीमागच्या त्या घरात?

दिवसभराच्या धावपळीतून थकला भागला समशेर तंबूत आला.. भर मध्यरात्री काही गंभीर विचार विनिमय झाला.. भर रात्री दूर गावची मोहिम आखली गेली.. तीही दिलदारच्या संमतीने. कजरी प्रकरणात दुसरा अध्याय लिहिण्याची तयारी सुरू झाली.. अर्थातच त्यामागे मेंदू समशेरचा. अशा मोहिमा आखताना विचार करायचा तो सर्व बाजूंनी ही सवय त्याला इकडे उपयोगी पडली.. दुसऱ्या दिवशी सकाळी वेडात दौडले टोळीतील सात आठ वीर.. अर्थात दिलदार मागेच राहिला. गुरुदासपूरात डाका पडला ..

११

# केल्याने वेशांतर

गुरूदासपूर तसे मोठे गाव. नदीतीरावर वसलेले, त्यामुळे सुपीक जमिनी, हिरवी शेते आणि पोटापाण्याचा प्रश्न सुटून आलेल्या सुबत्तेच्या पाठोपाठ लोकांना मग खुणावू लागते ती कला नि कलाकारी.. दशावतारी नि नौटंकीचा मिलाफ असणारी कला तिथे सादर होई. आणि सर्व पात्रे साकारणारा मेकपमॅन ही त्याच गावचा.. हिंमतलाल. समशेर त्याचे नाव ऐकून होता.. नि मग गुरूदासपुरातून येता येता हाती लागेल तसा एक ज्योतिषी .. कुडमुड्या असेल तर अधिकच उत्तम .. दोघांना उचलून आणायचे.. दिलदारची सक्त ताकीद .. हिंसेच्या बळावर आणून चालणार नाही. प्रेमाने समजावून तर ते येणार नाहीत. समशेरच्या गाठीशी तसा मास्तरांना उचलण्याचा अनुभव होताच.. त्यात ही नवीन भर!

- आणि मग दुपारपर्यंत हिंमतलाल आणि एक रस्त्याच्या कडेला बसलेला ज्योतिषी भैरव, दोघे डोळ्यांवरच्या पट्ट्या कधी निघतील याची वाट पाहात दिलदार नि समशेरच्या समोर उभे होते!

डोळ्यावरच्या पट्ट्या निघाल्या तेव्हा हिंमतलाल नि भैरव दोघेही थरथर कापत होते.. समोर दोन डाकू.. समशेरचे एक ठीक होते. दिलदारला अशी त्याची गणती डाकूंत केलेली आवडणार नसली तरी प्रेमात सारे क्षम्य म्हणून त्याने याबद्दल स्वतःच

स्वतःला माफी दिलेली. डोंगरदऱ्यातील संतोकसिंग टोळीचा लौकिक दूरवर पसरलेला. पण आपल्याला पळवून ह्या टोळीबहाद्दरांना काय मिळणार? बहुतेक त्यांचा गृहपाठ चुकला असणार .. असा विचार येईतोवर दिलदारचा आवाज कानी पडला..

"भैरव.. पंडित भैरवलाल, ज्योतिष सांगणार .. नक्की सांगणार की.."

भैरव त त प प करत म्हणाला,"मी साधा कुडमुड्या ज्योतिषी .. चूक झाली असेल तर माफ करा.."

"चूक? कसली चूक?"

"काय करणार? पोटापाण्याचा व्यवसाय आहे हुजूर .. करावं लागतं.. भविष्य सांगावं लागतं.. लोकांना आवडेल ते नाही सांगितले तर कोण देईल पैसा? दिवसभर रस्त्याच्या कडेला बसून पाय आखडतात. धुळीचा त्रास अलग. पण नाईलाज आहे हुजूर .. घरी छोटे छोटे बालबच्चे आहेत.."

"भैरव.. गप्प .. तू या दिलदारला ज्योतिष विद्या शिकवायची. ती ही आज आणि उद्या.. दोन दिवसांत .."

"दोन दिवसांत?"

"दोन दिवसांत शिकवून तयार करायचे याला. खराखुरा ज्योतिषी वाटायला हवा.."

"हुजूर पण तुम्ही माझ्याच गावात ज्योतिषी म्हणून येणार? माझ्याच पोटावर लाथ मारू?"

"तुला काय वाटतं? हा डाकूगिरीचा चांगला व्यवसाय सोडून आम्ही तुझ्या गावात ज्योतिष सांगणार म्हणून रस्तोरस्ती फिरू? स्वतःचे भविष्य तरी पाहायचे होतेस."

"पण खरं सांगतो हुजूर .. मला सोडून द्या.. मला ज्योतिष विद्या येत नाही .. हे ज्योतिषीपण फक्त पोटासाठी .."

"ज्योतिष विद्या? पोटासाठी? आमची बात अलग.. आम्हाला शिकायची त्या ह्रदयासाठी."

"ह्या दिलदारला ज्योतिष विद्या नाही, फक्त ज्योतिष भाषा शिकायची आहे.. ह्याला फक्त ज्योतिष्यासारखे बोलायला शिकवायचे.. गुरूचा उंचवटा नि शनिचा कोप.. प्रकोप .. सप्तमातला चंद्र आणि दशमातला सूर्य.. असलं काहीतरी .."

"कशासाठी हुजूर?"

"दिलदार.. सांग कशासाठी .."

"भैरव.. नस्त्या चौकशा नकोत. तू फक्त मला ज्योतिषी भाषा शिकव.. जलदीने .. वेळ कमी आहे.. ती शिकवलीस की परत तू तुझ्या रस्त्यावर येशील. हा समशेर तुला सोडून येईल. घोड्यावरून.. तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही .. दिलदारचा शब्द आहे हा.."

"धन्यवाद हुजूर .. डाकूलोकांचं वचन म्हणजे गंगा मैया की कसम.. ऐकून आहे मी.."

"छान. त्या गंगा मैयाची शपथ घेऊन असे शिकव की दुसऱ्या कुणा ज्योतिषालाही ओळखू येऊ नये.."

"जी हुजूर. शिकवतो.."

हिंमतलाल हे कसलं नवीनच नाटक होऊ घातलंय याचा विचार करत बाजूला उभा होता. पण या नाटकात आपली भूमिका काय याचा त्याला पत्ता लागत नव्हता. पण ज्या पद्धतीने दोघे बोलत होते, बहुधा मामला वेगळाच काही असावा आणि बहुधा जिवाला तरी धोका नसावा असेच त्याला वाटत होते. तरीही प्रत्यक्ष गावोगावी ज्यांच्या नुसत्या नावालाही लोक घाबरतात त्या डाकूंच्या टोळीने अपहरण करावे.. भीती तर वाटणे स्वाभाविक होते.. तोंडाने शब्द न काढता तो उभा होता..

"आणि तू हिंमतलाल.."

"जी हुजूर .. काही चुकी झाली तर माफी.. मला बालबच्चे नाहीत.. पण माझी सगाई झालीय.. नंतर बालबच्चे होतील.. त्यांचा विचार करून मला सोडून द्या सरकार .."

"गप बस.. ह्या दिलदारकडे नीट बघ.."

"कशासाठी हुजूर?"

"आता याला ओळखता येणार नाही असा ज्योतिषी बनवायचा आहे.. स्वतः त्यालाही आरशात ओळखू येऊ नये असा.. फक्त दाढीमिशा नि केस दे..'

"कशासाठी हुजूर?"

"तोच प्रश्न परत परत? चौकशा नकोत. कपडे सांग.. समज नाटकाचा मोठा शो आहे.. आणि मेकप सोपा पाहिजे.. नाहीतर गाठ माझ्याशी आहे.."

"आता करून देतो हुजूर .."

"आता नाही .. उद्या. तोवर त्या तंबूत बस.. पळून जायचा प्रयत्न करू नकोस .. उद्या तुला मीच सोडून येईन .."

"जी हुजूर .."

"तोवर या दिलदारची शिकवणी सुरू होईल.."

"पण हे सगळे हुजूर कशासाठी?"

"परत विचारलेस?"

"नाही, पोलिस मागे लागतील माझ्या? माझे तर अजून लग्नही नाही झाले. अजून वय तसे झाले नाही .."

"आता बडबड करशील तर.. तुझा ओरिजिनल मेकप बिघडवून टाकेन.."

"समशेर.. शांत.. हिंमतलाल.. आणि भैरव.. इकडे तुम्ही शांतपणे आपले काम करा.. उद्या दोघे आपापल्या गावी असाल.. फक्त मला ही ज्योतिषभाषा शिकव.. कोणाला शंका येऊ नये की मी ज्योतिषी नाही इतपत.. आणि हिंमतलाल, अशी दाढी दे लांब नि केस की कोणी ओळखू नये.. तुमच्यावर पुढचे सारे अवलंबून आहे.."

हिंमतलाल आणि भैरवलाल.. दिलदारच्या प्रेमकहाणीतील पुढच्या भागात येऊन जाणारी पाहुणे कलाकार मंडळी. भैरवला भीती होती ती त्याचे तोकडे ज्ञान उघडे पडण्याची .. पण दिलदारला ज्ञान नकोच होते. हवी होती ती ज्योतिषाची परिभाषा. अगदीच कोणासमोर आपले अज्ञान उघडे पडून भांडे फुटू नये इतपत. चार दोन ग्रहांची नावे घेतली की कोणाचाही ग्रह व्हावा की हा ज्योतिषी आहे. भैरवलाल कुंडली उघडून बसला. त्यातील ग्रहांना वाटून दिलेली घरे.. समजावून सांगू लागला. एकेक ग्रह असा आपल्या चौकटीतल्या गृहात कसा राहात असेल? कुंडली काही दिलदारच्या पचनी पडेना.. त्यापेक्षा हस्तसामुद्रिक बनणे बरे.. नाहीतर चेहरा वाचन.. किंवा खरेतर दोन्ही. म्हणजे कजरीला समोर ठेऊन भविष्यकथनाच्या निमित्ताने बघत राहता येईल.. तिच्या खोल खोल डोळ्यांत बघत बसावे.. आणि हात हाती घेऊन

त्यावरील रेषा बघाव्यात .. मग भविष्य उज्वल असणारच.. हे सांगायला कोणी ज्योतिषी कशाला हवा? हिंमतलाल हिंमत एकवटून सारे पाहात अंदाज लावण्याचा प्रयत्न करत होता.. एकदा तयारी झाली की ज्योतिषाच्या वेशात पुजारीबुवांच्या घरावर चढाई करायची आणि कजरीचा ठावठिकाणा शोधण्याचा प्रयत्न करायचा.. या वेशांतराच्या नाटकामागे असे काही नाटक असेल असे त्या नाटकातील मेकपमॅनच्या मनात मात्र येणे शक्य नव्हते हे खरे..

भैरवकडून मग ज्ञानाचे तुषार गोळा केले गेले.. हिंमतलालने मोठ्या हिमतीने केसांचा टोप नि दाढी बसवली.. ती काढावी नि घालावी कसे ते शिकवले. दोन दिवस त्या जंगलातील पाहुणचार घेऊन झाला. डोळ्यांवर पट्ट्या बांधून दोघांची पार्सले सुखरूप गुरुदासपुरी रवाना करण्यात आली.

मग रात्रभर दिलदार चंद्र सूर्य आणि ग्रहताऱ्यांची नावे घोकत बसला.. हाताच्या रेषांची नावे नि त्यांचे हातावरील जाळे .. त्याबद्दल असंबद्ध वाटू नये इतपत बोलता येणे आवश्यक.. बाकी ऐन वेळेची कसरत.. वेळ निभावून, नाहीतर मारून नेणे महत्त्वाचे .. बाकी समशेर म्हणतो तसे.. 'रघुपति राघव कजरी कजरी' आणि काय!

त्यानंतर दिलदार गाढ झोपी गेला.. सात पिढ्यांत कोणी असे वेशांतर केले नसावे. पण दिलदार ते करणार होता. त्यासाठी शांत डोके असणे महत्वाचे. म्हणून जास्त विचार न करता दिलदार अंथरूणावर पडलस. कजरी आख्यानाचा दुसरा अध्याय सुरू होणार होता..

१२

# आचार्य!

आज सकाळी दिलदार उठला.. चार दिवस मध्ये उलटून गेलेले. आता तो ज्योतिषी बनून पुजारीबुवांच्या घरात घुसायला तयार होता. समशेर त्याला तयारी करून देत होता. ज्योतिषी म्हणून सायकलीवर जाऊ शकत होता तो, पण गावात कोणी ओळखली सायकल तर पंचाईत. म्हणून समशेर बरोबर घोड्यावरून स्वारी निघाली. गावाबाहेर समशेर थांबून राहिल नि तोवर दिलदार आपला पराक्रम गाजवून येईल..

"आज तरी काम होऊ दे तुझे.."

"तुला इतकी माझी काळजी रे समशेर.."

"तुझी नाही, स्वतःची काळजी. नाहीतर अजून काही दिवसांनी अजून नवीन काही.. नाही, अजून नव्या कोणाला तरी पळवून आणायला सांगायचास तू.. गुरुजी झाले.. आता हे दोघे.. पळवून आणायचे पण मारायचे नाही ना काही खंडणी गोळा करायची.. डाकूपणाला काळिमा फासण्याचे काम हे. दरोडेखोर असूनही ही असली कामे करायला सांगतोस?"

"नाही, दरोडेखोर आहेस म्हणूनच ही कामे सांगतो.."

"अशाने काय पत राहिल आमची?"

"पत? अरे सोहनी महिवाल नि हीर रांझा यांच्या बरोबरीने दिलदार कजरीची प्रेमकथा लिहिली जाईल. वर्षानुवर्षे लोक ऐकतील. त्यात तुझा सहभाग असेल.

आमच्या प्रेमकथेत तू अमर होशील.. विचार कर.. दिलदारचा यार समशेर.. या प्रेमकथेचा प्रत्यक्ष साक्षीदार.."

दिलदार गावात पोहोचला. देवळात पूजेची वेळ होती. ती संपेतोवर आपल्या पिशवीतल्या चोपड्या उघडून धोतर सांभाळत बसावे लागले त्याला. जाणाऱ्या येणाऱ्यांकडे न बघता तो बसून राहिला. न जाणो कुणी खरेच भविष्य बघायला येऊन बसायचा.. तरीही दोघे तिघे येऊन पुढ्यात बसलेच. पण त्याने वाचनात दंग असल्याचा अभिनय चांगला केला नि ते कंटाळून निघून गेले. पूजा संपली. आपल्या पोटाचा ढोल घेऊन पुजारीबुवा जायला निघाले .. पाठोपाठ दिलदार उठला.. आता परीक्षा सुरू होत होती. चार दिवसांच्या मेहनतीचे फळ मिळेल की नाही? कमीतकमी त्याची बुलबुल कैद में आहे की नाही हे तरी कळू शकेल. थोड्या हुशारीने केले सारे की होईल काम..

पुजारीबुवा घरात शिरले. दरवाजा ठोठावत दिलदार पुढे झाला..

"प्रणाम गुरूजी."

उघडेबंब पुजारीबुवा पुढे येत म्हणाले ..

"कोण आपण?"

"हम काशी के पंडित .. सामुद्रशास्त्र पारंगत.. हस्तसामुद्रिक .."

"अहो भाग्यम्.. अहो भाग्यम.. यावे यावे .. आपले नाव?"

दिलदार अडखळला. त्याने नावाबद्दल विचारच केला नव्हता. बाकी बोलण्याची भाषा बदलली, अवतार बदलला.. ऐन वेळी नाव काय सांगावे..

"सब हमें आचार्य कहते हैं. पचास साल सामुद्रिक शास्त्रमें बिताए हैं."

"आचार्य.. पण आपले पूर्ण नाव?"

"आचार्य दिलजारलाल. काशीवाले.."

माहिती असलेल्या नावांची तोडफोड करत कसेबसे नाव बनवले त्याने नि एकाएकी सावरून घेत विषय बदलला,

"हमें संदेसा आया. देवीने कहकर यहांपर भेजा है. मौर्यागुरूजी अति पुण्यशील व्यक्ति हैं. उनके यहांपर जाकर उन्हें सलाहकारी की जरूरत हो तो मदद करना.. इसलिए काशीसे आया हूं.."

"आमचे भाग्य थोर. म्हणून तुमचे चरण आमच्या घरास लागले.. बसावे आचार्य.. दूध आणि केळी आणतो.."

मटण आणि कोंबडीच्या तामसी खाण्यापुढे हा दूध केळयाचा सात्विक पोषक आहार? पण प्रेमात काहीही करावे लागते.. कजरी तुझ्यासाठी मी दूधही पिईन आणि केळीही खाईन..

पुजारी आत निघून गेले. दिलदार आजूबाजूस निरखून पाहू लागला. पुजाऱ्याचे असावे तसे घर. वाडाच म्हणावा. यातील एखाद्या खोलीत कजरी लपली, नव्हे लपवली गेली असेल? एकाएकी विचार आला.. वास्तुशास्त्र .. कजरीचा पत्ता लागलाच नाही तर वास्तुशास्त्राचे निमित्त करून घरभर फिरून घ्यावे. तशी वास्तुशास्त्राची जुजबी माहिती करून घेतली असती तर बरे झाले असते. त्यातल्या त्यात भैरवलाल ज्योतिषी म्हणालेला काहीतरी .. दिशांबद्दल. त्यावर आधारित काहीतरी करावे लागेल.

दूध आणि केळ्यांचा सात्विक आहार आला. कोणी एक बाई घेऊन आल्या.. पाठोपाठ पुजारीबुवा.

"हे आचार्य. आचार्य लाल. काशीवरून खास आलेत.."

"सामुद्रिक. विवाह स्पेशालिस्ट."

हे विवाह स्पेशालिस्ट त्याला ऐनवेळी सुचले. असे काही तात्काळ सुचत राहिले तर किल्ला सर होईलच .. दिलदार मनातून खुश झाला.

"ही माझ्या मिसेसची मोठी बहिण.. कुसुमावती."

"और आपके बच्चियोंकी मां?"

"दस साल हुए.. गुजर गई. ही मावशीच मुलींची आई.. आजकाल मुलींना खूप सांभाळावे लागते.."

हे कजरीला उद्देशून तर नाही? कजरीला लपवून ठेवल्याचा दिलदारचा संशय अजूनच बळावला.

दिलदार पुजारीबुवांच्या तोंडाकडे निरखून पाहात म्हणाला,

"चिंता मत कीजिए.. आपके घर से एक बेटी ब्याहकर गई.. वह सुखी होगी.. आप भी सुखी रहेंगे.. आपका चेहराही बताता है.. चेहरा मानो व्यक्तित्व का आईना है.. उसका मुआईना करो तो व्यक्ति की विशेषताएं शीशेकी तरह साफ दिखाई देती हैं.."

आपल्या हिंदीवरील प्रभुत्वावर दिलदार क्षणभर खूश झाला..

"और आपका जीवन सुखी रहेगा. पुण्यशील व्यक्तिके जीवन में भी सुखदुख तो आते रहेंगे. मगर आप धैर्यसे सबका सामना करेंगे.. दिखाईए आपकी हथेली.."

जगाच्या पाठीवर कुठेही जा.. विश्वास असो किंवा नसो.. कुणी हस्तरेषा पाहून काही सांगत असेल तर समोरचा हात पुढे करणारच.. तसा पुजारीबुवांनीही केला. भावी सासऱ्याचा हात हाती घेऊन दिलदार परत सुटला..

"आप बडे भाग्यशाली हैं. आपकी जीवन रेखा लंबी है. आपने कई संघर्षों के बाद अपना यह सन्मान हासिल किया है. और भी आपका उत्कर्ष होना तय है.. आपकी दूसरी बेटी.. उसका ब्याह और भी प्रगतीपथपर ले जाएगा.."

"सो तो है.. हमारी लीला है ही गुणी.."

लीला? ही नवीन कोण? मग कजरीचा नंबर? लीलाच्या लग्नानेच सासऱ्याचा उत्कर्ष होणार असेल तर कजरीला रोल काय उरला? मनातल्या मनात दिलदारने जलद आकडेमोड केली. उगाच गहन विचारात असल्यासारखा चेहरा करत म्हणाला,

"आपकी बेटियां.. तीन.."

"तीन नहीं दो.."

आता आली पंचाईत. दोन पैकी पहिली लग्न होऊन गेली. दुसरी लीला.. मग कजरी कुठेय?

"जो ब्याहकर गई.."

"वह मौसीजीकी कन्या. लीला माझी मोठी.."

आता आशेचा किरण दिलदारच्या मनात चमकला.

"और दूसरी..?"

बाहेरून कुणाचे बोलावणे आले तसे "आचार्य.. मैं अब हाजिर होता हूं.." म्हणत पुजारी बुवा डुलत डुलत जमेल तितक्या वेगाने पटकन निघून गेले. मावशी समोर होती.. तिचा हात पहायची इच्छा नव्हती खरेतर, पण आता वेळ निभावून नेली पाहिजे. आणि माहिती मिळण्याचा एकही स्त्रोत वाया घालवून चालायचा नाही..

"मौसीजी.. आप हाथ दिखाना चाहेंगी?"

"माझा कसला हात नि बीत. मोठीचे वडील गेले तेव्हापासून मी इकडेच. माझी मोठी बहीण. लीलाची आई.. ती पण गेली. आता भाग्यवान काय नि अभागी काय.."

दिलदार शृंगाररस निष्पत्तीच्या प्रयत्नात आलेला तर इथे हा करूणरस स्त्रवू लागला.. कमीतकमी हास्य रस तरी पाझरावा.. बोलण्याचा ओघ बदलत दिलदारने संभाषणाची गाडी वळवली..

"तो बडी बेटीका ब्याह बाकी है .."

"तिचे तर झाले.. दुसरीचे बाकी आहे.."

"लीलाका ब्याह? उसकी चिंता मत कीजिए.."

"लीलाका ब्याह नहीं.. तिची कसली चिंता.."

काही करून कजरीचे नाव यायलाच तयार नसावे?

"आम्ही चिंता नाही करत कधी. तो वर बसून पाहातो आहे. त्याच्या दरबारात सगळ्यांना न्याय आहे.. त्याच्यावर सोपवले की बघायला नको.. देवीचा आशीर्वाद आहे.. मला दररोज देवी स्वप्नात येऊन सांगते.. उद्या काय होईल ते.. त्यामुळे तुम्ही येणार हे मला आधीच ठाऊक होते.. देवीमाते, तूच सगळ्यांना सांभाळ गं.." मावशीच्या बोलण्यातून भक्तिरस पाझरू लागला.. स्वप्नात देवीने अजून काय

सांगितले याची माहिती दिलदारला हवी होती.. इतक्यात पुजारीबुवा परतले. हातात पेढ्यांचा पुडा घेऊन..

"लीजिए. आमच्या मित्रांपैकी एकाच्या मुलीचा साखरपुडा झाला काल.. मुलगी हुशार आहे. मॅट्रिक पास.. तिकडे होशियारपुरात दिलीय. दहेज नाही नि काही नाही."

"कोणाचे ठरले?" मावशीला कोणाच्या लग्नाचा पेढा खातोय हे माहिती असल्याशिवाय तो गोड लागला नसता बहुधा.

"त्या कजरीचे. होशियारपुरात.. मुलगा मोठा हुशार आहे.."

कजरी? मित्राची मुलगी? दिलदारला पांढऱ्या दाढीमागे नि केसांच्या टोपाच्या आत घाम फुटला. कजरी पुजारी कन्या नाहीच? आणि ज्याची कोणाची असेल तिचा तिकडे साखरपुडाही झाला.. ज्याचे पेढे तो हातात घेऊन खातोय? एकाएकी तो पेढा त्याला कडवट वाटायला लागला .. सारे काढून पळून जावेसे वाटायला लागले. इतकी मेहनत करावी आणि ज्या पत्त्यावर यावे तोच चुकीचा निघावा? आजवरची सगळी मेहनत पाण्यात? तरीही अजून दुसऱ्या मुलीचे नाव माहिती व्हायचे बाकी होते. कजऱ्या दोन असूच शकतात. शेवटी उम्मीदपर जीती ही दुनिया. थोडक्यात त्या द्वितीय पुजारीकन्येचे नाव ठाऊक होईतोवर धीर धरावा असे समजून त्याने आपल्याला सुटलेल्या घामाच्या धारांकडे दुर्लक्ष केले.

१३

# सब्र का फल!

आता काय करावे? दिलदार पेचात पडला. जिच्यासाठी तो आला ती पुजारी कन्याच नसावी? पण हे कसे शक्य आहे? आजवर कित्येकदा तिला इकडे पाहिलेले.. पुढे घोडे दामटत दिलदार म्हणाला,

"लीलाको बुलाएंगे तो.. हम चेहरा देखकर बता देंगे.."

लीला बरोबर कदाचित ती धाकटीपण यायची.. ती आपलीवालीच असेल तर नाव काही का असेना तिचे.. नावात नाहीतरी आहे काय?

"लीला? ती तर पाठराखीण म्हणून गेलेली. आली होती. पण परत गेलीय. येईल आठवड्यात.."

म्हणजे त्याचीवाली धाकटी पण कदाचित त्या भलीथोरलीच्या घरी, थोरलीच्या पाठोपाठ गेली असणार .. की इकडेच घरात बंद करून ठेवलीय तिला?

"वैसे फोटो देखकर भी भविष्य बताते हैं हम.. एक फोटो दिखा देंगे तो .."

दोन्ही बहिणींचा एकत्र फोटो तर असणार. त्यात मुखदर्शन झाले तर.. पुजारीबुवा आत गेले. येताना हातात एक फोटो होता.. दहा एक वर्षांची मुलगी रागीट चेहरा करून उभी होती. डोळ्यात काजळाची डबी उपडी केल्यासारखे काजळ डोळ्याबाहेर पसरलेले..

"यह लीला की है?"

"जी हां. आता लग्नात काढले पण अजून आले नाहीत. शहरातून फोटो यायला वेळ जातो खूप.."

लीलाच्या त्या फोटोत दिलदारला रस नव्हता. पण तिच्या लहान बहिणीचा विषय काढायला तो फोटो पाहणे गरजेचे होते. तो फोटो हाती घेत बारकाईने न्याहाळू लागला.

"यह बहुत भाग्यशाली लडकी है. होशियार और मेहनती."

"जी आचार्य. सो तो है. हमारी लीला कामात तरबेज. माझ्या मोठीच्या लग्नात किती कामे केली.. लीला आहे गुणाची. माझ्या बहिणीवर गेलीय.. लाडकी माझी. ज्या घरी जाईल तिथे सोनं करील." मावशी आता वात्सल्यरसात डुंबत होती.

"सही बात है. इसका भाग्य उसके पीछे जो बहन है उससे है.. जरा उसका नाम तो बताइए.."

"सही बात.. तिची बहीण जन्मली त्यानंतरच ही चालायला लागली. तोवर नुसतीच रांगायची. आचार्य तुम्ही सांगता ते खरेच असणार. झाशीचे विद्वान तुम्ही."

"रसीलाबेन, झाशीचे नाही. काशीचे .." पुजारीबुवा चूक सुधारत म्हणाले. रसीलाबेन.. त्या मावशीचे नाव. तरीच विविध रसात डुंबत असतात ..

"तो छुटकी का नाम बताएंगे ..?"

"याद आया.."

म्हणजे? छोटीला तिच्या नावासकट विसरलेले सगळे?

"याद आया? अरे बारशाच्या वेळी असेच एक गुरूजी आलेले.. अशीच दुपारी बाराची वेळ .. बारशाची तयारी सुरू होती. पाळण्यात पोर झोपलेली.. नाव ठेवणार इतक्यात ते गुरूजी आले.."

कुठच्यातरी सिनेमात असाच कोणीतरी लग्न लागायच्या ऐन क्षणी पोहोचतो आणि ओरडतो.. ठहरो.. त्याची आठवण आली दिलदारला.. सगळे काही सांगताहेत पण तिचे नाव काही घेत नाहीत.

"हो ना. रसीलाबेन. गुरुदासपूरातून आलेले गुरूजी .. काय नाव होतं त्यांचं.."

"भैरवलाल.. अजून आठवते नाव. एकदम तरूण होते.."

त्या गुरूजीचेही नाव सांगून झाले पण छुटकीचे नाही सांगणार .. आणि हा तोच भैरव असणार? म्हणजे यांच्याकडे अशी बनावट ज्योतिषी येण्याची परंपराच आहे की काय? दुनिया गोल आहे खरी, आणि खरेतर गोलमाल ही!

"तर सांगत काय होते.. पाळण्यात मुलीला झोपवलेली. माझी बहीण म्हणजे तिची आई अशी इथे उभी. तसा माझ्या बहिणीला गुडघेदुखीचा त्रास पण नारायण तेल लावायची ती.."

"महा नारायण तेल.." पुजारीबुवांनी चूक सुधारली. नसती सुधारली तर त्या तेलाने काम करणे बंद केले असते? गुरूजींचे नाव झाले.. तेलाचे नाव झाले पण त्या छोटीचे नाव.. दिलदारच्या सहनशीलतेचा अंत समीप आलेला.. पण सब्र का फल मीठा होता है.. हे एका दरोड्यात पळवून आणलेल्या पेट्यांतील पिकलेले आंबे खाताना ऐकलेले वाक्य आठवले..

"हां. महानारायण तेल. ते लावून ती अशी उभी. आमच्यात नाव कानात नाही सांगत.. नाकात सांगतात. तशीच रीत आहे."

रसीला मावशीबाई अद्भुत रसाचा शिडकावा करत बोलल्या.

"तर नाव ठरलेले एक. भैरव गुरूजी म्हणाले, ल वरून ठेवा.. मग ऐनवेळी नाव बदलले."

"फिर क्या नाम रखा छुटकी का?"

"लीला. छुटकीका नहीं.. यह बात लीला के समय की.."

दिलदारला आता रसीलाबाईंना कुठल्यातरी रौद्र नाहीतर भयानक रसात बुडवावेसे वाटू लागले..

"छुटकी तर आमची लाडाची.. शेंडेफळ."

"दिख नहीं रही कहीं.."

"वह एक जगह बैठे तो ना. खूप चुलबुली आहे ती. नादान आहे.."

"उसका फोटो हो तो उसका भी भविष्य.."

पुजारीबुवा झटकन उठून आत गेले.. फोटो घेऊन आले.

"हा घ्या.."

फोटो हातात घेता घेता दिलदारचा श्वास रोधला गेला. ती तीच की दुसरी कोणी? कोणास ठाऊक? फोटो उत्सुकतेने पाहिला त्याने.. एक दोन वर्षाची मुलगी उभी होती..

"यह है हमारी लाडली .. मालती.."

अथक प्रयत्नानंतर सापडलेल्या या छोटीचे नाव मालती निघावे? डोंगर पोखरून मालती निघावी? कजरीचे काय? ती नाहीच? नव्हती? की ती मित्रकन्याच होती जिच्या साखरपुड्याच्या पुडीतला पेढा नुकताच त्याने खाल्ला?

दिलदारच्या सहनशक्तीचा अंत झालाच. तो उठून उभा राहात म्हणाला, हम निकलते हैं अब. हमें देवीका संदेसा आया अब. निकलना पडेगा."

"आचार्यजी, थांबा. जेवून जा.."

"नहीं. हम निकलते हैं."

"परत कधी याल?"

"देवी का संदेसा आए तो हम खुद हाजिर हो जाएंगे.."

आपल्या दाढीवर हात फिरवत दिलदार उठून उभा राहिला. पाठून पुजारी आणि रसीलाबेन काहीतरी बोलत होते पण दिलदारला त्यातील एक शब्द ऐकू येईल तर शपथ..

तो देवळाबाहेर येऊन चालायला लागला.. तोच पाठून आवाज आला,

"पंडितजी..'

हा तोच आवाज.. जो त्यादिवशी कानात साठवलेला. कजरीचा आवाज? नक्कीच भास असावा. पण परत तीच हाक कानी आली.. त्याने पाहिले तर ती तीच होती! नाव काय असेल हिचे? मालती की कजरी?

"पंडितजी, जरा थांबा.."

दिलदार आता अनंत काळही थांबायला तयार होता. त्याच्या ह्रदयाची धडधड वाढायला लागली..

"पंडितजी, तुम्ही भविष्य सांगता ना?"

"हां बेटी.. क्या नाम है तुम्हारा?"

"मेरा बताएंगे?"

"क्या? नाम बताऊं तुम्हारा?"

"नाव नाही पंडितजी.. भविष्य.."

छोटीचे नाव काही झाले तरी न सांगण्याचा चंग अख्ख्या कुटुंबाने बांधला की काय?

"वह तो बताएंगे. पहले आपका नाम तो जानूं.."

"नावात काय आहे पंडितजी?"

"वह भी सच है.. तुम पुजारीजी की कनिष्ठ कन्या हो?"

"जी हां.. पंडितजी.."

ह्या प्रश्नाचे सरळ उत्तर मिळाले म्हणून दिलदार खूश झाला..

"खरंतर मी कोणाची तरी वाट पाहाते.. तो कधी भेटेल ते सांगू शकाल?"

दिलदारच्या डोक्यातली चक्रे वेगात म्हणजे अगदी विद्युत वेगाने फिरू लागली. काही दिवस ही नव्हती, ती आली नि चार दिवस तो पोस्टमन आला नाही. त्या चिठ्ठीबद्दल काही असणार .. दोन आणि दोन चार.. अतिजलद हिशेब लावत तो म्हणाला,

"चिंता मत करो बेटा.. तुम जिसकी राह देख रही हो वह कल तुम्हें यहींपर मिलेगा.."

"सच पंडितजी?"

"अर्थात. एक पल रूकना बेटी.."

त्याने किलकिले करून डोळे मिटून घेतले.. काही क्षणानंतर म्हणाला,

"तुम्हें जो भी मिलनेवाला है वह एक बहुत अच्छा आदमी है.. तुम्हारे जीवनमें वही खुशियां लाएगा.. बेटी तुम नसीबवाली हो.."

"पर पंडितजी.. वह तो सिर्फ चिठ्ठी लेकर आता है.."

दिलदारचा अंदाज खराच होता. खूश होत त्याने परत ज्योतिषाचे बेअरिंग घेतले.. उगाच डोळे बारीक करून तिच्याकडे नजर लावून तिला पाहून घेतले..

"सही. वही है जो तुम्हें सही आदमीतक पहुंचाएगा. भगवान किस रूप में आकर मदद करेंगे कह नहीं सकते बेटी. वही चिठ्ठी लानेवाला तुम्हें मंजिलतक पहुंचाएगा.."

"धन्यवाद पंडितजी.."

इतक्या घरातून हाक आली..

"कजरी.. ओ कजरी.. कुठे गेलीस..?"

"आले मावशी.." म्हणत ती निघून गेली..

ही कजरी? मग मालती कोण? काही असो, ही पुजारी कन्या आहे आणि हीच आपल्याला हवी ती आहे.. आता पुढील भाग परत डाकिया बनून पुढे!

गावाबाहेर समशेर त्याची वाट पाहात होता. दिलदार गावाबाहेर आला. त्याचे दाढीचे जंजाळ दोघांनी मिळून काढून टाकले.. आडोशाला जाऊन धोतर बदलले.. त्याचा चेहरा पाहूनच समशेर समजलेला, मोहिम फत्ते.. आणि खरेतर चेहरा वाचनाची शिकवणी घेतली होती ती दिलदारने!

१४.

# पुनर्भेट

"यार समशेरा, माझा विश्वास बसत नाही हे सगळे घडले त्यावर.. म्हणजे मी खरोखरच ज्योतिषी बनून गेलो नि कोणाला संशय न येता सगळे काम करून आलो.. आणि कजरी भेटेल असे शेवटपर्यंत वाटत नव्हते. ती भेटली अगदी शेवटी. आणि महत्त्वाचे म्हणजे ती पण पोस्टमनची वाट पाहाते आहे.."

"पण तिला कदाचित तो पोस्टमनच आवडला असेल तर?"

"तर? आयुष्यभर पोस्टमनच्या वेशात सायकलीवरून फिरत राहीन.. तू कहे अगर जीवनभर सायकल चलाता जाऊं.. उद्या पोस्टमनचे काम परत आहे.."

"मग तुझे ज्योतिषी बनण्याचे सगळे सामान देऊन येतो परत.."

"नाही दोस्त नाही. पुढे कधी कशी गरज पडेल सांगता येत नाही. सगळे साहित्य हाताशी असलेले बरे.. सध्या मात्र चलो बुलावा आया है.. कजरीने बुलाया है.. आणि मला वाटतं तिचं एक नाव मालती असावे. पाळण्यातले असणार. नाकात सांगितलेले.."

"नाकात?"

"त्यांची पद्धत तशीच आहे म्हणे. नाव ठेवताना नाकात सांगतात .."

"तेवढयात त्या बाळाला जोरात शिंका आली तर?"

"ते नाही विचारले .. उद्या विचारतो रसीलाबेनला.."

"एक ध्यानात ठेव दिलदार.. तुझा पोस्टमन त्या आचार्याला ओळखत नाही. जे आचार्यास ठाऊक ते पोस्टमनला नाही आणि दिलदारच्या दिल खोलून लिहिलेल्या चिठ्ठीत काय आहे तेही पोस्टमनला ठाऊक नाही. एकात एक बोलशील नि गोंधळ घालून ठेवशील.."

"हे खरेय तुझे. पण आज मी ज्योतिषी होऊन गोंधळ होऊ नाही दिला.. उद्या आणि नंतरही अखंड सावधान राहिन. ते गाणं आहेच.. मोहब्बत की राहोमें चलना संभलके .."

"त्या सिनेमापायी वाया गेलास तू दिलदार.. नहीं तो तुम भी थे कुछ काम के.."

"खरंय तुझं. आज कजरीशी बोललो ना.. आज मी खूश आहे.. जे हवे ते माग.. कजरी सोडून .."

रात्रभर कजरीचे विचार करत नि दिवसभरच्या संभाषणाची आठवण काढत दिलदार पडून राहिला. विचार करताना त्याला जाणवले ते हे.. कजरी मुद्दाम घराबाहेर लपली असणार, एकतर कोणी ज्योतिषी घरी आला हे तिला कसे ठाऊक? नि त्या चिठ्ठीबद्दल सगळ्यांसमोर ती विचारणार तरी कशी होती? थोडक्यात लक्षणे चांगली आहेत.. चार शब्दांच्या चिठ्ठीने चार मैलांपर्यंत मजल मारली गेली आहे. रस्ता लांबचा आहे, पण त्यादिशेने गाडी सुटली तर आहे.. आता तिचा वेग तसाच ठेवला तरी आपल्या प्रेमाच्या गावी पोहोचता येईल.. फक्त एक अडथळा आहे तो लीलाच्या लग्नाचा. तिच्याशिवाय कजरीचा नंबर यायचा नाही .. एका दृष्टीने ते बरेच आहे, जोवर लीलाचे होत नाही तोवर कजरीच्या लग्नामागे कोणी काही जात नाही. तोवर दिलदार आपले नवनवीन मार्ग शोधत राहिल. आजवर अशक्य वाटेल अशी गोष्ट

तर झाली. सासरेबुवांकडे दूध नि केळी खाऊन आला.. थोडा धीर असता तर जेवूनही आला असता.. जेवणाचे काय.. जावयाला बोलावतील तेव्हा जेवणाशिवाय थोडीच सोडणार आहेत? दिलदारच्या विचारांचा वारू असा धावत होता. विचार करता करता कजरीचा आवाज कानात परत परत ऐकू येत होता नि तिचे ते काळेभोर डोळे.. ओठांवरचे हसू आठवून दिलदारच्या तोंडावर हसू पसरत होते.. सकाळी परत नदीत डुंबताना त्याला कालची भेट तुझी माझी स्मरून कधी एकदा परत सायकलीवर स्वार होतो असे झाले .. शेवटी सायकलीवर टांग पडली.. तो धुंदीत निघाला नि थोडे अंतर गेल्यावर ध्यानात आले, त्याच्या वेशांतराचा भाग असलेली पत्रे घ्यायलाच तो विसरला..

आज सारे काही ठीक वाटत होते. तो स्फूर्तीदाता पोस्टमन दिसला नाही. मंदिराबाहेर सायकल ठेऊन तो आत शिरला. देवळातील घंटी वाजवून हात जोडून उभा राहिला. किलकिल्या डोळयांनी प्रार्थना करत उभा राहिला, कजरी येण्याची वाट पाहात. थोड्याच वेळात कजरी बाजूच्या वाटेने हळूच बाहेर पडताना दिसली नि तो बाहेर पडला. सायकलीवरून थोडा दूर जाऊन थांबला नि पाठोपाठ कजरी पोहोचली.

"किती दिवसांनी आलात?"

"मी? मध्ये आलो तर तुम्ही नव्हता. माझा तो मित्र बिचारा उदास बसला आहे. वाट पाहात.."

"ते मी गावी गेलेले. पण मला ठाऊक होते, आज तुम्ही येणार .."

"ते कसं काय?"

"काल एक पंडितजी आलेले. त्यांनी सांगितले."

"कोण?"

"मावशी सांगत होती. काशीचे आचार्य लाल कोणीतरी होते."

"आचार्य लाल? काशीचे? फार मोठा माणूस. माझ्या माहितीतले आहेत ते.. ते म्हणतात तसेच होते असे ऐकून आहे."

"आहेत. मोठे पंडित आहेत. पण गंमत म्हणजे त्यांचा आवाज अगदी तुमच्या सारखा आहे.."

"असू शकतो. एकासारख्या एक गोष्टी जगात असतात. सृष्टी निर्मात्याने दुनिया अशी बनवली आहे कमालीची .. जशा तुम्ही.."

"काय?"

"मी म्हणत होतो जशा तुम्हीच स्वतः पाहिल्या.."

पहिल्या भेटीतली तीन चार नि काल ऐकलेली काही वाक्ये.. या जोरावर कजरी दोघांचा आवाज एक सारखा आहे या निष्कर्षाला पोहोचली देखील? चांगलीच हुशार आहे.. सांभाळून रहावे लागेल. अखंड रहावे सावधान .. आणि काय?

"आणि काय म्हणाले पंडितजी?"

"अजून काही नाही."

"अरे हां.. ही चिठ्ठी. तुमची. तुम्हाला काही चिठ्ठी द्यायची असेल तर?"

"नाही. नको.. पण एक विचारू?"

"एक नाही .. शंभर विचारा की!"

"तुमचा तो मित्र..?"

"त्याचे काय?"

"नको. काही नाही .. नंतर कधीतरी .."

"हे पहा कजरीदेवीजी.."

"देवी वगैरे काय एकदम .."

"ठीक हे पहा कजरी, तुम्ही त्याच्याबद्दल तर काही विचारूच नका.. माझा मित्र आहे नि त्याचे काम करतो मी.. पण मला त्याचा स्वभाव नाही आवडत.."

"पण काल पंडितजी म्हणाले.. तो तर.."

"काय? त्यांचे काही चुकत नाही. मोठा माणूस. पण माणसाने कसे सगळे उघडपणे करावे.."

"अहो असं काय करता.. असतो एकेकाचा स्वभाव .. पण मला सांगा.."

"काय?"

"काही नाही, नंतर कधीतरी .. पण तुम्ही हरिनामपुराहून इतक्या सहज कसे काय येता?"

"यावं लागतं. मित्र म्हटल्यावर .."

"पण तुम्ही तिकडून आलात.. त्या दिवशी पण तिकडून गेलात.. म्हणजे.."

"हरीनामपुराचा रस्ता हरीनाम घेता घेता पार करतो.. त्यात ही सायकल आहे ना साथीला.."

"पण हरीनामपुर त्या उलट्या दिशेला आहे ना.. तुम्ही इकडून न जाता तिकडून.."

"ते काय आहे.. तिकडे पण एक पत्र पोहोचविले .."

"पण आजपण तिकडून आलात ते?"

कजरीचे लक्ष बारकाईने दिसतेय.. दिलदार सायकलीवरून आला तेव्हा तर ती कुठे दिसत नव्हती, पण तिला मात्र दिलदार दिसत असावा?

"तुम्ही कसे पाहिलेत? तुम्ही तर नव्हतात तेव्हा?"

"वाड्याच्या माडीवरून दिसते सारे.. मी बघत होते.."

"अहो तिकडून एक जवळचा रस्ता आहे.. डोंगरातून.."

"बाप रे!"

"का? सायकलीवरून जाता येते.."

"ते नाही हो.. पण तिकडे डाकूंचे राज्य आहे.. डाकू संतोकसिंगची टोळी खूपच धोकादायक आहे ना.. म्हणजे ऐकून आहे मी.."

दिलदारला उभ्या उभ्या घाम सुटला..

"मला तर डाकूंची भीती वाटते. कधी कोणाला लुटतील.. गावं लुटतील सांगता येत नाही. तुम्ही सांभाळून जा.. त्यांचा भरवसा नाही काही.."

"छे हो.. आणि माझ्याकडे लुटून नेण्यासारखे आहे तरी काय? जे होतं ते तुम्हाला आधीच दिलंय.."

"म्हणजे?"

"ते पत्र हो.."

"चला.. काहीतरीच.. पण सांभाळून हां. त्या डाकूंना दयामाया नसते.."

"पण त्यांत पण कोणी चांगला असेल ना हो सज्जन..?"

"सज्जन डाकू? जाऊ देत. नको त्या गोष्टी. मला भीती वाटते नुसता विचार करून. आमच्या ताईच्या गावाला गेलो ना.. त्याच्या बाजूच्या गावातून एका नाटकात काम करण्याऱ्याला पळवून नेलं होतं दरोडेखोरांनी. त्या संतोकसिंगच्या टोळीचे काम म्हणे.."

"बाप रे.. हाल करून मारले असेल नाही?"

"कोणास ठाऊक.. दुसऱ्या दिवशी परत आणून टाकले गावात .."

"बाप रे.. मग?"

"मला बाकी काय माहिती नाही .. पण तो परत आला इतके खरे.. घाबरलेला म्हणे.. काही सांगायला तयार नव्हता .."

"तुम्हाला बरे इतके सारे ठाऊक?"

"गावातील गोष्टी त्या, पटापट पसरतात .."

"हे खरेय.. बरं काही निरोप?"

"नाही काही. त्याला मी नाही भेटले. तो कशाला कोणाला निरोप देईल?"

"त्याचा नाही. तुमचा काही निरोप?"

"नाही .. परत याल तुम्ही?"

"चिठ्ठी घ्यायला येईन ना.. कधी येऊ?"

"मला नाही ठाऊक.."

"ठीक आहे.. चिठ्ठी द्यायला तर येईन.. उद्या.."

"तुमची सायकल विमानासारखी उडते का हो? हरिनामपूर इतके दूर.. जाणार कधी .. येणार कधी?"

"सवय आहे हो.. काम म्हणजे करायला हवे.. नाही का?"

कजरीचा निरोप घेऊन दिलदार सायकलीवर टांग टाकून निघाला. परत त्याच रस्त्यावरून.. संतोकसिंगच्या टोळीने कमवलेले नाव आता असे 'कामी' येत होते.. डाकूंना घाबरणारी ती.. केवढी मोठी मजल मारायची आहे.. की हा नादच सोडून द्यावा? समशेर म्हणाला तसे.. इस रात की सुबह नहीं? कजरी भेटली, बोलली.. पण आज येताना त्यामुळे अधिकच तो उदास होत सायकल रेटत परतला.. पुढे काय.. त्याला कळणे अशक्यच होते.. आजवर मोठया हिंमतीने सारे घडवून आणले.. डाकूंच्या नावाने कापणारी ती.. एका डाकूसुताशी सूत जुळवेल इतक्या सहज? करावे तर काय? नि कसे? आजवर एकही डाका घातला नसेल, नि डाकूगिरीचे करियरही करायचे नसेल.. पण तरीही ओळख मात्र डाकू दिलदारसिंग हीच राहणार ना?

१५

# भेट पहिली खडकाखाली

रात्रभर दिलदार तळमळत राहिला. बाकी टोळी कुठेतरी धाड घालायला निघून गेलेली. संतोकसिंग नव्हता तरीही बाकीचे सारे व्यवस्थित सारे पार पाडतं. संतोकसिंगच्या नेतृत्व गुणांचेच त्यातून दर्शन होत होते.व्यवस्थित लावून दिलेली शिस्त आणि टोळीची उद्दिष्टे अतिशय सुस्पष्ट असणे.. दयामाया या शब्दांना जवळ फिरकू न देणे वगैरे त्याची मूलभूत तत्वे सारेच टोळीकर कोळून प्यायले होते. सारे त्या मार्गावरून टोळीची दहशत बसवत टोळीची बरकत वाढवीत होते, तेव्हा दिलदार त्यावर हरकत घेत आपल्या दिलाची पुकार ऐकत बसलेला. त्यात आता कजरीची पडलेली भर.

कजरीच्या भेटीनंतर दिलदार अजूनच सैरभैर झाला. तिला जेव्हा दिलदारच्या मुळाबद्दल कळेल तेव्हा काय होईल? दिलदार खूप विचारात पडला. समशेर सांगायचा ते हेच होते. उगाच नसत्या फंदात न पडता पुढील विचार करावा.. ही एकतर्फी प्रेमकथा इथेच संपवावी. कजरी चार आठ दिवस पाहिल वाट पण नंतर विसरेलच. अशा विचारात तो उठला. नि स्वतःच्या नकळत तयारीला लागला. कितीही कळत असले तरी वळत नव्हते .. सायकलीवर बसून निघताना आठवले.. चार शब्दांची का होईना पण चिठ्ठी लिहायची राहिली. मागे फिरून कागदावर चार शब्द लिहिले त्याने, 'खरंच. गंगा मय्याची शपथ..'

ती चिठ्ठी जपून ठेवत परत दुचाकीवर टांग मारली. त्याची सायकल भरधाव निघाली.

मनात विचार होते, हे शक्य नाही. आणि शरीराची कृती त्याच्या अगदी उलट म्हणजे, कजरीला भेटायला आतुर असा तो. गावात पोहोचला तशी कजरी हळूच भेटायला आली. हातातील चिठ्ठी तिला दिली. चार दोन वाक्ये बोलून झाली.. आज बोलताना डाकू नि त्या गावचा विषय निघाला नाही.. कजरी त्या चिठ्ठीमुळे तशी खुशीत वाटतेय हे खरे. त्या वयात कोणाला तरी मनापासून आपण आवडतो याचे अप्रूप तर असणारच होते. दिलदार समोर असूनही 'तो मीच' हे सांगू शकत नव्हता.. छोट्या गावात अशा भेटी कोणाच्याही डोळ्यांत येतात .. त्यावर कजरीनेच तोडगा काढलेला..

"तुम्ही चिठ्ठी आणता ना.. लोकं विचारतील एक दिवस .."

"कोणाला?"

"कोणाला काय? मला किंवा तुम्हाला.."

"काय?"

"काय काय? हेच नेहमी नेहमी काय काम आहे? आणि या गावचे नसूनही पोस्टमन कुठले पत्र देताहेत? ते ही फक्त मला.."

"मग?"

"मग असे.. इथे भेटू नका.."

"पण माझ्या मित्राच्या चिठ्ठीचे काय? बिचारा काय करेल.."

"तुम्ही कि नाही नदीच्या किनारी भेटा.. संध्याकाळी. किंवा तिकडे तुम्हाला मी एक जागा दाखवीन तिकडे चिठ्ठी ठेऊन जा.. माझा आवडता खडक आहे त्याच्याखाली.."

"खडक आणि आवडता?"

"का? नसू शकतो?"

"असू शकतो. कोणाला काय आवडावे याचे नियम थोडीच आहेत..?"

"आणि कोणाला कोण आवडावे याचे देखील नाहीत. तर तुम्ही या.. मी दाखवेन.. फक्त इथून थोडे दूर आहे.. तुम्हाला इतक्या दूरवर यावे लागेल.."

"माझी सायकल आहे की.."

"पण जाताना सांभाळून हां.. त्या जंगलात .."

"तो विषयच नको.. मला पाहूनच सारे घाबरतील.."

"काहीतरीच.."

"काहीतरीच नाही. समजा मी पण त्यांच्यापैकी एक आहे.."

"म्हणजे? डाकू? की डाकिया?"

"डाकिया डाकू समजा.."

मग नदी किनारी भेट झाली. एक प्रचंड मोठा खडक होता.. त्याखाली एक गुहा तयार झालेली. समोर शांत वाहणारी नदी. पाठीमागे हिरवेगार डोंगर.. निसर्गरम्य परिसर आणि समोर कजरी सारखी रम्य बाला..

"तुमचा तो मित्र.. त्याच्याबद्दल तुम्ही काहीच कसे सांगितले नाहीत अजून .."

"तुम्ही त्याला एकही चिठ्ठी लिहिली नाहीत .. तो म्हणाला, तुम्ही काही सांगाल.. त्यानंतरच .."

"मला एक सांगा, तुमचा तो मित्र बुद्धू आहे का?"

"का?"

"काही नाही .."

एवढे बोलून ती फुरंगटून बसली. दिलदारला तिच्या फुगलेल्या गालांचा नि त्यामागील कारणाचा हिशेब लागेना .. हिने का रागवावे? थोडीशी रागातच ती म्हणाली,

"हा दगड आहे ना.."

"आहे.."

"ते मला ही ठाऊक आहे.. तर कधी मी नाही आले तर याच्याखाली चिठ्ठी ठेऊन जा.."

"पण तुम्ही आलात तरच बरे वाटेल.."

"मी घेईन ती नंतर.."

"नाही, म्हणजे चिठ्ठी कोणाच्या हाती नको पडायला .."

"ते खरंय.. पण कधी नाही आले तर इकडे ठेऊन जा.."

"आणि त्या मित्रास काही निरोप?"

"काही नाही .."

"नाही कसं? सांगा ना काहीतरी.."

"बरं, फक्त सांगा तो एक नंबरचा बुद्धू आहे.. हे सांगायला मात्र विसरू नका.."

"सांगतो.. बुद्धू तर बुद्धू .. काहीतरी निरोप तर मिळाला ना.. तो खूश होईल."

पुढील कित्येक दिवस अशी चार शब्दी चिठ्ठ्यांची वाहतूक सुरू राहिली. दिलदार लिहित होता. 'देवीने देवीस सुंदर घडवलेय.' 'रात्रंदिन आता कजरीचा विचार' 'तू न मी आणि..' अशी कितीतरी चार शब्दी प्रेमपत्रे लिहून झाली.

कजरी वाचून मनोमन सुखावत होती. दिलदार शक्य तितक्या वेळी तिला भेटत होता. मधून मधून तो संतोकसिंगचा विषय निघाला तरीही आता दिलदार तो विषय जणू नाहीच असे समजून त्यावर विचार करणे टाळत होता..

एके दिवशी मात्र 'तो' प्रसंग आला असे दिलदारला वाटले .. कजरी नेहमीप्रमाणे आली, पण हातात एक चिठ्ठी घेऊन. दिलदारच्या दिलाची धडधड वाढू लागली. काय असेल चिठ्ठीत? पहिल्या प्रेमाची पहिली चिठ्ठी .. कजरीचे पहिले पत्र.. काय लिहिले असेल? प्रिय की प्रियतम? जानम की जानू? दिलवर की जिवलग.. की अजून काही? आजवर तिला नाव ही सांगितले नव्हते. एका निनावी आशिकाला काय लिहिल ती? पाकिट हाती देत म्हणाली,

"आज माझे एक काम कराल?"

"एक कशाला.. शंभर करेन. आणि वा! माझ्या मित्राला चिठ्ठी .. तो खूपच खुश होईल.."

"नाही. चिठ्ठी त्याच्यासाठी नाही .."

"मग?"

"हरिनामपुरात द्यायची आहे.."

"हरिनामपूर?"

"तुम्ही तिकडेच आहात ना कामाला?"

"आं.. होय.. पण मी तिकडे कोणाला ओळखत नाही .."

"पोस्टमनला काय.. म्हटले तर सगळेच ओळखीचे, म्हटले तर कोणीच नाही .."

"हे खरं.. चिठ्ठी कोणाला द्यायची आहे?"

"तिकडे एक गुरूजी आहेत. हरिनाथ गुरूजी. त्यांना."

"हरिनाथ गुरूजी? हरिनामपुरात? देतो. एका पोस्टमनला काय कठीण आहे.. तसा मी ओळखतो गुरूजींना.. पण तुम्ही कसे काय ओळखता ..?"

"आधी या गावातल्या शाळेत होते गुरूजी. आम्ही लहान होतो तेव्हा. मी त्यांची लाडकी होते खूप.."

"वा! हुशार असणार तुम्ही! तशा आताही आहातच म्हणा.."

"हुशार असण्याची काय गरज? गुरूजी शिकवतील तर हा माझा खडकही शिकू शकतो.."

"खरंच? काही विशेष .. नाही इतक्या वर्षांनी गुरूजींची आठवण आली.."

"तेच. संतोकसिंगच्या टोळीने पळवून नेलेले गुरूजींना. मला कालच कळले म्हणाना. नंतर सोडून दिले म्हणे. त्या डाकूंनी बघा गुरूजींना पण सोडले नाही .. त्यांची खुशाली विचारायला लिहिले. ते काही उत्तर देतील तर घेऊन या.."

"देतो. गुरूजींची भेटही होईल."

"तुम्हाला काय वाटते? गुरूजींना पळवून त्या डाकू लोकांना काय मिळाले असेल?"

ऐकता ऐकता दिलदारला परत घामाच्या धारा सुटल्या.

"आता ते मला कसे ठाऊक? आता गुरूजी परतलेत.. एक महिन्यानी. सुखरूप. मग ठीक आहे."

"तुम्हाला ठाऊक आहे? एक महिन्यानी सुखरूप परतलेत ते?"

"छे हो, आताच तुम्ही म्हणालात ना."

"पण ते एक महिन्यानी .."

"गावात लोक चर्चा करत होते.. म्हणून."

जग इतके छोटे असावे? आता गुरूजींना भेटणे आले. गुरूजींशी बोलताना आपण कजरीबद्दल काय काय सांगितले.. नि नक्की काय सांगितले त्याला आठवेना. पण एक मात्र होते, दिलदार बाकी डाकूंसारखा नाही इतके मात्र त्यांना ठाऊक झाले होते.. तरीही डाकूच्या टोळीतील कोणीही डाकूच असायचा. आणि पूर्वजन्मीची पापं जशी हात धुवून या जन्मात त्रास देतात, तसे आपले डाकूंच्या टोळीतील वाढणे त्रास देणार .. न टोळी सोडू शकत ना टोळीला आपले म्हणू शकत.. मास्तरांसाठी दिलेले पत्र नीट जपून ठेवत दिलदार निघाला. आता खरोखरीच हरिनामपुरात जाणे आले. ते ही कजरीच्या गावावरूनच जाणे भाग आहे. ती डोंगरावरच्या रस्त्याची थाप इथे उपयोगी पडणार नाहीच.. केव्हातरी रात्री हळूच जायला हवे. आणि तिने पाहिले तर? काहीतरी थाप ठोकावी लागेल. एक थाप पचवायला पुढे थापांच्या थप्प्या रचाव्या लागतील तर!

१६

# हरिनाथ मास्तरांची भेट

आपल्या तंबूत दिलदार पोहोचला. सारा वृत्तांत समशेरच्या कानी घातला तेव्हा दिलदारला थोडे हलके वाटायला लागले. दोघांची गहन खलबतं झाली.

त्या दिवशी रात्री कजरीच्या गावात घोड्यांच्या टापांचा आवाज घुमला. सारी घरे आतून कड्याकोयंडे लावून चिडीचुप्प झाली. फक्त वाड्याच्या माडीवरून एका कवाडाला किलकिले करून कजरी पाहात होती. दोन घोड्यांवरून दोन जण चाललेले.. तिचा अंदाज खरा होता. त्यातील एक तोच पोस्टमन होता..

घोड्यावरून स्वार दिलदार विचारात पडलेला.. गुरूजी कजरीला काय सांगतील? पोस्टमन नि दिलदार .. दोघांबद्दल. आणि अजून काही.. त्यांना पळवून नेले त्याबद्दल .. पण आता इलाज नव्हता. जे जे होईल ते ते पहावे म्हणत दिलदार घोडा हाकीत होता. कजरीच्या गावातून टापांचा आवाज नाहीसा झाला. सारे गाव सुटकेचा निश्वास टाकत उठून जागे झाले नि डाकूंच्या टोळीबद्दल चर्चा करत राहिले. कजरी आपल्या अंथरूणात विचारात मग्न पडून राहिली.

दिलदार आणि समशेर गावाबाहेर घोडे सोडून हरिनाथ मास्तरांच्या गावात शिरले. सकाळी सकाळी मास्तर उठून प्रार्थना करत होते. दोघांना पाहताच ते एकदम दचकले..

"नमस्कार गुरूजी.."

दोघे त्यांच्या पाया पडले.

"तुम्ही? काय इकडे कुणीकडे? नवीन काही शिकायचेय?"

"काय सांगू गुरूजी .."

"काहीच नको सांगूस बाकी. ज्या कामासाठी आलास ते सांग."

"कजरी.."

"वा! भेटली तुला? पुढे काय? कुठवर प्रगती?"

"नाही गुरूजी. म्हणजे होय गुरूजी."

"नाही आणि होय एकावेळीस? घाबरू नकोस. हा समशेर डाकू बरोबर असताना घाबरण्याची गरज काय? हो की नाही समशेर?"

"गुरूजी तुम्ही पण.."

समशेरला काय बोलावे कळेना.

"बोल दिलदार .."

"मी आज पोस्टमन म्हणून आलोय गुरूजी .."

"पोस्टमन?"

"होय गुरूजी.."

"तू पोस्टात कधी लागलास?"

"नाही गुरूजी.. हा पोस्टात नसलेला पोस्टमन आहे.. म्हणजे फक्त एका माणसासाठी पोस्टमनचे काम करतो.. माणूस म्हणजे ती .. कजरी.."

"म्हणजे तू म्हणालास ते करून दाखवलेस.."

"नुसते करून दाखवले नाही. हा रोज चकरा मारतोय सायकलीवरून. चिठ्ठ्या लिहितोय.. स्वतःच स्वतःच्या चिठ्ठ्या पोस्टमन बनून देऊन येतो.."

"पण इकडे कसा काय?"

"चिठ्ठी घेऊन.."

"माझ्यासाठी? तुला पाठवले तिने?"

"काय आहे गुरूजी, तिला ह्याने सांगितलेय की हा हरिनामपुरातला पोस्टमन आहे. मित्राची चिठ्ठी द्यायला खास रोज कजरीच्या गावी जातो.."

"छान. चांगलीच मजल मारलीय.."

"गुरूजी, तुमच्या विद्यार्थिनीने चिठ्ठी दिलीय .. ती द्यायला आलोय."

"अरे वा! कजरीबेटीची चिठ्ठी?"

"तुम्हाला कसे कळले कजरीची चिठ्ठी?"

"तू अजून कोणाची आणणार? माझीच विद्यार्थिनी ती. हुशार आहे खूप.."

"होय गुरूजी."

"छान. इतक्यात तुला पत्ता लागला तिच्या हुशारीचा?"

"होय गुरूजी.."

"काय म्हणतेय?"

"ते नाही ठाऊक गुरूजी .. पण तिला कळलेय तुमचे अपहरण झालेले ते .. त्याबद्दल असणार.. असं म्हणाली ती .."

मास्तरांनी चिठ्ठी हातात घेतली. वाचून झाल्यावर म्हणाले,"तू वाचलेस, तिने काय लिहिले ते?"

"नाही गुरूजी. मी डाकिया फक्त. अशा चिठ्ठ्या कशा वाचेन?"

"सगळे ठीक आहे म्हणून सांग तिला.."

"तुम्ही चिठ्ठी द्याल तर ती घेऊन ये म्हणाली ती.."

"चिठ्ठी कशाला? पण हुशार आहे कजरीबेटी.. आणि चांगलीही. इतक्या वर्षांनंतर ही विसरली नाही. आठवण ठेवली तिने .."

"म्हणजे तुम्ही तिला माझ्याबद्दल काही सांगणार नाहीत. मला वाटलं चिठ्ठीत लिहून काही .."

"दिलदार .. मी तसे काहीच करणार नाही. ती तशी हुशार आहेच."

मास्तरांना दिलदारने परत आपली गोष्ट विस्ताराने सांगितली. पोस्टमन बनून तो तिला भेटतो कसा हे नि बोलण्याच्या ओघात अगदी ते ज्योतिषी बनण्याचे सोंग कसे घेतले हे ही.

"कमाल आहे दिलदार तुझी. आणि त्यासाठी परत अजून दोघांना पळवून आणलेस?"

"तो नाही म्हणत होता गुरूजी. मी म्हटले पळवून आणू. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही. पण कोणाला कसलीच इजा न करता. दुसऱ्या दिवशी दोघे आपल्या घरी .."

"म्हणून एकदम ज्योतिषी बनलास तू?"

"आणि काय करणार गुरूजी..? मला वाटले कजरीला तिच्या घरच्यांनी घरात बंद करून ठेवलेले.."

"का?"

"माझी पहिली चिठ्ठी लागली असेल हाती तर .."

"गुरूजी .. कैद में है बुलबुल म्हणत होता हा.."

"म्हणून म्हटले एकदा घरात शिरूनच पहावे. पुजाऱ्याच्या घरी जाईल तो ज्योतिषीच.."

"एकूण दिलदार तू चांगलाच गुंतला आहेस .. आनंद आहे.. आणि कजरी चांगली मुलगी आहे.."

"आणि मी?" दिलदार निरागसपणे विचारता झाला.

"वाल्याचा वाल्मिकी होतो.. तू मुळात वाल्या नाहीस ..नव्हतास. बाकी मी काय सांगू .."

"म्हणजे दिलदार तू काय वाल्मिकी होत नाहीस कधी.. झालो तर मीच होईन.." समशेर म्हणाला.

मास्तरांचा निरोप घेऊन दोघे निघाले.

"आम्ही निघतो गुरूजी.."

"या असे भेटायला मध्ये मध्ये .."

"गुरूजी, असे डाकूंना म्हणणारे तुम्हीच.. नाहीतर कोणी म्हणणार आहे असे काही कधीही?"

"समशेर बेटा.. आयुष्य असेच आहे बेटा. कठीण असते सारे काही. झालेल्या गोष्टी बदलता येत नाहीत .. विसरून ही जाता येत नाहीत. फक्त मागे सोडून देता येतात. नवे आयुष्य सुरू करता येते.. त्यासाठी लागते ती आतून इच्छा. इच्छा तिथे मार्ग निघतोच. इच्छा जेवढी प्रबळ तितकी त्यातून मार्ग काढण्याची इच्छा प्रबळ.. नाहीतर हा दिलदार.. लिहायला शिकला असता? एखाद्या म्हाताऱ्या ज्योतिषाच्या रूपात कजरीकडे गेला असता? आता अजून पुढे काय काय करेल सांगता येत नाही हा भाग वेगळा."

"खरेय गुरूजी.. दिलदारचा काही नेम नाही. आणि ते कुणाला पळवून आणण्याचे काम मी करणार.. पाप माझ्या खात्यात. आणि दिलदार नामानिराळा .."

"समशेर.. शेरच माझ्या कामी येतो नेहमी .. गुरूजी आम्ही येतो.."

"या. आणि चांगली कोणती तरी बातमी घेऊन या.."

"म्हणजे कजरीबद्दल?"

"ती ही.. आणि समशेर.. तू ही.. तुझ्याकडून.."

"नाही गुरूजी .. माझी कोणी नाही .."

"गुरूजी, हा खोटे सांगतोय.. आजकाल गुरुदासपुरात फेऱ्या वाढल्यात याच्या.. त्या नाटकातील हिंमतलालला पळवून आणले तेव्हा नजरेस पडली याच्या. मांजर डोळे मिटून दूध पिते.. पण इतरांना दिसत असते सारे.."

"तू गप रे. गुरूजी ह्याला स्वतःवरून जग ओळखण्याची सवय आहे.. आम्ही निघतो.."

समशेर आणि दिलदार घोड्यावरून निघाले खरे.. भर दुपारी कजरीच्या गावावरून जायचे.. कजरीने पाहिले तर पंचाईत.

"कजरीला दिसलो तर?"

"सांग तुझा जुळा भाऊ असणार एक.. लहान असताना हरवला .. गावच्या जत्रेत. तो दिसला असेल."

"वा! अजून एक गोंधळ."

"मग काय छानच! गोंधळात गोंधळ! विचार कर जेव्हा कजरीला तू कोण ते कळेल तेव्हा काय होईल?"

"तुला काय वाटते? काय होईल?"

"व्हायचे काय.. कजरीदेवी डाकुओंकी महारानी बनेल. संतोकसिंग टोळीच्या महाराणीपदावर कजरी देवी!"

"तू काही पण बोलतोयस .."

"आणि तू करतोयस ते? एका निरागस मुलीच्या मागे लागला आहेस. जेव्हा तिला कळेल तेव्हा बिचारीची हालत काय होईल."

"तुझं पटतेय रे. पण कळतंय पण वळत नाही. दिलदार का दिल है जो मानता नहीं. आजवर जसे एकातून एक बाहेर पडलोय .. तसेच पुढे ही होईल. ज्याने कजरी घडवली माझ्यासाठी तोच तिच्यापर्यंत जाण्याचा मार्ग ही दाखवेल .. नाहीतर गुरूजी म्हणाले असते का चांगली बातमी घेऊन या म्हणून?"

"ते गुरूजी आहेत रे.. त्यांना सगळ्यांचे चांगलेच दिसते.."

"पण तुझ्या ध्यानात आले.. गुरूजी दोन तीनदा म्हणाले, कजरी खूप हुशार आहे.. म्हणजे कदाचित तिच्या लक्षात यायला वेळ लागणार नाही. त्या दिवशी ती विचारत होती.. हरिनामपुराचा रस्ता तिकडून कुठे जातो?"

"मग तू काय म्हणालास?"

"सांगितले डोंगरातून आतून जातो जवळचा रस्ता.. आता घोड्यावर पाहिल ती.. काय करूया?"

"एवढेच? हे सोपे आहे. अरे दुसरा रस्ता आहे की.. थोडा अवघड आहे .."

"अवघड?"

"तू ठरव.. तुझ्या कजरीला तोंड देणे अवघड की हा रस्ता अवघड अधिक ते.."

"चल.. रस्ता काही प्रश्न विचारणार नाही .. कजरी विचारेल.. आणि तो दुसरा रस्ता सोडला तर अजून दुसरा कुठला रस्ता नाही.."

१७

# *मास्तरांचे कजरीला पत्र!*

मग दोघे घोडेस्वार दूरच्या रस्त्याने निघाले. इकडे सकाळचे घोडेस्वार परत येतीलच म्हणत कजरी आपल्या माडीवर वाट पाहात बसलेली.. .. ती पार संध्याकाळपर्यंत.. तिला दुसरीकडून सायकलवरून येणारा दिलदार डाकिया दिसेपर्यंत. ती झटकन नदीकिनारी आपल्या खडकाकडे निघाली.

"काय म्हणाले हरिनाथ गुरूजी?"

"ठीक आहेत म्हणाले. बरी आठवण काढलीस म्हणत होते .. पण त्यांनी चिठ्ठी नाही दिली काही.."

"आणि माझी चिठ्ठी?"

"ती दिली.."

"ती नव्हे. चार शब्दी चिठ्ठी .."

इथे अखंड सावधान असणे कसे जरूरी आहे याचा प्रत्यय आला दिलदारला. ही चार शब्दी चिठ्ठी म्हणजे काय हे ठाऊक असण्याचे त्याला कारण नव्हते .. साळसूदपणे तो म्हणाला,

"म्हणजे?"

"तुम्हाला ठाऊक नाही?"

"नाही. कसे असणार?"

"तीच, तुमच्या मित्राची चिठ्ठी .."

"तुमचा तो मित्र फक्त चार शब्द लिहितो चिठ्ठीत."

"चार शब्द फक्त? म्हणजे? कंजूस दिसतोय शब्दांच्या बाबतीत. पण तो खरेच चारच शब्द लिहितो?"

"हो ना.. पण गंमत म्हणजे पहिल्या पत्रापासून सुरूवात केली ना तर सगळी वाक्ये एकाला एक जोडून असतात.."

"हुशार दिसतोय .. शेवटी मित्र माझा आहे.."

"हुशार .. हुशार तर खरेच.. एका गावाहून दुसऱ्या गावाला पत्र पाठवायला तिसऱ्याच गावाहून कुणी मोठ्या मनाचा असा पोस्टमन मिळवला.. जो इनामे इतबारे, अगदी दिलदारपणे काम करतो.. हुशारच म्हणावा.."

तिच्या बोलण्याकडे लक्ष नाही असे दाखवत दिलदार म्हणाला,"गुरूजी म्हणाले .. तुम्ही खूप हुशार आहात म्हणून .."

"आणि अजून काही?"

"नाही. फक्त हुशारच आहात म्हणाले. त्या मित्राला विचारले तर तो अजून काही म्हणेल.. शेवटी प्रियेचे वर्णन प्रियकरानेच करावे नाही का? त्याला विचारून सांगू का?"

"विचारून? पत्र आहे की.. लिहायला. तसा तुमचा मित्र लिहितो चांगला. चारच शब्द पण नीट लिहितो. आम्हाला हरिनाथ गुरूजी असेच व्यवस्थित

लिहायला शिकवायचे. अजूनही सवय गेली नाही माझी. हा तुमचा मित्रही हरिनाथ गुरूजींचाच शिष्य तर नाही ना?"

"ते मी विचारले नाही कधी.. हरिनाथ गुरूजी पण काही बोलले नाहीत.."

"ते कशाला काही सांगतील? त्यांना माहिती आहे तुम्ही कबूतर आहात म्हणून?"

"कबूतर?"

"हो ना. मी आणि लीला तुम्हाला कबूतर म्हणतो.."

लीलाचे नाव ऐकून दिलदार थोडा गडबडला. ती कोण हे त्याला माहिती असण्याची शक्यता नाही ..

"लीला? कोण लीला?"

"माझी मोठी बहीण.."

"तिला चिठ्ठीबद्दल माहिती आहे?"

"अर्थात. माझी बहीणच नाही. मैत्रिणीसारखी आहे ती.."

"पण ते कबूतर?"

"तुम्ही कबुतरासारखे पत्र पोहोचवण्याचे काम करता ना.. म्हणून. पण हरिनाथ गुरूजींना काय ठाऊक?"

दिलदारला कळेना बोलता बोलता घसरलेल्या जिभेला कसे सावरावे? सावरून घेत पुढे म्हणाला,

"ते नाही हो.. गुरूजी काही बोलले नाहीत.. काही त्रास झाल्याचे बोलले नाहीत .. त्या डाकूंनी त्यांना काहीच त्रास दिला नाही म्हणाले .. जेवू खावू घातले नि सोडून दिले.."

"मग पळवून नेलेच कशाला? जेवू घालायला?"

"असेल ही कदाचित."

"जाऊ देत. पण आज आमच्या गावावरून दोन डाकूंसारखे कोणीतरी पहाटे पहाटे घोड्यावरून गेले.."

"तुम्ही पाहिलेत?"

"वाड्याच्या माडीवरून सगळे दिसते.."

"कोण होते?"

"उजेड कमी होता म्हणून नीट दिसले नाही. संतोकसिंगाची माणसं असतील.. कारण आली ती त्या बाजूने. पण नसतील ही. बंदुका नव्हत्या हातात. कसला दंगा नाही, काही नाही. त्या टोळीला असे शांतपणे जायची सवय नाही .. तुम्हाला कधी रस्त्यात भेटली नाहीत त्यांची माणसं?"

"अं.. कोणाची?

"कोणाची काय? त्या डाकूंच्या टोळीतील."

"नाही. आणि माझ्या वाटेला जाऊन काय मिळणार?"

"पण मग गुरूजींना पळवून काय मिळाले असेल? जाऊ देत. त्या डाकूंचे नाव नको.. पण आजची चिठ्ठी?"

"आज? आज नाही लिहिली.. विसरलो.. गडबडीत."

"काय?"

"चिठ्ठी. विसरलो.."

"लिहायला?"

"लिहायला.. तो विसरला.. आणायला.. मी विसरलो.."

"ती कशी काय? नाही, लिहिलीच नाही तर तुम्ही विसरलात कसे?"

"ते पण खरेय.. म्हणजे मी त्याला चिठ्ठी लिही नि दे हे सांगायला विसरलो गडबडीत .."

"पण गडबडीत .. म्हणजे? कसली गडबड?"

"हरिनामपुरात जाऊन येण्याची .."

"पण ते तर तुम्ही रोज करता ना?"

"हो ना.. पण आज थोडी गडबड झाली.."

"राहू देत. फारच वेंधळा दिसतोय एक माणूस .."

"कोण?"

"ते तुम्हीच ठरवा.. वेंधळा माणूस एकच आहे की दोघे .. तुम्हीच ठरवा.."

परतताना दिलदारच्या डोक्याला नवे खाद्य मिळालेले. सकाळी मास्तर म्हणाले, कजरी फारच हुशार आहे.. आणि आता ही.. तिच्या बोलण्याचा अंदाज थोडा वेगळा वाटतो.. तिने पहाटे पाहिले की काय? नि शेवटी बोलली ते एक माणूस

नि दोन माणसं .. नि त्यांचा वेंधळेपणा? नक्की काय प्रकार आहे? पण तिला दिलदार कोण नि पोस्टमन कोण हे ठाऊक झाले तरी ती इतकी शांत कशी? की नसणारच ठाऊक झाले. नाहीतर ती तीन ताड उडाली असती जागच्या जागी. आजवर त्या चिठ्ठी लेखकाचे न नाव विचारले, ना चौकशी केली.. पण चिठ्ठी घ्यायला उत्सुक असते ती.. हा प्रकार काय की नुसतेच स्वतःच्या मनाचे खेळ? समशेरला हे सारे सांगितले तर तो हसणार, त्याने सर्व गोष्टींचा विचार आधीच करून ठेवलेला आहे. तो एकच सांगत राहतो.. इस रात की सुबह नहीं. त्याचे सांगणे पटते.. कळते पण वळत नाही.

- आणि कितीही ठरवले तरी दिलदारची दुचाकी कजरीला भेटायला इकडे वळतेच..

नंतर कजरीच्या भेटी होत राहिल्या. कजरी त्याच्याशी असेच बोलत राहायची. बहुतेक वेळा ती येणे चुकवायची नाही. पण कधी त्या पत्रलेखकाबद्दल विचारायची नाही नि कधी काही त्याला द्यायला पत्रोत्तरही द्यायची नाही. फक्त मधून मधून डाकूंच्या टोळीचा उल्लेख यायचा तेवढाच. एकदा तिने सहज विचारले, "त्या संतोकसिंग टोळीत खूप भयंकर लोक असतील का हो?"

दिलदार यावर काय उत्तर देणार होता? डाकू असून असून किती कमी भयंकर असतात म्हणून समजावून सांगणार होता तो?

"कुणास ठाऊक?"

"पण असे डोंगरदऱ्यात कसे राहात असतील. वर पोलिसांची भीती.. तुम्ही कधी भेटला आहात कुणाला?"

"कसा भेटणार? ते लोक काय गंमत म्हणून भेटणार आहेत कोणाला? गप्पा मारायला?"

"मग गुरूजींना का नेले असेल? नि सोडून ही दिले.."

"तुम्ही जास्त विचार करू नका. गुरुजी सारे विसरून गेलेत.."

अशी मध्ये मध्ये डाकूंच्या टोळीबद्दल चर्चा होई. अर्थात खोऱ्याच्या आजूबाजूच्या गावात अशी चर्चा नेहमीच चाले. त्या टोळयांच्या बद्दल भीती नि थोडीफार उत्सुकता असे. लोक शिव्याशाप देत पण त्यांच्याबद्दल कुतूहलही असे.

बाकी पोस्टमनची भूमिका दिलदारच्या अंगवळणी पडली होती. संतोकसिंग क्वचित कधी आलाच तर दिलदारचे कान उपटायचा पण दिलदार त्याला दाद देईल तर.. दिवस चालले होते. कजरी दिवसेंदिवस त्याला जास्तच आवडत होती. नदी किनारी ती पंधरा मिनिटांची भेट.. बाकी दिवस तिच्या विचारात घालवणे. आणि तिच्या मंजूळ आवाजाची रेकॉर्ड कानात परत परत वाजवीत ठेवणे.. पुढच्या चिठ्ठीत चार शब्द लिहायचे कोणते याचा विचार करत राहणे.. या सर्व गोष्टींना एक दिवस छेद गेला..

नदी किनाऱ्यावरच्या भेटीत एके दिवशी कजरीने विचारले,

"हरिनाथ गुरूजी तुम्हाला गावात भेटत नाहीत का हो?"

"कधी कधी भेटतात. म्हणजे भेटतात तसे. परत काही पत्र वगैरे द्यायचेय? द्या. बंदा हाजिर है."

"कधी भेटले होते?"

या प्रश्नाचे उत्तर नक्की काय द्यावे? खूप पूर्वी म्हणावे की कालच भेटले म्हणून सांगावे? मध्यम मार्ग स्वीकारत तो म्हणाला,

"मागे एकदा भेटलेले.. त्यांना पत्र द्यायचेय परत?"

"छे हो. त्यांचेच पत्र आलेय. मला. पोस्टाने. आमच्या खऱ्या पोस्टमनने आणून दिलेय.."

"खऱ्या पोस्टमनने म्हणजे?"

"म्हणजे असा इकडे एकच चिठ्ठी पोहोचवणारा.. कबूतर नाही .. तुम्ही कसे हरिनामपुरात खरे पोस्टमन असता .. तसा.."

"काय म्हणतात गुरूजी?"

"काही नाही. बोलावलेय."

"कोणाला? तुम्हाला?" दिलदार कितीही प्रयत्न करूनही आवाजातली भीती लपवू शकला नाही ..

"का हो घाबरलात?"

"घाबरत नाही .. पण इतक्या दूर.. डाकूंचा प्रदेश.."

"पण गुरुजींनी मला नाहीच बोलावले .."

"मग?"

"तुम्हाला बोलावलेय भेटायला .."

"मला? कशासाठी असेल?"

"जाल तेव्हा कळेलच.."

"हो ना.. जातो उद्याच.."

"म्हणजे? रात्री तुम्ही हरिनामपुरात परत जाणार नाही?"

"तसे नाही. त्यांना भेटायला उद्याच जातो.."

गुरूजींनी भेटायला बोलावले? काय असावे कारण? ते ही कजरीला पत्र लिहून. अजून काय लिहिले असेल? गुरूजी असे लिहिणार नाहीत. नाहीतर ह्या कजरीच्या वागण्यात फरक पडलाच असता.. आणि त्यांनी कजरीला पत्रात मला भेटायचे म्हणून लिहावे? ती मला भेटते हे त्यांना ठाऊक .. पण ते त्यांना ठाऊक असल्याचे कजरीला कसे ठाऊक? आणि तसे त्यांनी कजरीला लिहून कळवावे?

तंबूत परतला तो हाच विचार करत. रात्री पुढ्यात वाढलेले जेवताना आता पुढे काय वाढून ठेवले असेल याचा विचार करत तो बसला.

१८.

# कजरीचे दिलदारला पत्र!

दिलदार रात्रभर विचारात होता, मास्तरांनी भेटायला का बोलवावे यापेक्षा त्यांनी कजरीला पत्र का लिहिले नि त्यात काय लिहिले असावे? ते त्यांना भेटूनच कळणार होते. पण कजरीच्या बोलण्यात आलेला दिलदार शब्द? तो असंच आला की मुद्दाम? तिला डाकूंच्या टोळीची भीती वाटते तर तिला सारे ठाऊक असेल तर ती अशी शांत कशी? समशेरला न सांगता दिलदार हरिनामपुरात पोहोचला. मास्तर घरात वाट पाहात बसलेले ..

"ये. आलास. छान."

"तुम्ही बोलावले गुरूजी?"

"अरे हो. तुला बोलवायचे. पण तुला निरोप कसा देणार. मग कजरीबेटीला पत्र लिहिले."

"ती म्हणाली मला. पण.."

"काळजी करू नकोस.. कजरीला मी जे सांगायचे ते सांगितलेय.. तू फक्त आता मी काय सांगेन यावर विचार कर."

"होय गुरूजी. कजरीला सारे समजेल तेव्हा काय होईल? मला कळत नाही .."

"दिलदार, इरादा नेक आणि पक्का असेल तर मार्ग निघतोच. आणि मग त्याचा शेवट कसा होईल याचा विचार करण्याची गरज नाही. तू तुझे डाकूपण

मनापासून सोडले आहेस.. निव्वळ कजरी मिळण्यापुरते नाही.. त्यामुळे तुझा इरादा नेक आहेच."

"होय गुरूजी. आणि पक्का ही."

"पण कजरीला मिळवणे हा तुझा इरादा असू शकत नाही दिलदार .. तेच सांगायला बोलावले तुला."

"म्हणजे?"

"म्हणजे नीट ऐक.. तुझा जन्म डाकूंच्या टोळीतला. त्याबद्दल तू काहीच करू शकत नाहीस. पण तुझ्यात ते डाकू बनण्याचे गुण म्हण किंवा अवगुण म्हण, ते नाहीत. तू माणसांना मारू शकत नाहीस. बायकामुलांना त्रास देऊ शकत नाहीस. तू तुझ्या आईला जंगलात त्रास भोगताना पाहिलेस. तसा तू कोणाला त्रास देऊ शकत नाहीस.. पण.. तुला वाटते हे पुरेसे आहे?"

"म्हणजे काय गुरूजी?"

"म्हणजे हेच.. हे पुरेसे नाही. काय करणार नाहीस तू ते तुला ठाऊक आहे. मला ठाऊक आहे. डाकूंच्या टोळीतून आलास तरी तू तसा नाहीस हे मी जाणतो.. मी ते इतरांना पटवून देईन.. पण बेटा हे पुरेसे नाही."

"मला ठाऊक आहे गुरूजी .."

"नाही. पुढे ऐक. तू जिथून सुरूवात करतोस त्या गोष्टी बाकी समाजात गृहित धरल्या जातात. गावागावातून लोक काही बंदुका घेऊन मारत फिरत नाहीत. ना ही लुटालूट करत. लोकांचे साधे आयुष्य ही असेच असते. डाकूंच्या टोळीत राहून तू तसा नाहीस.. ही चांगली गोष्ट आहे. पण ती पुरेशी नाही .."

"म्हणजे गुरूजी?"

"म्हणजे तुला या पुढे जावे लागेल. उद्या कजरी तयार झाली तरी तिला तुझ्या तंबूत सगळ्या डाकूंच्या टोळीत घेऊन जाशील? सध्या चोवीस तास प्रेमाची गाणी गात प्रेमाच्या गावा जायची स्वप्ने पाहतोस.. काय करणार नाहीस हे ठाऊक आहे, पण काय करणार आहेस ते ठरवावे लागेल.. तू दादागिरी करणार नाहीस.. पण दुसरे बरोबर असे काही तुला करावेच लागेल."

"दुसरे काही?"

"मी दोन गोष्टी सांगतो. दोन्ही कठीण आहेत. पण अशक्य नाहीत. त्यात तुझे भले आहे नि समशेरसकट इतरांचेही. बंदुकीच्या धाकावर दहशत पसरवण्यात फार काही मर्दुमकी नाही. चार दोन मुडदे पाडले की लोक घाबरतात. कठीण भाग मात्र इथून सुरू होतो. एक, तुला स्वतःचे पोट भरण्याचा सन्मान्य व्यवसाय करावाच लागेल. आणि त्यासाठी टोळीतून बाहेर पडावे लागेल. ते तसे शक्य नाही. तेव्हा दुसरी महत्त्वाची नि कठीण गोष्ट .. संतोकसिंग निवडणूक लढवू इच्छितो. आनंद आहे. पण त्याचा इरादा नेक नाही. त्याला फक्त टोळीला राजकीय संरक्षण हवेय. पण ती टोळीच नसेल तर? टोळीतील सगळे शरण आले तर? टोळीच नसेल तर या भागातील दहशत नाहीशी होईल.. तुलाही बाहेर पडता येईल.."

"तुम्ही सांगता ते खूप अवघड आहे गुरूजी .."

"आहेच. पण वेळ गेलेली नाही. समजून घे.. एखादा गरीब घरात जन्म घेतलेला मुलगा असेल.. पण समाजात कोणी त्याच्याकडे भीत भीत पाहात नाही. तुझी सुरूवात त्याहूनही कठीण आहे. तुझ्याकडे कोणी प्रेमाने बघणार नाही कधी. समशेरला ह्या साध्या आयुष्याचे आकर्षण आहे. पण तो दरोडेखोरीत बुडलेला आहे.

बाकीच्यांना काय वाटते मला ठाऊक नाही. पण त्या मारधाडीला सोडून दुसरे कुठले जग नि दुसरे शांतपणे जगावे असे आयुष्य आहे तेच त्यांना माहिती नाही. तू समशेरला तयार कर. तो इतरांना तयार करेल. काम कठीण आहे.. संतोकसिंग सहज होऊ देणार नाही. पण निवडणूक म्हटले की त्याला पडते घ्यावे लागेल. टोळीतील लोक तयार झाले तर त्याचा इलाज नाही. विचार कर.."

"होय गुरूजी .."

"आणि अजून एक. जोवर तुझा हेतू प्रामाणिक आहे नि विचार पक्का आहे.. मी तुझ्या बरोबर असेन. पण विचार तुझा तूच करायचा आहे.. मी फक्त तुला दिशा दाखवेन. चालायचे तुलाच आहे.."

"होय गुरूजी .. मी प्रयत्न करतो. एकदा समशेरला तुम्ही सांगाल तर?"

"सांगेन. पण तू सांगितलेस तरी त्याला कळेल. मुलगा हुशार आहे तो. चांगला ही आहे. फक्त तुम्हा लोकांना वाट दाखवण्याची गरज आहे.."

"जमेल मला सारे गुरूजी? मला तर शंका वाटते. सरदार म्हणजे माझ्या वडिलांना कळले तर काही खरे नाही. तुम्ही म्हणता ते खरे. टोळीच्या रक्षणासाठी ते राजकारणात चाललेत.."

"तेच राजकारण वापरून टोळीच संपवून टाक. ताठ मानेने जगायला तयार हो. जोवर ह्या निवडणुका होत नाहीत, घाबरायचे कारण नाही. समशेरला समजाव."

"प्रयत्न करतो गुरूजी ..

दिलदार परतला तो मास्तरांनी सांगितले त्यावर विचार करत करत. समशेर बरोबर असता तर त्याला आपोआप सगळे समजले असते. तेही गुरूजींच्या शब्दात.. त्याला न सांगता येण्याचा पश्चात्ताप दिलदारला झाला पण आता गोष्ट घडून गेलेली.. गुरूजी सांगतात त्यात चुकीचे काहीच नाही. आधीही डाकूंच्या टोळ्या शरण गेलेल्या होत्या. आता कुठे कुठे मेहनत करून जगताहेत. तशीच मेहनत करायला हवी. आणि कजरी साथ असेल तर.. सहज होऊन जाईल सारे. फक्त टोळीच संपवणे शक्य दिसत नाही. ते कसे जमावे?

संध्याकाळी तो कजरीला भेटायला आला. तीच चार शब्दी चिठ्ठी घेऊन. गुरूजींच्या भेटीची उत्सुकता तिला ही होतीच.

"काय म्हणाले गुरूजी?"

"काही नाही, असेच बोलावलेले. काही काम होते त्यांचे."

"त्यांना कसे ठाऊक तुम्हाला माझ्याकडून निरोप मिळेल?"

"कोणास ठाऊक. असेल एक अंदाज.. तुम्ही पाठवलीत चिठ्ठी तर वाटले असणार .."

"खरंच की. पण तुम्ही रोज रोज जाऊन येऊन थकत नाहीत?"

"सवय आहे. नोकरी म्हटले की सगळे आलेच."

"नोकरी? पण मग तिकडून इकडे रोज."

"त्याची पण सवय झालीय. मित्राचे काम म्हणजे यायलाच हवे, नाही का? एक मित्र नाहीतर दुसरे कोण करणार?"

"खरंय. पण तुमच्या मित्राचा पत्ता काही तुम्ही लागू दिला नाहीत अजून. चिठ्ठी कोणाची आणता.. नाव तरी कळू दिले असतेत .."

"नाव? अहो नावात काय आहे? काहीही म्हणा, नावं ठेवू नका फक्त म्हणजे झाले! आता सोयीसाठी तुम्ही त्याला भेटेतोवर त्याला आपण त म्हणून नाव ठेवू. म्हणजे त नामक व्यक्तीची चिठ्ठी मी आणत जाईन."

"त?"

"जोवर तुमची चिठ्ठी जाणार नाही त आपले नाव गाव कसले सांगतोय. एक मी आहे जो रोज जा ये करतोय.."

"हो ना. अगदी स्वतःचे समजून तुम्ही पत्र पोहोचते करता. तसे तुमचे तरी नाव कुठे ठाऊक आहे मला? गुरूजींना देखील नाही माहिती. पण नका सांगू. नावात काय आहे? तात्पुरते तुम्हाला आपण द म्हणू. म्हणजे सोयीसाठी. म्हणजे द नामक व्यक्ती त नामक व्यक्तीची चिठ्ठी या क नामक मुलीस आणून देतो.."

"छान. तुम्ही क. छानच! बाकी पोस्टाचे काम काय.. काहीतरी चांगलेवाईट कळवणे. क्षेमकुशल कळवण्यासाठी सारा पत्रव्यवहार .. फक्त हे द नव्हे त नि क चे हिशेब नाही ठाऊक आपल्याला. इतकी पत्रे पोहोचवतो पण त्यातले एकही पत्र वाचत नाही कधी. नाहीतर कित्येक गोष्टी अशा कळल्या असत्या.."

"खरे आहे.. काही काही गोष्टी कळल्या असत्याच.. तुम्हाला. हे खरे आहे.."

"पण काही म्हणा तुमचा स्वभाव चांगला आहे. मनमोकळा. अगदी दिलदार. त्यामुळे त्या पत्राची वाट पाहात असते.. म्हणजे त्या त नामक पत्रलेखकाला भेटायचेय एकदा.."

"सांगू मी? पण तो असा येणार नाही .. त्याला पत्र लिहून द्या. मी देतो. बिचारा कधीपासून वाट पाहातोय.."

एकाएकी कजरीने हातात पत्र ठेवले त्याच्या. पाकीटबंद ..

"त ला क कडून .. द्या. मी लिहिलेय त्यात.."

"काय? नाही म्हणजे मी विचारू नये.. पण त्याला बोलावणार असाल तर माझ्या फेऱ्या बंद होतील.."

"तसं काही नाही. तुम्ही ही या. मला तर वाटतं की तुम्ही यालच. शेवटी मित्राची काळजी आहेच तुम्हाला. तुम्ही काही त्याला एकटे सोडायचे नाहीत .."

"छे हो.. मी कशाला मध्ये मध्ये.."

"बरं ते पाहूच.. मी निघते आता.."

दिलदारच्या हातावर चिठ्ठी ठेऊन कजरी पुढे निघाली. दिलदार थिजून उभा राहिला. ती चिठ्ठी उघडण्याचे धैर्य गोळा करायला त्याला वेळ लागणार होताच. सायकलीवर टांग मारून तो सायकल पळवू लागला.. थोडे दूरवर गेल्यावर मात्र त्याला राहवले नाही. निर्जन अशा ठिकाणी त्याने पाकीट उघडले.. आपल्या वाड्याच्या माडीवर बसून कजरी सायकलीवरून उतरून ते पत्राचे पाकीट उघडणाऱ्या दिलदारला पाहात होती!

१९.

# दिलदारचे नवे पत्र

दिलदारने अधीरतेने पत्र उघडले. चिठ्ठीत काय असेल? आयुष्यात आलेले हे पहिलेच पत्र. तेही प्रेमपत्र. कजरीने काय लिहिले असणार? कजरीने दिलदारच्या चार शब्दांचे उत्तर.. चार शब्दांतच दिलेले! मजकूर इतकाच.. 'आज तिकडे भेटायला ये..' इतकेच! तिलाही ते दिलदारचे पहिले पत्र वाचून असेच वाटले असेल.. बास? इतकेच? परतल्यावर त्याने समशेरला चिठ्ठी दाखवली.. समशेर कागद उलटापालटा करत म्हणाला,"काला अक्षर भैंस बराबर. आणि अशी दुसऱ्यांची प्रेमपत्रे वाचण्याची पद्धत नाही माझी!"

दिलदार विचार करत होता.. एका दिवसात किती गोष्टी घडाव्यात.. गुरूजींशी भेट.. त्यात शरणागतीबद्दल बोललेले.. मग कजरीशी भेट नि तिचे पहिलेवहिले प्रेमपत्र.. तिला प्रत्यक्ष दिलदार म्हणून भेटायचे.. सगळ्या गोष्टींचा सोक्षमोक्ष लवकरच लागणार..

"समशेर यार, आज तुझ्याशी खूप महत्त्वाचे बोलायचे आहे."

"अंदाज आहे मला. कजरीच्या पोलिस ठाण्यावर डाकू दिलदारसिंग यास नि:शस्त्र बोलावले आहे. तेव्हा तेथे जाण्याचे धैर्य एकवटण्यासाठी समशेर हवा! पण हे सारे करताना कुठे गेली होती अक्कल? तेव्हा विचारले नाहीस. दिल है की मानता नहीं म्हणे. मी म्हणतो, दिलदार है की मानता नहीं."

"समशेर तू म्हणतोस ते सगळे खरे. पण मला सांगायचे ते अजून काहीतरी वेगळे आहे.."

"काय? तिच्या पुजारी बापास पळवून आणू? इकडे आणून समजावून सांगू. साबुदाणा आणि केळी वगैरे सात्विक आहार खाऊ घालू. आणि जावई आणि सासऱ्याची एकत्र बिदाई करू?"

"तशी कल्पना चांगली आहे.. पण सध्या सांगायचे ते वेगळे आहे.. आणि त्याचा धक्का तुला नि सगळ्यांना बसणार आहे.."

"काय? तुम्ही एकमेकांच्या गळ्यात हार घालून लग्न उरकून घेतले आहे? आता भाभीला रहायची व्यवस्था करायची आहे?"

"ही पण कल्पना चांगलीच आहे. पण सांगायचे ते वेगळे काही आहे.. तुझा अंदाज लावू नकोस अजून. ऐकून घे नीट.."

मास्तरांनी सांगितलेले सांगावे कसे नि समशेरच्या गळी उतरवावे कसे? पण कठीण झाले तरी करणे भाग होते.

"एक शेवटचा अंदाज.. तुला सद्बुद्धी झालीय आणि तू हे सारे इथेच संपवून आता नवीन कुणाला शोधणार आहेस.. जिच्यासाठी इतके सारे करायला लागणार

नाही .. काय आहे शेवटी डोक्यात प्रकाश पडणे महत्त्वाचे. म्हणजे माझी सुटका झाली म्हणायची .."

"तुझी सुटका? ऐक. आज गुरूजींनी बोलावलेले. मी जाऊन आलो.. ते काय म्हणाले ते तुला सांगायचे आहे. आता तुझे अंदाज बांधणे बंद आणि गुरूजींचे म्हणणे ऐक. आणि हे कठीण काम तुलाच पार पाडायचे आहे.."

"म्हणजे कजरीभाभी तुला मिळणार नि वरातीत मी नाचणार.. बेगानी शादी में समशेरा दीवाना? त्यासाठी सारा खटाटोप मी करावा .. "

"गुरूजी म्हणाले हे सगळे सोडून देऊन नवीन आयुष्य सुरू करा.."

"शाबास! गुरूजी पण हेच म्हणाले ना? विसरून जा कजरीला.. सोडून दे.."

"चुप. गुरूजी म्हणाले डाकूगिरी सोडून द्या.."

"कोणी?"

"आपण सगळेच. सरदार निवडणुकीच्या कामात आहेत.. त्यांना यावेळी जास्त बोलता येणार नाही. आपली सगळी टोळी शस्त्रे टाकून शरण गेली .."

"तुझे प्रेमप्रकरण इथवर पोहोचले.. की आपल्या पोटावर गदा यावी?"

"गुरूजी म्हणाले, हे सगळे सोडून नवीन जीवन सुरू करा. सध्या सरदारांचा हात दगडाखाली आहे तोवर. तुझ्यावर त्यांचा खूप भरवसा आहे. म्हणाले, टोळीतले लोक तुझे ऐकतील. एकदा शरण आलो की या भागातील दहशत संपेल. लोकांची भीतीने गाळण उडते ती बंद होईल. गुरूजी यासाठी सर्व मदत करतील. फक्त तेवढी हिंमत आपल्याला दाखवणे गरजेचे आहे.. गुरूजी म्हणतात, याहून दुसऱ्या कुठल्या पद्धतीने जगता येते हेच आपल्याला ठाऊक नाही. बंदुकीच्या जोरावर दहशत

कमावता येईल. प्रेम नाही. गुरूजी म्हणाले, समशेरला हे कळेल, हवे तर समशेर, तू पण गुरूजींना एकदा भेट. म्हणजे तुला कळेल ते काय सांगत आहेत ते."

"गुरूजी म्हणतात ते खरे रे. पण आपण पोट भरावे कसे? शरण यावे.. सन्मानाने जगावे.. सगळे खरे पण हे घडणार कसे. एक गोष्ट मात्र खरीच, मी गुरूजींना मानतो.. त्यांना शक्य होते की आपल्याला पकडून द्यायचे. पण त्यांनी तसे काही केले नाहीच. पण आपण हत्यारे टाकली की काय पुढे .."

"हे बघ, याचा संबंध कजरीशी नाही.. म्हणजे तसा आहे. पण यात गुरूजींचा स्वतःचा फायदा नाही. त्यांना आपण सरळ मार्गावर आलेले पहायचेय. मला तर वाटतेय.. माझा उपयोग ते त्यासाठी करून घेताहेत. त्यात फायदा त्यांचा असा नाही, पण आपला नक्की आहे.."

"तू म्हणतोस ते खरेय. पटतेय. पण नुसता समशेर म्हणतो म्हणून सगळे ऐकतील?"

"गुरूजी काय म्हणाले ठाऊक आहे, आधी स्वतःला पटले तरच आपण दुसऱ्यांना पटवून देऊ शकतो. ह्या डोंगरदऱ्यात आजवर आयुष्य गेले. आयुष्यात काय काय मिळाले? पैसाअडका आहे पण तो लुटून आणलेला. आपल्याला घर असे नाही. आई माझी कशीबशी माझ्यासाठी या जंगलात जगली. तशा सगळयांच्याच आया कुठून कुठून पळवून आणलेल्या. आईची माया पोटचा गोळा म्हणून मिळते पण त्याबदल्यात आपण त्यांना काय देतो? हे सगळे बदलायला नको का?"

"टोळीतील लोक ऐकतील? आणि पोलिस? असे सहज सोडतील? "

"आपण गुरूजींशी बोलू. पण केव्हातरी हे संपायला हवे. गुरूजी म्हणाले, ते आपल्याला शेतीसाठी जमीन मिळवून देतील.. सन्मानाने जगायचे तर मेहनत लागेल. ती आपण तर करतोच. डाके नि दरोडे यांत मेहनत कमी थोडीच आहे? पण ती हव्या त्या ठिकाणी वापरू.. धोका तर पावलोपावली आहे. पण माझे येथे कोणी ऐकणार नाही. तुझे ऐकतील.."

"तसे गुरूजी म्हणतात ते खरे आहे.. ते मदत करतील तर हे बदलेल.."

"आणि गुरुदासपूरची गीता पण मिळेल बक्षीस म्हणून.."

समशेरच्या डोक्यात एक कीडा सोडून दिलदार दुसऱ्या दिवशीच्या तयारीला लागला. टोळीला शरण यायला लावणे ही फार मोठी गोष्ट होतीच. पण सध्या त्याहून मोठी गोष्ट होती ती कजरी सगळे समजल्यावर कशी काय वागते ते पाहाणे.. विचार करून करून तो उठला तो भर मध्यरात्री. आताच तिला काय ते सारे सांगणे गरजेचे. आजवरच्या चार शब्दी चिठ्ठ्यांची पद्धत मोडून तो सारे सविस्तर लिहायला बसला. सारे काही समजावून सांगितले की त्यानंतर कजरीने नाकारले तरी चालेल. पण खोटपणाच्या पायावर प्रेमाची इमारत नि इमारतीवरचे मजले चढवायचे नाहीत. त्यानंतर जे होईल त्याचा स्वीकार करायचा. कजरी मिळो न मिळो.. टोळीच्या शरणागतीचा प्रयत्न सोडायचा नाही..

चिठ्ठीत सारे लिहून झाले नि मन हलके होऊन दिलदार झोपला.. आज मनी वसे ते स्वप्नी दिसायची जागेपणी आठवण ही न झालेली, तरी स्वप्न पडलेच .. त्यात

खुद्द संतोकसिंग कजरीच्या घरी आलेला. पुजारीबुवा कजरीचा हात दिलदारच्या हाती देत होते नि संतोकसिंग हवेत बंदुकीचे बार उडवत होता.. समशेर आणि बाकी टोळीकर शांतपणे हात जोडून बाजूला उभे राहून पाहात होते.. गुरूजी एकीकडे उभे राहून सगळे पाहात होते. बाजूला सगळ्यांच्या बंदुका जमिनीवर पडलेल्या.. स्वप्नच ते! त्यात काय दिसावे यावर कोणाचे बंधन तर नाहीच.

नदीकिनारी कजरी आज लवकरच येऊन बसली. पत्रलेखक कोण आणि पत्रदाता कोण? सगळे समोर घडणार होते. नक्की काय नि कसे घडणार याचीच तिला उत्सुकता होती..

दिलदार आज सायकलीवर पोहोचला..

"तुम्ही? एकटेच? नाही म्हणजे तो नाही आला?"

"आलाय.."

"कुठे आहे?"

"तुमच्या समोर कजरीदेवी.."

"तुम्हीच? तुम्ही पोस्टमन .."

"आणि 'तो' सुद्धा."

"म्हणजे? तुम्हीच पत्रलेखक?"

"हुं.."

"माझा अंदाज खरा होता.. असे कोण कोणाचे पत्र अशा खेपा मारत देईल .."

"हो ना.. मग तुमचा.. तुझा काय विचार आहे?"

"माझा विचार? बरे विचारलेस तू.. मी मात्र नंतर सांगेन .."

"नंतर म्हणजे?"

"म्हणजे नंतर.. सध्या मी फक्त तुझे ऐकणार आहे. तुझ्या त्या चार शब्दी चिठ्ठ्या मी एक एक करून वाचतेय. कसे जमते तुला लिहायला? म्हणजे सगळी एकामागून एक वाचली की एक अख्खे पत्र तयार होईल .. तुझ्या हरिनामपुरात मागे आलेले मी. गुरूजींना भेटायला. गुरूजी सांगत होते तुझ्याबद्दल.."

"काय?" दिलदारच्या आवाजातला कंप जाणवण्यासारखा होता.

"घाबरतोस कशाला? पोस्टमनच्या आयुष्याबद्दल वाईट सांगण्यासारखे काय असणार? तू काय कोणी चंबळच्या खोऱ्यातला डाकू आहेस की दरोडेखोर की तुझ्याबद्दल काही ऐकून मी घाबरून जावे?"

हाच तो क्षण. दिलदारला वाटले याच त्या क्षणी सारे उलगडून सांगावे .. अगदी सगळे. मग सारे त्या क्षणी संपले तरी चालेल. पण नकोच.. आज चिठ्ठी वाचेलच ती.. त्यानंतर पुढचे पुढे. तेवढाच एक दिवस तिची स्वप्ने पाहायला मिळेल..

"मी इथे लहानाची मोठी झाले. आई गेली. मावशी माझी आई सारखी आहे. तुला तर ठाऊक आहे ना ती.."

"मला?"

"मग? पहिल्यांदा पत्र द्यायला आलास तेव्हा मावशीने बोलावले होते.."

"तुझ्या अजून लक्षात आहे?"

"अर्थात. तुझ्या चेहेऱ्यावरच्या रेषा काही लपू देत नाहीत. मित्राची चिठ्ठी म्हणे. तुला काय वाटले? इतके दिवस मी अशीच भेटायला येत होते तुला? सायकलीवरचा पोस्टमन आवडला मला.. पण त्या बावळटाला वाटले मला काहीच कळत नाही!

मागे म्हणाले ना.. बुद्धू आहेस तू.. साधासुधा नाही नंबर एकचा बुद्धू .. तुझे नाव मी बुद्धू राम ठेवणार आहे.. आणि तू अजून तुझे नाव तर सांगितलेच नाहीस?"

"उद्या सांगतो.. आज ही चिठ्ठी वाच.."

"चार शब्दी?"

"नाही काही. मोठे पत्र आहे.. वाच. मग उद्या विचार माझे नाव.."

दिलदारने पत्र तिच्या हाती दिले.

"हे बघ.. पत्रात काहीही असले ना तरी मी तुला उद्या भेटायला येईन.. अगदी काहीही असले तरी. तेव्हा मात्र तुझे नाव सांगशील ना.. स्वतः?"

"होय. पण उद्या येच .."

कजरी मनाशी हसली. पत्रात काय असावे तिला अंदाज होताच.. पण किती प्रामाणिकपणे सगळे लिहिले असावे याची उत्सुकता मात्र होती.

दिलदारचा आजचा उरलेला दिवस आणि आजची रात्र .. एवढी मोठी रात्र त्याने कधीच अनुभवली नव्हती.

२०.

# ये मेरा प्रेमपत्र..

प्रेमपत्र म्हटले की त्याचा एक साचा असतो. तीच प्रेमाची गोड गुलाबी भाषा, प्राणसखा नि प्राणप्रिये.. जिवलग आणि जिवलगे.. हृदयाची धडकन नि काळजाची धडपड असले काही नि अजून काही नाही. त्यात सध्या झुरणे किती जोरात सुरू आहे याचे शाब्दिक चित्रण नि एखाद्या राजकीय नेत्यानेच दाखवावीत अशी भावी सुखी आयुष्याची सत्तर एम एम ची डाॅल्बी साउंड फिल्मची स्वप्ने! प्रत्येक नवथर नि नवोढ युगुलाला ते नवे नवे नि हवे हवे वाटते. आजवर असली दिव्य प्रीती कुणी न केली न कोणी या पुढे करेल यावर त्यांचा गाढ विश्वास असतो. पहिल्या प्रेमाला प्रेमपत्रातच प्रेमाचे कढ नि प्रेमाच्या उकळ्या फुटून ते प्रेम उतू जात असते. अगदी बाहेर सांडून चुलीचा चर्र चर्र आवाज ऐकू येईल इथवर ओसंडून वाहणारे ते पहिले प्रेम. त्यात कागद गुलाबी असेल.. लाल शाईने कुणी लिहिल.. रक्ताचा भास व्हावा म्हणून. कुणी त्यावर हृदयाच्या आकृत्या काढतील.. आजवर कुणी मेंदूचे चित्र प्रेमपत्रात काढलेले पाहिलेत कुणी? कारण मेंदूचे त्यात कामच नाही मुळी. खरेतर वैद्यकीय नि शास्त्रीय दृष्टीने हे सारे रासायनिक बदल मेंदूत होतात. हृदयाचे काम फक्त धडाधड धडधड वाढवणे. पण प्रेमी युगुलांचे रसायन म्हणा की जीव म्हणा या शास्त्रांशी काहीच घेणेदेणे नसते. त्यामुळे खरे काम मेंदू करत असला तरी प्रेमपत्रात भाव मिळतो तो फक्त हृदयाला. ते काही असले तरी दिलदारचे 'प्रेमपत्र' मात्र या सर्वांना अपवाद होते. अधूनमधून स्वतःच्या दिलकी पुकार नि प्रेमाचे हुंकार जरी

असले तरी आपल्या पहिल्या पूर्ण प्रेमपत्रात सत्य परिस्थितीचेच वर्णन अधिक होते. दिलदारच्या दिलाच्या स्थितीहून तेच जास्त. आपल्या जन्मापासून आजवरची कहाणी थोडक्यात पण खरीखुरी कथन केलेली त्याने. कजरीने पत्र एकदा वाचले. दोनदा वाचले नि रात्रभर पारायणे केली.. माडीवरच्या तिच्या खोलीच्या वर छोटा झरोका होता. तिकडून दूरवरचे सारे स्पष्ट दिसायचे. त्या झरोक्यातून भविष्य दिसले असते तर? हा डाव मांडला खरा. पुढे काय मांडून ठेवलेय नशिबात?

कजरी आज नि आजपासून येणार नाही याबाबत दिलदारची खात्री होती. आपली सत्यस्थिती माहिती झाल्यावरही येण्यासाठी ती खचितच वेडी नाही. पण हे सत्य सांगितल्यावर त्याला एका बाजूने हलके वाटत होते. नि कजरी आलीच नाहीतर यापुढे टोळीच्या शरणागतीचा कठीण विषयही टाळता येईल याबद्दलही सुटल्यासारखे वाटत होते. आयुष्यातले एक प्रकरण संपले. त्यातून गुरूजी भेटले. काही नाही तरी कजरी कित्येक दिवस भेटली नि बोलली. लिहिणे वाचणे शिकून झाले.. आता काही दिवस वाट पाहून सायकल गुरूजींना परत करणे एवढेच एक काम उरले.. आपल्या विचारांच्या तंद्रीत तो स्वत:च्या नकळत नदीकिनारी पोहोचला..

नदीचे पाणी शांत होते, संथ होते. हिरवीगार झाडे आजूबाजूला. मध्ये तो कजरीचा आवडता खडक. त्या दगडाखाली त्याची चिठ्ठी ठेवण्याची जागा. त्या जागेवर गेले कित्येक महिने तो चार शब्दी चिठ्ठी ठेऊन जायचा. आज चिठ्ठी नव्हती. जे लिहायचे ते आधीच लिहून झालेले. नवीन सांगावे असे काय बाकी होते आता?

थोडा वेळ गेला आणि त्याचा स्वतःच्या डोळयांवर विश्वास बसेना. दुरून त्याला कजरी येताना दिसत होती. त्याने निरखून पाहिले, पाठून कुणी चार दोन माणसं तर येत नाहीत, त्याला झोडून काढायला. पण नाही, कजरी एकटीच होती. एका डाकूंच्या सरदाराचा डाकूपुत्र समोर आहे आणि ही पुजारी कन्या न घाबरता पुढे एकटीच येत आहे. त्याच्या पत्रात लिहिलेले त्याने कुणाही मुलीला पळवून घेऊन जाणे हा पर्याय बाद झाला आहे. जर प्रेमाने मन जिंकता आले तरच पुढची गोष्ट. हे सगळे वाचूनही कजरी येत आहे नि ती ही न घाबरता एकटी..

"आलीस तू? येशील असे वाटले नव्हते .."

"तुला काय वाटले? मला ठाऊक नव्हते? पोस्टमन तू नि दिलदार ही तू.. मला आधीपासून माहित आहे.. दिलदार. अगदी पहिले पत्र आणून दिलेस तेव्हापासून .."

"कसे काय?"

"कसे काय? तू म्हणालेलास ना.. तशी मी आहे हुशार समज.."

"ती तर आहेस तू. पण माझ्यासारख्या बरोबर? तू डाकूंच्या टोळीला भितेस.. आणि हा प्रत्यक्ष तुझ्यासमोर मी उभा आहे.."

"खरेय.. तुझ्यासमोर मी उभी आहे. मला पहायचे होते पोस्टमन बाबू किती प्रामाणिक आहे. तू लिहिलेल्या गोष्टी मला आधीच ठाऊक आहेत.. कशा ते आता विचारू नकोस.. सांगेन. पण फक्त माझा हात पाहून भविष्य तितके सांग. म्हणजे काय होईल पुढे ते कळेल तरी.."

"मी? मी काय ज्योतिषी आहे?"

"अर्थात आचार्य.. तू आला होतास ना आचार्य बनून."

"तुला ते ही ठाऊक होते?"

"तू आरशात पाहतोस का रे? तुला मी कुठल्याही रूपात ओळखेन. तुला सांगू तुला पहिल्या दिवशी पाहिले नि मी म्हटले, हाच माझा दिलवर दिलदार..'

"खरेच? पण का?"

"हा प्रश्न मी पण विचारू शकते.."

"तुझ्याशी कोण जिंकू शकणार आहे. मी सांगू आजपासून तू येणार नाहीस हे समजून आलेलो. पण तू आलीस. तुला सारे ठाऊक असूनही तू आलीस.. माझा विश्वास बसत नाही. हे स्वप्न आहे की सत्य? काढ तर मला एक चिमटा.. म्हणजे मला खात्री पटेल.."

"चिमटा? तो तर मी आनंदाने काढेन. चिमटाराणी म्हणतात मला.."

"चिमटाराणी? चिमटाराणी?"

"काय रे? हे काय चिमटाराणी म्हणून ओरडतोयस?"

समशेर दिलदारला उठवत होता..

"ही कोण नवीन चिमटाराणी?"

दिलदार दचकून उठला. म्हणजे सारे ते स्वप्नच होते. अर्थात. स्वप्नातच हे शक्य आहे. खरोखरीच असे काही होईल?

झोप नि स्वप्न मोडून दिलदार उठला. नदीच्या पाण्यात डुंबताना त्याला अचानक वाटून गेले.. कजरीला खरेच सारे ठाऊक तर नाही? काहीही असो पण उद्या

येईन असे म्हणालेली ती. पण कितीही तिची कल्पनाशक्ती ताणली तरी प्रत्यक्ष एका डाकूंच्या टोळीतील कुणी डाकिया म्हणून आला तर ती तो धक्का पचवून येईल?

नदीकिनारी दिलदार पोहोचला तेव्हा मात्र त्याला धक्का बसला .. कजरी खरोखरीच समोर उभी होती. वाट पाहात ..

"आलास? मला वाटलं तू काही आता येणार नाहीस.."

"काय? मला वाटलं तूच येणार नाहीस.."

"तेच! तुला वाटेल आता मी येणार नाही, म्हणून तू येणार नाहीस. पण मी तुला म्हटलेले.. काहीही असो चिठ्ठीत, मी येणारच.. कारण मला माहिती होते त्यात काय असणार आहे."

"म्हणजे? तुला सगळे माहिती?"

"हुं.."

"तरीही?"

"हुं.."

"आधी मला चिमटा काढ.. हे खरेय की स्वप्न..? आणि तुझे नाव चिमटाराणी आहे का?"

"काय? चिमटाराणी?"

ते रात्रीचे स्वप्न, स्वप्न नव्हतेच. म्हणजे स्वप्नच होते, पण जे घडले ते त्या स्वप्नाप्रमाणेच असावे? अर्थात चिमटाराणी शब्द सोडून!

मग प्रेमाच्या गप्पा झाल्या. दिलदारला अगदी काय पाहिलंस माझ्यात हा प्रश्न ही पडला नि तो त्याने विचारलाही. कजरीने लाजत मुरडत काही उत्तरे दिली, काही टाळली. अर्थात तिची हुशारी न कळण्याइतका दिलदार कमी हुशार नव्हता. पण ह्या अनपेक्षित प्रेमाच्या पावसात तो चिंब भिजत होता. त्या वर्षावात न्हाऊन निघत होता. हा असा दिवस उगवेल याची कधी कल्पनाही त्याने केली नव्हती. पुढे अजून कितीही अडथळे आले तरी ते पार करण्याची हिंमत त्याला आली होती. त्या मंतरलेल्या संध्याकाळी सारे काही सोनेरी दिसत होते.. आता मागे वळणे नाही. एका डाकूच्या मुलाला एका प्रतिष्ठित घरची कोणी सुंदरी मनोमन वरू शकते.. तर या जगात काहीही घडू शकतेच..

हे सारे घडले कसे? कजरीने त्याची उत्सुकता फार ताणली नाहीच. सारी कथा सांगितली.. अगदी कथाकथन केल्यासारखी. सारे ऐकून म्हणाला, असे ही या दुनियेत घडू शकते.. तर अजूनही चमत्कार होऊ शकतील.. दिलदारला आश्चर्याचे धक्के बसत राहिले. त्याचा विश्वास बसणार नाही असे.. एकामागून एक..

२१.

# कजरी कथा

कजरीने हरिकथा कथन करण्

त्या दिवशीची गोष्ट. त्या संध्याकाळी हरिनाथ गुरूजी घरी आले. मी एकटीच होते. सगळे बाहेर कुठे गेलेले. गुरूजी चालत आलेले. थकून गेलेले. गावाबाहेर बस येते तिकडून पायी आलेले तर थकणारच ना.

"गुरूजी तुम्ही? किती वर्षे झाली.."

"हो पोरी. कामच तसे निघाले म्हणून आलो."

"काम? आणि या गावात?"

"गावात नव्हे पोरी."

"मग?"

"तुमच्या घरी."

"पण सगळे बाहेर गेलेत गुरूजी. रात्री पर्यंतच येतील."

"बरे झाले. काम तुझ्याकडेच आहे."

"माझ्याकडे?"

"ऐक. नीट लक्ष देऊन ऐक."

"होय गुरूजी."

"मी कालच सुटलो.. तिकडून सुटलो नि तडक इकडे आलो."

"सुटलात? कुठून गुरूजी?"

"त्या बाजूला तुला ठाऊक आहे. रामगढ गाव आहे. सारा डोंगरदऱ्याचा प्रदेश. नि तिथे राज्य आहे ते संतोकसिंग टोळीचे. सारी गावे त्याच्या नावानेही चळाचळा कापतात."

"ऐकून आहे गुरूजी. गावातील सारेच घाबरतात त्या डाकूंना."

"त्याच टोळीने मला पळवून नेले. अपहरण. ते ही माझ्यासारख्या एका मास्तराचे."

"बाप रे! मग? आता बरे आहात तुम्ही?"

"मी धडधाकट आहे. मला काहीच झाले नाही .. म्हणजे त्यांनी काहीच केले नाही."

"मग ते अपहरण?"

"खरे सांगतो, मला त्यांनी काहीच केले नाही. उलट एखाद्या पाव्हण्यासारखी बडदास्त ठेवली.."

"त्या डाकूंनी?"

"नाही. त्यातील दोघांनी. एक संतोकसिंगाचा मुलगा, दिलदारसिंग. आणि दुसरा समशेरसिंग."

"मग कशाला ते पळवून नेले .."

"तेच सांगायला आलोय पोरी."

"मला?"

"ऐकशील तेव्हा सारा उलगडा होईल बेटी. ती संतोकसिंगाची टोळी म्हणजे जहाल नि खूंखार डाकू अगदी. दहशत आणि भीती चोहीकडे पसरवावी नि बंदुकीच्या नळीच्या जोरावर राज्य करावे. पण त्यात हा दिलदार नामक दिलदार पोरगा सापडला मला.."

"संतोकसिंग डाकूचा मुलगा .. आणि दिलदार?"

"तीच खरी गोष्ट आहे पोरी. दिलदार त्या टोळीत राहतो कारण तो तिथेच जन्मला. तो नावाप्रमाणेच दिलदार आहे. ह्या डाक्यादरोड्यांत तो भाग घेत नाही. म्हणजे समशेर तसा दरोडे आखतो.. बंदुका घेऊन फिरतो. पण हा दिलदार नाही. दिलदारने मला स्वतःच सांगितले, त्याने आईला तसे वचन दिले, ते ही मनातल्या मनात .. ती मरणाला टेकलेली असताना. टोळीतील कोणाला सांगितले नाही त्याने, पण तो वचन पाळतो. अगदी पक्ष्यापाखराचीही शिकार बघवत नाही त्याला."

"पण मग तो डाकूंच्या टोळीत?"

"तिकडून तो कुठे जाणार बेटी? आजवर वीस बावीस वर्षे तिथेच गेली. आता कुठे जाणार नि कसा जाणार?"

"पण तुमचे अपहरण .. त्याच्याशी याचा संबंध?"

"आहे. संबंध आहे. अगदी जवळून आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे तुझ्याशीही आहे.."

"माझा संबंध आणि डाकूंच्या टोळीशी?"

"ऐक. हा दिलदार गावोगावी भटकत असतो. त्यात त्याला एकदा तू दिसलीस. प्रथम दर्शने प्रेमपात: म्हणजे तुझ्या प्रेमात पडून प्रेमात वेडा झालाय दिलदार."

"मग?"

"पण तुझ्यापर्यंत पोहोचणार कसा?"

"कसा?"

"त्यासाठी सारा खटाटोप.."

"म्हणजे काय गुरूजी?"

"त्यासाठी एकामागून एक डोक्यात कल्पना आल्या त्याच्या डोक्यात. आणि त्यासाठीच माझे अपहरण .."

"तुमचे अपहरण? त्यासाठी? हा गुंता काही कळत नाही गुरूजी .."

"अगं, तुझ्यापर्यंत पोहोचायचे म्हणून तो पोस्टमन बनून येणार आहे. पत्र देण्याच्या बहाण्याने. पोस्टमन म्हटले तर कोणी हाकलून देणार नाही."

"मग?"

"पण पोस्टमनला कमीत कमी लिहिणे वाचणे तर यायला हवे. जंगलात सारे एकजात निरक्षर. त्यांना शिकवण्यासाठी कोण? म्हणून मग मला गावातून उचलले. सायकलीसकट. लिहिण्यावाचण्या बरोबर सायकल ही शिकला कारण डाकिया सायकलीवर येतो नि डाकू घोड्यावर! तर मी महिनाभर त्याला शिकवले ते लिहिणे वाचणे आणि सायकल चालवणे."

"बापरे!"

"बापरे काही नाही. पोरगा तसा हुशार आहे. महत्वाचे म्हणजे मनाने निर्मळ आहे. आणि सध्या मात्र कामातून गेला आहे.."

"कामातून गेलेला?"

"अगदी. तुझ्या पायी वेडा झालाय तो. हे वयच वेडं असते पोरी."

"बापरे! मला पळवून नेणार की काय? म्हणून सावध करायला आलात?"

"नाही पोरी. तो तसा नाही. मला म्हणाला, काही झाले तरी इतरांसारखे कोणालाही पळवून आणणार नाही. तुझे मन जिंकले तर ठीक. नाहीतर इलाज नाही. पण त्यासाठी हवे ते प्रयत्न करणार तो.."

"म्हणजे?"

"म्हणजे? अगं तो उद्या परवा कधीतरी येईल. पोस्टमन बनून.."

"मग?"

"काही नाही. समजून घे, तो डाकिया डाकू दिलदारच असणार आहे.. डाकू खरेतर नाहीच तो. मुलगा खरोखरीच चांगला आहे. उद्या आला तर पारखून घे.."

"मी? म्हणजे?"

"तुला आवडला तर पुढे जा. नाहीच आवडला तर सोडून दे."

"हुं."

"पण एक ध्यानात घे.. तो आवडला तुला तर तुझेच नाही त्याचेही सारे जीवन बदलून जाणार आहे."

"हुं..'

"त्यातून शक्य झाले तर संतोकसिंगाच्या टोळीस शरण आणता येईल, म्हणजे इथला आतंक संपवता येईल हा अजून एक फायदा.. आणि एक ध्यानात घे. आपल्या सारख्यांच्या घरी शंभरात पंचाण्णव तरी साधीसरळ मुले निघतात. का? कारण तसे संस्कार मिळतात. आईबापांस पाहून मुले शिकतात. त्या बंदुकीच्या

राज्यात राहूनही दिलदार मनाने असा राहिला.. प्रत्यक्ष त्याचा बाप सरदार आहे टोळीचा. आणि हा असा. हे जास्तच कौतुकास्पद नाही का? त्याला थोडी कोणी मदत केली त्याची बाजू समजून तर अख्खे एक आयुष्य बदलून जाईल. पण हे सर्व तुला तो आवडला नि मान्य असेल तर आणि तरच. तुझ्या इच्छेविरूद्ध नाही. तू तुझी आवड निवड सोडून बलिदान म्हणून त्याची निवड करावीस असे बिलकूल नाही. फक्त दिलदारच्या पार्श्वभूमीची माहिती आधीपासून असावी तुला म्हणून सांगायला मुद्दाम आलो. दोन्ही पोरांनी जंगलात सांभाळले मला. परत सोडताना डोळ्यांत पाणी आले त्यांच्या. माया नि प्रेम काय असते आजवर पाहिलेच नाही त्यांनी. त्याला जमले तर प्रेम दे."

"गुरूजी, तुम्ही सांगता म्हणजे त्यात काहीतरी अर्थ जरूर असणार. मी तुमच्या मुलीसारखी. इतक्या लांबवर तुम्ही आलात ते कोणाची तरी आयुष्ये सुधारावीत म्हणूनच ना. मी उघड्या डोळ्यांनी पाहेन सारे. आणि त्याची पारख करेन."

"कर बेटा. तू हुशार आहेसच. समजदार ही आहेस. आता यापुढे काय होईल ते सांगू शकत नाही मी. पण मार्ग कठीण आहे. दिलदार तुला आवडला तर खरे प्रश्न सुरू होतील. पण शुद्ध प्रेमापोटी नि हेतू निर्मळ असेल तर.. मार्ग तर निघणारच. प्रेमाची गंगा वाहत सुटेल तर सारे अडथळे आपोआप पार होत जातील. त्यात काही आयुष्ये उजळून निघतील."

"पण गुरूजी माझ्या घरचे..?"

"तो पुढचा प्रश्न पोरी. त्या आधी सोडवण्याचे कितीतरी प्रश्न आहेत. तू काही दिवसांनी मला तुझा निर्णय कळव. लक्षात घे, येणारा पोस्टमन हा डाकिया नसून डाकू असेल. सारे समजून उमजून निर्णय घे. मी सदैव तुझ्या पाठीशी आहे. तसा मी

दिलदारच्या पाठीशीही राहणार आहे. एक आयुष्य बिघडण्याऐवजी घडले तर आयुष्यात पुण्य गाठीशी बांधले जाईल."

"गुरूजी, तुमच्याकडेच शिकलेय मी. तुमची शिकवण अशी सहज विसरणार नाही. मी तुमच्या बरोबर आहे.."

कजरीची हरिनाथ मास्तरांची कथा ऐकवून झाली.. कजरी दिलदार कडे पाहात होती. दिलदार आनंदी दिसण्याऐवजी त्याच्या डोळ्यांत पाणी होते. गुरूजींसारखे कोणी पाठीवर हात ठेऊन उभे आहे.. कळत्या वयातला असा अनुभव पहिलाच. नि सारे समजून उमजून साथ द्यायला तयार असणारी ही वेडी कजरी.. एकाएकी त्याला आपल्या जबाबदारीची जाणीव झाली. आजवर त्याला हवी होती ती कजरी त्याला साथ द्यायला तयार होती. आता तिच्यासाठी त्याला बदलावे लागणार होते. नवीन आयुष्य सुरू करावे लागेल. ते सोपे नाहीच. त्यात संघर्ष मोठा. पण तो करणे भाग आहे. ते ही एकवेळ पार पडेल, पण त्याहूनही कठीण म्हणजे पूर्ण संतोकसिंग टोळीची शरणागती. आणि पोटापाण्याचा नवीन व्यवसाय .. पोस्टमनची नोकरी खरोखरीची मिळणार नाही .. मास्तरांना भेटायला हवे.. पुढे काय? फक्त शुद्ध बीज आहे, प्रेम निखळ आहे, त्या पोटी येणारी फळे रसाळ आणि गोमटीच असणार! प्रत्यक्ष गुरूजींचे सांगणे आहे हे!

२२.

# कजरीशी संवाद

रात्री समशेर आणि दिलदार दोघेही बसलेले. दोघेही आपापल्या विचारात. मास्तरांनी सांगितलेले समशेरला ही पटत होते, पण आपल्या रासवट आणि दांडगाईला चटावलेल्या सगळ्या डाकूगणांना शरणागतीची कल्पना एकाएकी सांगणे कठीण. एकतर त्यांना ते कळणार नाही. दुसरे, त्यातून काही जण तरी तडक सरदार संतोकसिंगास जाऊन खबर देतील. त्यानंतर तर हे सगळे अशक्य होईल. तरीही शरणागतीची कल्पना समशेरला आवडली. म्हणजे गुरुदासपूरच्या गीता बरोबर धागा जुळवता येईल, हा त्यातला मोठा फायदा. दिलदारच्या प्रेमकथेत नि प्रेमप्रकरणात त्याला हल्ली जास्त गंमत वाटू लागलेली. जिच्यासाठी जीव ओवाळून सारे काही पाठी सोडायला तयार व्हावे अशी कोणी मिळाली तर तिची ओढ आणि त्यासाठी करावी लागणाऱ्या धडपडीतील गोडी त्याला जास्त खुणावू लागलेली. ह्या डोंगरदऱ्यातील आयुष्याहून वेगळे आयुष्य काय नि कसे हे एकदा सगळ्या टोळीबहाद्दरांना दाखवले तर कदाचित त्यांना समजावून सांगणे जमेल. पण हे सारे होणार कसे?

"समशेरा, आता काय करूयात रे?"

"काय करणार? एक कल्पना सुचलीय. त्या हिंमतलालला परत पळवून आणूया. मग भजनी मंडळी बनून तुझ्या कजरीभाभीच्या, नाही माझ्या कजरीभाभीच्या देवळात भजन करूयात.. नाहीतरी नवीन काहीतरी करायचेच आहे काम. थेट डाकूगिरीतून देवीच्या पायावर."

"चांगली आहे कल्पना. पण तुझ्या बेडकासारख्या भसाड्या आवाजातील भजने ऐकून निर्जीव मूर्ती ही कान बंद करून घेईल. एक मीच आहे जो तुझा आवाज सहन करतो. भजनाला आवाज कसा हवा?"

"कसा?"

"तुझ्या भाभीसारखा. गोड नि मंजूळ. बांगड्या किणकिणाव्यात तसे शब्द किणकिणतात कानात, किंवा पायातील पैंजणांचा नाद यावा तसा आवाज तिचा. ती बोलते तेव्हा कोकिळा गाते नि पक्षी कूजन करतात असे वाटते. पाऊस पडल्यावर पागोळ्या कशा छतावरून अलगद खाली येतात तसे शब्द तिच्या कंठातून येतात. त्या एकेक शब्दाचा नाद कानात साठून राहतो. असा आवाज हवा. नाहीतर तू. सर्दी झालेल्या डुकरासारखा आवाज तुझा. फारतर घोडा चारा चरून ढेकर देतोय असे वाटेल.."

"वा! अगदी भाषा वर्गात प्रगती झालीय. शब्द जिभेवर नाचताहेत अगदी. पण या शब्दांखेरीज दुसरे काही विचार? तसा विचार करायचा तो बाकी सगळ्यांनाच, पण हल्ली तू फक्त भाभीचाच विचार करतोस. बाकी सारे माझ्यावर सोपवलेस.."

"माझा विश्वास बसत नाही रे, कजरी मला हो म्हणाली यावर. अजूनही ते स्वप्न आहे असेच वाटते. पण तिने दोनदा चिमटा काढला.. एकदा स्वप्नात, एकदा संध्याकाळी खरोखरी. ह्या इथे.."

"काय या इथे?"

"अरे ह्या हातावर. इथे चिमटा काढला. मृदू मुलायम हात तिचे. नाजूक बोटे. असा गोड चिमटा काढलाय सांगू. वाटतं तिने चिमटे काढत रहावे.. गोड चिमटे.. आयुष्यभर.. चिमटाराणी!"

"चिमटाराणी! आता तुझे ते हवेत उंच उडणारे उडाणटप्पू विमान खाली उतरव. त्यातून खाली उतर आणि जमिनीवर पाय ठेवून खरोखरीची परिस्थिती काय आहे आजूबाजूस हे जाणून घे. नाहीतर त्या धुंदीतून डोळे उघडतील तेव्हा कळेल की कजरीभाभी तयार आहे पण तिच्या पुजारी बापास दाखवावे असे आपल्या हाती काहीच नाही. तेव्हा काहीतरी हातपाय हलवावे लागतील. हलवावेच लागतील. मला वाटते आपण गुरूजींना भेटूयात. तेच काहीतरी मार्ग दाखवतील."

"ते खरेच.. जाऊयात.. लवकरच. पण सगळे शरण आले तरी पुढे काय? पोटापाण्याचे काय? आणि सरदारांना खबर पडली तर खैर नाही .."

"गुरूजीच सांगतील.. गुरूबिन कौन बतावे वाट.. आणि वाट दिसली नाही तर वाट पाहून पाहून आपली वाट लागेल.."

संध्याकाळी कजरी भेटली. आता चिठ्ठीतला संवाद प्रत्यक्ष होणार. चार शब्दांहून जास्त. प्रेमाची वाक्ये मनातल्या मनात जमत व्यवस्थित पण तोंडातून बाहेर येतील तर. त्यात आता पुढे काय हा प्रश्न ..

"आता पुढे काय करणार तू दिलदार?"

"काही नाही. हरिनामपुरात नाही जात.. रामगढलाच जाणार."

"त्यात नवीन काय? नेहमीप्रमाणे. हरिनामपुरात तिकडून रस्ता जातो काय..? तुला वाटले मला माहितीच नाही? पण काही म्हण खोटं बोलताना तू मस्त दिसतोस.. पण त्या दिवशी गुरूजी काय म्हणाले?"

"काय म्हणणार. म्हणाले नवीन आयुष्य सुरू कर.. आणि सगळ्यांनी शरण जाऊन टोळीच संपवून टाकावी .."

"तेवढयाने होईल? माझ्या घरी..?"

"कजरी.. काहीतरी मार्ग निघेल.. पण आज रात्री वाड्याच्या माडीवरून बघ.. हात करेन तुला .."

"म्हणजे?"

"गुरूजींना भेटायला जातोय. बघशील तू."

"पण हरिनामपुराचा रस्ता.. इकडून नाही.. तो जवळचा रस्ता तिकडून जातो ना? नाही म्हणजे माझ्या ओळखीचा एक पोस्टमन सांगत होता.."

"हो? मला नाही तो ठाऊक.."

"कोण पोस्टमन?"

"दोन्ही. रस्ता नि डाकिया.. दोन्ही .. तर रात्री हात करेन.. मागच्या वेळी तू घोड्यावरून जाताना पाहिले होतेस ना?"

"अर्थात. तुला पाहिलेले.. आणि बरोबर असणार तो समशेर. रात्री घोड्याच्या टापा.. परत येताना मात्र दिसला नव्हतास.. मी वाट पाहात बसले होते."

"मग तू थेट मी परत आलो तेव्हा पाहिलेस. एक दूरचा ओबडधोबड रस्ता आहे. तू पाहशील आम्हाला येताना म्हणून तिकडून आलो आम्ही.."

"आणि चिठ्ठी आणायला विसरलो.. किती खोटे बोलशील.."

"तू कमी खोटारडी आहेस?"

"मी कसला खोटारडेपणा केला?"

"सारे माहिती असून नसल्याचा.. गंमत पाहात बसलीस.."

"शहाणाच आहेस.. दीड शहाणा. पण मी रोज आमच्या माडीवरून वाट पाहात बसते. मावशी म्हणते त्या झरोक्यात काय आहे गं तुझे.."

"मग तू काय सांगतेस?"

"काय आहे नाही, कोण आहे विचार असे सांगते मावशीला.."

"तुला गंमत सांगू. तुझ्या मावशीच्या मुलीचे लग्न लागले ना तेव्हा मला वाटले तुझेच लग्न होतेय की काय. कसला घाबरलो होतो.."

"तू होतास तेव्हा?"

"अर्थात. मंदिराबाहेर घुटमळत होतो. शेवटी तू दिसलीस ना तेव्हा कुठे जीव भांड्यात पडला.."

"आणि मीच असते नवरी तर?"

"उचलून नेले असते? नाही.."

"पण दिलदार तुझी भाषा इतकी शुद्ध देशी तुपासारखी साजूक कशी?"

"गुरूजींनी नाही सांगितले? माझी आई.. ती शिक्षिका होती. बिचारीला पळवून आणले गेले. ती शिकवायची मला. तिने लिहायला पण शिकवलेले चोरून लपून .."

"चोरून लपून?"

"डाकूंच्या टोळीत पाटी पेन्सिल घेऊन बसणे म्हणजे मुलगा बिघडला असे मानले जाते. आई शिकवायची. बोलायला सगळी भाषा शिकलो. आई कविता करुन म्हणायची. त्या ही शिकलो. लिहायला वाचायला शिकलो पण सराव अजिबात नव्हता म्हणून पूर्ण विसरलो.. मग गुरूजींकडून शिकावे लागले. त्या निमित्ताने गुरूजी भेटले.."

"आता यातून काहीतरी मार्ग निघेल ना दिलदार .."

"निघेल. कजरीराणी निघेल. नाहीतर मी तुला खरोखर भेटेन नि तू मला खरोखर हो म्हणशील याची कधीतरी कल्पना होती का मला? फक्त मोठी नदी दिसली की ओलांडण्यासाठी तिच्यावर पूल मोठा बांधावा लागेल इतकेच.."

"म्हणजे मी कोण? छोटी नदी की नाला?

"तू? नदी नाही नि नाला नाही. तू प्रेमाचा सागर.. नदी नाही तर समुद्र आहेस तू.. पण आपल्या अडचणींची नदी मात्र भली थोरली असणार आहे.."

"हुं. नदी! ही चंबळ नदी समोर आहे साक्षात."

"कजरी दिलदार की प्रेमकहानी.. साक्षात चंबळच्या साक्षीने चंबळच्या खोऱ्यात .. मला अगदी उचंबळून आलेय कजरी.."

रात्री समशेर आणि दिलदार गुरूजींना भेटायला निघाले. वाड्याच्या जवळ आल्यावर काही निमित्त काढून दिलदार थबकला. अंधारात कजरी दिसत नसली तरी वर हात केला..

"या अंधारात तू व्यायाम करतोस का रे?"

"नाही, थोडा लगाम पकडून हात आखडला.."

कजरीने अंधारातच दिलदारला पाहिले. लाजत ती खुदकन हसली. दिसत दोघेही एकमेकांना नव्हते पण बघून हसत मात्र होते! अंधारात दोघांचा एकमेकांना न बघता नि न बोलता संवाद घडला.

थोडे पुढे गेल्यावर समशेरच्या लक्षात आले..

"कजरीभाभीच्या वाड्यापुढे होतास तू थांबलेला.. हात आखडला म्हणे.. सरळ सांगायचे ना.."

"हुं. गुरुदासपुरात तू किती चकरा मारतोस ते सरळ सांगतोस का? मला सारे दिसतेय .."

"तुझे काहीतरीच.."

"तुला सांगू समशेर हे प्रेम ना असला चोरटेपणा शिकवते. खुदा हुस्न देता है तो नजाकत आ ही जाती है.. म्हणतात ना, तसे प्यार होता है तो चोरटेपणा आ ही जाता है.. आपोआप.. काय म्हणते गीताभाभी?"

"तू तिची आठवण नकोस करून देऊ.. दिलदार.. तेरा हुआ अब मेरा क्या होगा? कोणास ठाऊक.."

२३.

# कजरीचे निशा दर्शन!

हरिनामपुरात आज सकाळ सकाळीच गडबड दिसत होती. एरवी अजगरासारख्या सुस्त असलेल्या गावात काहीतरी गजबज दिसत होती. मातीचे रस्ते होते पण ते झाडलोट करून स्वच्छ केलेले दिसत होते. जागोजागी पोलिसांची गस्त दिसत होती. ते पाहून समशेर सावध झाला.

"दिलदार, मागच्या रस्त्याने जाऊ. काहीतरी गडबड दिसतेय .." तो म्हणाला नि दोघांनी रस्ता बदलला. मास्तरांच्या घराजवळ जाणारा एक पाठचा रस्ता त्यांनी पकडला. त्यांच्या घराजवळ आले तर तिथेच गाड्यांचा ताफा उभा होता. मास्तरांच्या घरात कुणीतरी आलेले दिसत होते.

"बहुतेक सरकारी गाडी आहे. गुरूजींकडे कशी?"

"पोलिस बघ किती आहेत.. त्या खिडकीतून बघ.. हळूच. कोण कोण आहेत..?"

समशेर जवळच्या झाडावर चढून वरच्या खिडकीतून आत पाहू लागला. त्याचा विश्वास बसेना.. मास्तर आणि अजून दोघे पांढऱ्या कडक इस्त्रीच्या कपड्यातील कोणी होते नि त्यांच्याबरोबर होता तो चक्क सरदार संतोकसिंग ..

समशेर खाली उतरला..

"दिलदार, सरदार आहेत आत. सरदार संतोकसिंग."

"काय सांगतोस?"

"खरंच. गुरूजींकडे काय काम असेल?"

"कोणास ठाऊक."

"आणि ते पांढऱ्या कपड्यातले लोक. मंत्री वगैरे कुणीतरी असणार. काय करत असतील?"

"मी सांगू, गुरूजी नक्कीच काहीतरी प्रयत्नात असणार. निवडणुकीची वेळ जवळ येतेय. मला म्हणालेले, राजकारणाचा उपयोग करून घेऊ.. म्हणजे डाकूंच्या टोळीची दहशत संपवता येईल.. नक्कीच काहीतरी शिजतेय.."

"शिजतेय? खिचडी? मग आपण थांबूया की निघूया? काहीतरी शिजतेय म्हणालास.. खाऊनच जाऊया."

"तुला अशावेळी गंमत सुचतेय.. इथे जीवनमरणाचा प्रश्न आहे .."

"भातवरणाचा नाही? जीवनमरणाचा? असं म्हणतोस? मग निघूया. हे सारे गेले ना तरी लोकांचे लक्ष गुरूजींच्या घराकडे असणार. त्यात आपण आलो हे कोणाला कळले तर उगाच गोंधळ .. विशेषतः सरदारांना. आपण नंतर येऊ."

दोघे परत निघाले. कजरीच्या गावाला वळसा घालून समशेर निघू पाहात होता ..

"आता त्याची गरज नाही समशेर. किल्ला आधीच सर केला आहे मी. आता जाता येता ती दिसली तर बरे वाटेल. की गुरुदासपुरावरून जाऊया.. बोल."

"कसलं काय रे. तुझे बरेय. तुला माझ्यासारखे दोस्त मिळाले, कोणाकोणाला पळवून आणायला. माझे तसे नाही ना.."

दिलदार यावर काही बोलणार तोच समशेर पुढे म्हणाला,

"दिलदार, मला वाटतेय गुरूजी सरदारांना थेट सांगत असणार शरणागती बद्दल. ते जे कोण मोठे पुढारी होते बरोबर, त्यांच्याशी बोलणे झाले असणार. निवडणुका म्हटले की माणूस नरम पडतो."

"लोखंड गरम झाले की कसे नरमते तसे. तोवरच त्यावर घाव घातला तर हवा तसा आकार देता येतो. गुरूजी भेटतील ना तेव्हा काय ते समजेल. असे असेल तर बरेच होईल. म्हणजे कजरी आणि मी.."

"इकडे सगळ्यांचा जीवनमरणाचा प्रश्न आहे नि तू रघुपति राघव कजरी कजरी जपत बसलायस.."

"माझ्यासाठी तोच आहे जीवनमरणाचा प्रश्न. तू नाही समजणार. अजून तुला गीताभाभी भेटली नाहीए ना. भेटेल तेव्हा कळेल.."

"तुला ते कळण्यासाठी मेहनत मात्र आम्ही घेतलीय.."

"हुं. खरंय ते. पण तरीही या गोष्टींसाठी एक हुशारी लागते बरं. एखादीवर आपली छाप सोडणे नि तिला आपण आवडणे.. कोणाला पळवून आणण्याइतके सोपे नाही.."

"कृतघ्न आहेस रे.. अजूनही तुझ्या प्रकरणात, नव्हे प्रेमप्रकरणात कितीतरी धडे लिहिणे बाकी आहे. आता ये तर मदत मागायला .."

"एक करूया.. तुझ्या गीता प्रकरणावर बोलूया. म्हणजे हा तुझा राग निघून जाईल.."

गुरूजींशी बोलणे झाले नाही, पण कजरीशी झालेले बोलणे दिलदार मनात परत परत आठवत होता. तो आणि त्याची आई. त्या जंगलात ती रहायची, पण तिला फक्त दिलदारची काळजी होती. ती खूप बोलायची आणि खूप काही सांगत नि शिकवत असायची. एकदा म्हणालेली,

"दिलदार, बाळा तुझं नाव ठेवलं ना या जंगलात तेव्हा मला खूप वाटत होतं.. तुला श्रीकृष्णाचे नाव ठेवावे म्हणून."

"श्रीकृष्णाचे?"

"होय.. हरिलाल किंवा हरिशरण. पण सगळे म्हणाले अशी नावे नसतात आपल्याकडे. देवादिकांची नावे वगैरे घ्यायला ठीक पण आपल्या नावात कसा जोर असला पाहिजे. एक भारदस्तपणा पाहिजे. मग सगळ्या टोळीतील लोकांनी तुझं नाव दिलदार ठेवलं. दिलदारसिंग."

"तुला नाही आवडत?"

"मला? मला तू आहेस तसा आवडतोस. एक तूच तर आहेस जो मला आवडतो.. माझा बाळ तू.."

असे म्हणत शिकवायची ती.. संतोकसिंग मोहिमेवर निघाला की लपवून ठेवलेली पाटीपेन्सिल नि गोष्टींची पुस्तके बाहेर काढायची. तिला राजस्थानच्या गावातून पळवून आणलेले म्हणे. मध्ये कधीतरी कोणी गावातून चुकून भेटायला येणार होता तर ही पुस्तके तिने मागवून घेतलेली. संतोकसिंगाचा डोळा चुकवून ती दिलदारला गोष्टी सांगायची. नदीवर दिलदारला घासूनपुसून अंघोळ घालून आणले की दिलदार गोंडस दिसायचा. अशावेळी संतोकसिंग चिडायचा. डाकूच्या पोराने कसे रगेल आणि रंगेल दिसायला हवे. शहरी बाबूसारखे रूपडे काय कामाचे? पण आईला त्याने संतोकसिंगशी कधीच वाद घालताना पाहिले नव्हते, तो मोहिमेवर गेला की आपल्याला हवे ते ती करायची. तो काळ असा की टोळी ऐन भरात होती. संतोकसिंगचा पाय एका ठिकाणी टिकत नसे. दहशतीचे नवे नवे मार्ग तो शोधत असायचा, त्यात त्याला आपल्या तंबूत रहायला वेळ कसला मिळायला. तो गेला की त्याची आई गाणं गुणगुणत दिलदारला अभ्यासाला बसवे. लपवलेली पुस्तके बाहेर काढे. तिने त्याला प्रार्थना शिकवलेल्या. लिहायला शिकवलेले. दिलदारलाही ते शिकणे आवडायचे. अर्थात आई होती तोवरच. ती गेली नि दिलदार संतोकसिंगच्या कलाने वाढू लागला. उगाच पक्ष्याप्राण्यांच्या शिकारी करू लागला. कोणाचा तरी जीव जाताना त्याला तडफडताना पाहणे बहुधा डाकू प्रशिक्षणाचा भाग असावा. संतोकसिंग त्या दिलदारातून एक डाकू दिलदार घडवू पाहात होता. आईला हे कळत असावे. या जंगलात नि संतोकसिंगच्या मनमानी दहशतीत दिलदारचे डाकू होणे ती टाळू शकत नव्हती हे तिच्या ध्यानात आले असावे. म्हणून असेल, पण दिलदारला जेवढे काही आठवत होते, त्यात त्याला आईने 'मोठा हो.. खूप शिक' असले काही कधीच सांगितले नव्हते. त्यानेच तिच्या मनाची इच्छा ओळखलेली नि हे डाकूपण सोडायची प्रतिज्ञा घेतलेली. शिकण्याचा प्रश्न तर नव्हताच. आज

आईची एवढी आठवण त्याला येत होती. वाटत होते ती जर खरेच आता असती तर तिला काय वाटले असते? संतोकसिंगशी ती दिलदारच्या बाजूने उभी राहून भांडली असती?

रात्रीच्या अंधारात कातर मनाने दिलदार रात्र सरण्याची वाट पाहात होता. आई राजस्थानातील एका गावात शाळेत शिकवायची म्हणे. टोळीने तिकडे डाका घातला. आपल्या मनमानीपणाने संतोकसिंगने तिला उचलून पळवून आणले. तेव्हा टोळी तिकडे कुठेतरी डोंगरदऱ्यात दडून असायची. त्या राज्यात पोलिस मागे लागले. मग तिकडून इकडे रामगढजवळ आली. गेली काही वर्षे एकाच ठिकाणी दहशतीचे साम्राज्य जमवून राहिली. आता या टोळीचा अंत जवळ येणार की काय? गुरूजी इतके मोठे कुणी आहेत की थेट कुणी मंत्री संत्री त्यांना भेटायला यावा? त्याबरोबर कुणाला न जुमानणारा सरदार संतोकसिंगही?

रात्रभर दिलदार टक्क जागा होता. कजरीची भेट होणे हा एकच उपाय होता मनाला चैन मिळण्यासाठी. पण कजरी अशा अवेळी भेटावी कशी? प्रेमी जिवाच्या आतले मन मात्र जरा वेगळे असते. कजरीची ओढ मनी दाटून आली.. किर्र अंधार सगळीकडे पसरलेला. त्यात तो उठून बाहेर पडला. सायकलीवर स्वार कजरीच्या गावाकडे निघाला. कजरी जवळ नसेल तरी तिच्या घराजवळ तरी बसावे .. किंवा ती त्या कवाडात बसून वाट पाहात असेल का?

दिलदार पोहोचला तेव्हा कजरीचे घर अंधारात बुडालेले. खाली मंदिरात देवीसमोरील दिवा जळत होता फक्त. त्याच्या बरोबर वर तो झरोका ज्यातून कजरी दिलदारचा दीदार करण्यासाठी बसून राहायची.. त्याबाजूने गेलेली आंब्याच्या

झाडाची मोठी फांदी. मागचा पुढचा विचार न करता दिलदार झाडावरून सरसर चढला.. नि उघड्या खिडकीतून कजरीच्या खोलीत अलगद उतरला. कुणी पाहिले तर काय होईल.. कदाचित त्याच्या प्रेमकहाणीचा अंतिम क्षण हाच असेल.. कजरीवर कसला प्रसंग येईल.. कसलाच विचार त्याच्या अधीर मनाला पडला नाही.. त्याने हलकेच हाक मारली..

"कजरी.. मी.. मी आहे.. दिलदार."

गाढ झोपेतल्या कजरीला हे स्वप्न वाटणे साहजिक होते.. ती झोपेत खुदकन हसली..

"तुला भेटायला आलो बघ. राहवले नाही मला.."

"हुं.."

"आता कशी शांत झोप येईल मला. आज भेटली नाहीस. मलाच उशीर झाला.. गुरुजींकडून यायला. तू वाट पाहिली असशील ना?"

"हुं.."

"मी इथे कसा आलो असेन ओळख तर पाहू.. चोरासारखा खिडकीतून घुसलो.."

"हुं.."

"तुला आश्चर्य नाही वाटले?"

"हुं.."

"तू नुसती हुं हुं काय करतेस? तुला भेटलो.. आता मी जाऊ?"

"हुं.."

"असं म्हणतेस? कुणी बघण्याच्या आत निघतो मी.. आलो तसा जाईन खिडकीतून.. खिडकी अशीच उघडी ठेवत जा.."

"हुं.."

कजरीचे जमेल तसे निशा दर्शन घेऊन दिलदार मागे फिरला. हलकेच झाडावरून खाली उतरला.. एका धुंदीत तो तंबूत परतला तेव्हा पहाट झाली होती. सकाळी सकाळी डोळा लागला त्याचा, जाग आली तेव्हा सगळे टोळीकर एका जागी जमा झालेले. सरदार संतोकसिंग मधोमध उभा.. समशेर त्याच्या बाजूला.. नक्कीच काहीतरी घडतेय.. की नव्या कुठल्या गावास लुटण्याची तयारी सुरू आहे? दिलदार पाठीमागे उभा राहून ऐकू लागला.

२४.

# नदी किनारी भेट कजरीशी

कजरी आज उठली ती खुशीतच. स्वत:शीच खुदकन हसत. दिलदार दिलवर बनून तिच्या दिलावर राज्य करत होताच. सकाळ नि दुपार त्याला भेटण्याची वाट पाहण्यात, संध्याकाळी त्याच्याशी बोलण्यात नि रात्र ते सारे आठवून त्यात रमण्यात जायची. पण रात्री दिलदार चक्क स्वप्नातच आला. खिडकीतून आला म्हणे! झाडावरून खिडकीतून? पण खरोखरच आला असता तर?

चंबळनदीच्या किनारी तो मोठा खडक त्यांच्या प्रेमकथेचा साक्षीदार होता. त्याच्या पायथ्याशी ती जाऊन बसली. नदीचा हा भाग निर्जन होता आणि तिथे खडकावर बसून दिवसेंदिवस स्वप्ने पाहणे हाच तिचा छंद होता. आज तिथे जाऊन ती बसली, दिलदारची वाट पाहात. काल तो हरिनामपुरात गेलेला, गुरूजी काय म्हणाले असतील?

दिलदार त्याच्या सायकलीवर पोहोचला..

तो येताच ती मान फिरवून बसली. न बोलता.

"मी आलोय.. राणी."

तिचा एक शब्दाचा हुंकार ही नसावा..

"काय झाले? रागावलीस?"

"नाही. बोलू नकोस माझ्याशी.."

"अगं, काल उशीर झाला तिकडे. नाही येऊ शकलो..

"दिलदार आता आलास तू? पण काल का नाही आलास? रागावलेय मी.."

"अगं तुला ठाऊक आहे ना.. मी काल हरिनामपुरात गेलेलो.. उशीर झाला."

"मी तरीही रागावलेय."

"बरं.. आता नाही ..

"आणि मग लाडीगोडी लावायला उगाच स्वप्नात आलास. खरोखरीचा नाही आलास म्हणून रागावलेय मी. मी आता तुझ्याशी बोलणारच नाहीये."

"स्वप्नात आलेलो मी?'

"होय, मध्यरात्री. खिडकीतून म्हणे. मग गेलास उडी टाकून! खरंच आला असतास तर?"

"म्हणजे? तुला ते स्वप्नच वाटले की काय? मी खरोखरच आलेलो. खिडकीतून. मी बोललो काहीतरी, तू फक्त हुं हुं करत होतीस.."

"अय्या, तुला कसं काय ठाऊक?"

"कसं म्हणजे? मी खरोखरीच आलेलो. खिडकीतून."

"चल. खोटारडा."

"मी? खोटारडा?"

"अर्थात .."

"तू आज उठलीस तेव्हा तुझ्या उशीच्या बाजूला एक आंबा होता?"

"हो. तुला काय ठाऊक?

"मला काय ठाऊक? मीच ठेवलेला. आंब्याच्या झाडावरून थेट प्रियेच्या जवळ. गोड मुलीसाठी गोड आंबा. त्या झाडावरच पिकलेला."

"अय्या! खरंच! म्हणजे तू रात्री येऊन गेलास?"

"हुं.. राहवले नाही म्हणून. काल भेटली नव्हतीस तू. राहवले नाही. रात्री तुझ्या घराखाली आलो."

"घाबरला नाहीस तू?"

"मी? मला लोक घाबरतात.. पाहिले तर खिडकी उघडी होती. आलो चढून."

"कुणी पाहिले असते तर?"

"तर? तेच घाबरले असते.. डाकूंचा डाका पडला की काय म्हणून!"

"मग.. तू घातला तो डाकाच होता. दिलदार डाकूने माझ्या दिलावर घातलेला डाका.. डाकिया बनून. डांबीस आहेस तू.. एक नंबरचा!"

"आता पुढे ऐक.. आज आमच्या टोळीतील सगळे जण जमलेले.. सरदार संतोकसिंग खूप दिवसांनी परत आले.."

"मग?"

"ऐक तर. काल आम्ही गेलेलो तर गुरूजींच्या घरी सरदार आणि इतर मंत्री होते.. आणि आज सरदार बोलत होते.. गुरूजी इतके मोठे कुणी आहेत काय? मंत्रीलोक त्यांच्या घरी येतात ते?"

"हरिनाथ गुरूजी? त्यांचा सगळेच आदर करतात. गुरूजींसारखा दुसरा कोणी नाही गावात. तसे ते राजकारण्यांपासून दूर असतात, पण ते राजकारणीच त्यांच्या मागे येतात. त्या गावात गुरूजींना मान आहे. ते म्हणतील तसेच होते तिथे.."

"म्हणजे निवडणुका आल्यात म्हणून ..?"

"असणार! पण गुरूजी असे सहज मानणार नाहीत. गावासाठी काहीना काही ते मिळवतील. मला वाटतेय, हेच असणार .. संतोकसिंग टोळीची शरणागती. याशिवाय दुसरी चांगली वेळ कुठली मिळणार..? त्याच सगळयांचेच भले आहे."

"अगदी बरोबर बोललीस. आज सरदार तेच सांगत होते. आपली टोळी शरण येणार. शस्त्रे टाकणार. सरकारशी वाटाघाटी सुरू आहेत म्हणाले. सगळया टोळीतील डाकूंना कुठेतरी शेतीसाठी जमीन मिळेल. आजवर मेहनत केली ती आता वेगळया पद्धतीने करावी लागेल. ऐकून सगळया टोळीकरांची तोंडे सताड उघडी पडलेली. समशेर सोडून. कारण आम्हाला गावात तसा अंदाज आलेला. इतक्या लवकर गुरूजींनी हे घडवून आणले.. पण सरदार इतक्या सहज मानतील असे नव्हते वाटले. गुरूजींची कमाल आहे."

"कमाल तर खरीच. एकदा मात्र गुरूजींना भेटून ये. म्हणजे जास्त कळेल काय ते. पण गुरूजी व्यवस्थित विचार करून सारे करतात. पाहिलेस ना.."

"होय. म्हणजे त्यांच्या अपहरणातून त्यांनी एक डाकूंची टोळी संपवू घातलीय. त्यात माझी ही प्रेमकथा, तू. म्हणजे बघ.. त्यांनी टोळीतील कच्चा दुवा हेरला आणि .."

"म्हणजे मी कच्चा दुवा?"

"नाही गं राणी.. तू पक्का दुवा. त्या झाडावर पिकलेल्या आंब्यासारखा. पक्का!"

"पक्काच आहे.. शहाणा.. पण राजकारण यालाच म्हणतात का रे? पण यात सगळ्यांचाच फायदा आहे."

"माझा पण! नाहीतर तू कशी भेटली असतीस? पण अजून पुढे काय होणार नि कसे? मला काहीतरी काम शिकावे लागेल.."

"सगळे ठीक होईल राजा. आजवर इतके काही घडले त्याची अपेक्षा केली होती कुणी? अगदी टोळीच्या शरणागतीपर्यंत.. एकवेळ मी तुझ्याबरोबर पळून आले असते.. म्हणजे आपले जमले असते समज.. पण ही टोळी संपवणे.. एकही गोळी न चालवता. म्हणजे असे होऊ शकते.. तर काहीही होऊ शकते! होय की नाही?"

"होय की! गुरूजीच यातून मार्ग दाखवतील.."

"बरं, आज येणार आहेस तू?"

"कुठे?"

"कुठे काय? स्वप्नात! खिडकीतून?"

"येऊ?"

"मी हो ही नाही म्हणू शकत नि नाही ही! मला तू हवा आहेस.. पण असा खिडकीतून नाही."

"मग?"

"दरवाजातून आलेला. राजरोस.."

"पण पुजारीबुवा मानतील? तुझी मावशी?"

"तुला मी आताच म्हटले ना, काहीही होऊ शकते.. काहीही! म्हणजे कदाचित ते मानू ही शकतात.."

"खरंच की.. म्हणजे बघ.. मी आलो घरी तुझ्या .. पुजारीबुवांना म्हणालो.. मला तुमच्या मुलीचा हात हवाय.. तिचे माझ्यावर प्रेम आहे.."

"आणि तुझे?"

"माझे? विचार करावा लागेल.."

"मारेन तुला मी.."

"बापरे! मग ते विचारतील.. काय करतोस कामधाम नि पोटापाण्याचा उद्योग .. तिथे गाडी अडायची.. पण कामधाम तर करतो काहीतरी. आता टोळी शरण आली की लवकरच दुसरा मार्ग उघडेल.. पण.."

"पण काय?"

"पण माझ्या डाकूंच्या टोळीतील सारे.. माझा बाप नामचीन खूंखार डाकू.. पूर्वजही डाकूंच्या व्यवसायात! असल्या कुटुंबात.. असल्या बापापोटी आलेला दिलदार. दिलाने कसाही नि कितीही उदार असला तरी.."

"तू चिंता नको करूस.. काही ना काही चांगलेच होईल.."

"हुं.. चांगले. चांगलेच. जशी तू मला भेटलीस.."

समशेर आणि दिलदार परत हरिनाथ मास्तरांना भेटायला हरिनामपुरात पोहोचले. मास्तर तिथे नव्हते. शहरात गेलेत म्हणे. लागोपाठ दुसऱ्यांदा दोघे तसेच परतले. येता येता समशेरला गुरुदासपुरच्या गीताची आठवण आली..

"चल यार, गुरुदासपुरावरून जाऊया.."

वेळेचा हिशेब केला तर तिकडून परतताना संध्याकाळची कजरी भेट होणार नाही.. दिलदार विचारात पडला. नाही म्हणावे कसे? समशेरने आजवर त्याला इतकी मदत केलेली. एका गुरूदासपुरी न जाण्याने तो अप्पलपोट्या ठरणार.. आणि संध्याकाळी न जावे तर कजरीचा तो नाकाच्या शेंड्यावर गिर्यारोहण करत टुणकन वर चढून बसण्यास जणू तयारच असावा असा राग.

"गीता काय करत असेल रे आता?"

"मला कसे ठाऊक असणार?"

"दिलदार, आता आपली टोळी शरण गेली की.. काहीतरी शक्यता आहे गीताच्या घरी जाऊन तिला पटवण्याची.."

"खरेय.. पण तुला सांगू एक.."

"काय?"

"आता असा नकोस जाऊ.. म्हणजे मला अनुभव आहे म्हणून सांगतो..फिल्डिंग कशी विचार करून लावावी लागते."

"म्हणजे?"

"म्हणजे नदीत चांगला धुवून पुसून साफ हो. हे धुळीने भरलेले कपडे बदल.. नि मग जा. समज तुला ती भेटली नि तू अशा अवतारात .. मग काय?"

"खरे म्हणतोस?"

"खरे? अगदी खरे. अनुभवाने सांगतोय ना.. तुझा तो रेशमी कुर्ता घालून जा.."

"असं म्हणतोस .. मग चल.. पण एक सांगतो.. तुझ्या कजरीच्या गावावरूनही नको जाऊयात.."

"का?"

"तुझे कपडे पण मळलेले आहेत ना म्हणून .."

"आता काय फरक पडणारे?"

"ससुर ससुरा देखेगा तो? दिल्ली बहुत दूर है अब भी भाई.."

"असं म्हणतोस .. ठीक आहे."

समशेर हे सांगताना हळूच हसत होता.. पण दिलदारचे लक्ष कुठे असायला तिकडे? तो आपल्याच धुंदीत होता.

२५.

# शरणागतांची शरणागती

सकाळी सकाळी टीव्हीच्या आजूबाजूला सगळे टोळीकर जमून ऐकत होते. मोठया आवाजात बातम्या ऐकू येत होत्या. दिलदार उठून त्या ऐकू लागला. हरिनाथ मास्तरांच्या घरी पाहिलेला पांढऱ्या शुभ्र कपड्यातील नेता मुलाखत देत होता. मोठया खुशीत आणि स्वतःवर खुश होत तो तावातावाने बोलत होता,

"आमच्या सरकारच्या प्रयत्णाने या ठिकाणी आम्ही चंबळच्या एका मोठ्या डाकूनच्या टोळीला शरन येन्यास भाग पाडले आहे. आमच्या मानणीय आनि आदर्नीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आपले राज्य दहशत मुक्त करण्याचा वसा आम्ही या ठिकाणी घेतला होता. त्या अणुषंगाने आमच्या मानणीय आनि आदर्नीय मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शणाखाली आनि आमच्या अथक प्रयत्णांना यश येऊन चंबळमधील एक मोठी टोळी आपली शस्त्रे टाकून शरन येणार आहे. भयमुक्त राज्य या आमच्या घोषनेच्या अंमलबजावनी अंतर्गत केलेली ही अत्यंत महत्त्वाची आणि भविष्यकालावर या ठिकाणी छाप सोडेल अशी घटणा आहे. डाकू आणि दरोडेखोर या ठिकाणी शेवटी मानसेच असतात हे ध्याणात घेऊण त्यांच्याशी वाटाघाटी करून सन्माण्य तोडगा काढन्यात आम्हाला यश आले आहे. चंबळच्या खोऱ्यातील समशेर डाकूनची टोळी गांधीजयंतीच्या दिवशी शरन येनार आहे. त्यामुळे या विभागातील डाकूनच्या दहशतीला या ठिकाणी आळा बसूण आजूबाजूच्या गावांणा

दिलासा मिळनार आहे. या सर्व डाकू आणि दरोडेखोरानचे योग्य पुनर्वसण करण्यात येनार असून त्यांना या ठिकाणी उपजीविकेसाठी शेतजमीण शासनाकडून देन्यात येईल. पुढील पिढ्या या ठिकाणी या दरोडेखोरीत लोटल्या न जान्यासाठी शिक्षन हाच एक उपाय आहे, तेव्हा त्यांच्या लहाण मुलांना जिल्हा शाळेतून या ठिकाणी प्रवेश देऊन शिक्षणाची सोय करण्यात येणार आहे. आम्हाला सांगण्यास अत्यंत आनंद होतो की ही चंबळच्या खोऱ्यातील एक महत्त्वाची आणि मोठी टोळी होती जिचा म्होरक्या समशेरसिंग आपल्या टोळीतील सर्व दरोडेखोरानसह या ठिकाणी शरन येईल. या संबंधात मानणीय मुख्यमंत्र्यांसह रामगढ येथील एक स्थानिक रहिवासी आनि पुढारी श्री.संतोकसिंग यांणी जातीणे पुढाकार घेतला असूण राज्य त्यांचे ऋनी राहिल हे आम्ही या ठिकाणी आवर्जूण सांगू इच्छितो."

समशेरसिंग हा टोळीचा म्होरक्या? आणि संतोकसिंग स्थानिक रहिवासी? सारे टोळीकर डाकू अचंब्यात पडले.. एक समशेरसिंग सोडून.

"शांत रहा. सरदारांनी तुम्हाला सारे सांगितले आहेच. आपल्याला नवीन आयुष्य सुरू करायचे आहे. सरदार निवडणूक लढवणार आहेत. तेव्हा त्यांच्या नावाने टोळी असणे म्हणजे निवडणूक हरण्याची खात्री. तेव्हा टोळीस माझे नाव देण्यात आले आहे. यावर माझ्यामते खरा हक्क दिलदारसिंग याचा होता. सरदार संतोकसिंग यांची इच्छा तशी नव्हती आणि स्वतः दिलदारसिंग यास राजी झाला नसता. आणि आता आपली टोळी विसर्जित होत असताना तिचा म्होरक्या कोण हा प्रश्न गैरलागू आहे.. सर्व टोळीबांधवांनी आपल्या पुढील आयुष्याबद्दल विचार करणे गरजेचे आहे. आपल्याला सन्मानाची वागणूक मिळेल पण आपणही तसेच वागणे

गरजेचे आहे. तेव्हा आजवरचे दांडगाईचे आयुष्य संपले असून आपल्याला कष्टाची कमाई करून जगावयाचे आहे. मंत्री म्हणाले तशी जमीन काहींना तर काहींना छोटी दुकाने काढून मिळतील असे सरदारांनी स्वतः सांगितले आहे. दिवसेंदिवस टोळी चालवणे कठीण होत असून आपली पुढची पिढी यातच अडकून राहिली तर प्रगती आपल्या आयुष्यात जवळपासही फिरकणार नाही. हे समजून आपल्याला पुढील विचार करावयाचा आहे. काही दिवसांतच आपण शस्त्रे टाकून नवीन जन्मास सुरूवात करू. आजवर धाकदपटशाने मिळायचे तर आता आपल्या मेहनतीने सारे मिळवायचे आहे. पण त्यातच सन्मान आणि प्रतिष्ठा आहे."

टोळीतील डाकूमध्ये कुजबूज होऊ लागली, बघता बघता ती वाढली नि गोंगाट नि गोंधळ झाला. आजवर ज्या बंदुकीच्या नळयांनी राज्य कमावले नि गाजवले त्या सोडून आता पाणी भरण्याच्या नळया वापराव्या लागतील! असे सामान्य जीवन जगावे? वाघ कधी शेळीसारखे जगेल? ज्या हातांस रक्ताची चटक लागली, ते हात आता गवत हाती घेतील? ज्या विळयाच्या पात्यांनी माना नि गळे चिरले, त्यांनी आता शेतातील पिके कापावी? आजवर संतोकसिंगच्या टोळीत लहानाचे मोठे झालेले कित्येक जण, संतोकसिंगने हिंसेचे नि दहशतीचे बाळकडू पाजले ते पचवून. त्या सर्व गोष्टी एकाएकी सोडणे कठीण. अशा आयुष्यात असणारी सारी गंमत एकदा शस्त्रे टाकली की निघून जाणार. भवति न भवति झाली. सारे डाकू गोंधळलेले आधीच संतोकसिंगच्या आधीच्या भाषणानंतर, कदाचित ते सारे स्वप्न असेल नि उगाच काहीतरी सरदार सांगत असतील म्हणून फार मनावर न घेतलेले, आता समशेरच्या बोलण्यानंतर परिस्थितीची जाणीव होत सगळे भानावर आले,

आलेल्या परिस्थितीला आता तोंड कसे द्यावे? दूर दिवाणसिंगच्या टोळीत सामील व्हावे? की स्वतःची एक टोळी बनवावी? संतोकसिंग कडक होता जरूर पण टोळीकरांना कधी काही कमी पडू दिले नव्हते. दिवाणसिंग तसा माथेफिरू होता. कधी कोणाला गोळी घालेल सांगता येत नव्हते. त्याव्यतिरिक्त अजून काही टोळ्या होत्या. छोट्या, म्हणजे वाटमारी करतात म्हणावे अशा. डाकूंच्या सगळ्या सदस्यांच्या मध्ये गंभीर चर्चा झडू लागल्या. संतोकसिंगने असा निर्णय टोळीतील सगळ्यांना न विचारता नि न विश्वासात घेता घ्यावा याबद्दल सारेच थोड्या घुश्श्यात होते. असा धुमसता असंतोष टोळीत काही दिवस पसरला.. समशेरला त्याचा अंदाज होताच, पण एके दिवशी टोळीतील कित्येक बंड करून उठतील इथवर मात्र नव्हता.

बंडाची भाषा टोळीसाठी नवीन होती. सगळेच बंदूकधारी नि सगळेच मनाने निबर आणि क्रूरतेचे वावडे नसलेले. दिलदारसिंग आजवर डाक्या दरोड्यांत नव्हता तरी सारे त्याकडे संतोकसिंगमुळे दुर्लक्ष करत आलेले नि त्याच बरोबर आता समशेरसिंगही आता शरणागतीची भाषा करतोय..

समाजात बदल घडवणे.. समाजातील सर्वांवर ज्याचा परिणाम होईल असा कुठलाही निर्णय घेण्याआधी त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे. भले ही हा निर्णय सर्वांच्या भल्याचा असो, धुरिणांनी त्याची अंमलबजावणी करताना संवेदनाशीलता दाखवावी लागते. वरून लादलेला निर्णय असंतोषाला कारण ठरतो. समाजातील वाईट रूढी जशा नुसत्याच कायद्याच्या बडग्याने सुधारता येत नाहीत, तसेच हे. मानसिकता बदलणे हा मार्ग मोठा आणि खडतर, पण निश्चित बदल घडवणारा.

त्यासाठी मेहनत करावी लागते. सत्ता धुरिणांना त्यासाठी तितका संयम असावा लागतो नि धोरणीपणाही. पण स्वतःच्या प्रेमात असणारे नि स्वत:च्या सर्वशक्तिमानतेची घमेंड असणारे इथे हमखास चुकतात. तसा संतोकसिंग चुकला. चुकलाच. आता संतोकसिंगची आजवरची सारी पुण्याई धुवून निघेल.. समशेरसिंग आणि दिलदारसिंग यांना संपविण्यास लागणाऱ्या गोळया फक्त दोन.. आणि गरज पडली तर संतोकसिंगासाठी तिसरी.. डाकूंच्या टोळीत रात्र रात्र गंभीर खलबते होऊ लागली. आजवर टोळी पोलिसांपासून सुरक्षित होती, ती संतोकसिंगाच्या दहशतीनेच की पोलिसांशी असलेल्या लागेबांध्यांनी? समशेरच्या पाठोपाठ गुलजारसिंग टोळीतील तसा सिनियर म्हणावा असा डाकू. त्याला टोळीच्या मुखियागिरीची स्वप्ने पडू लागली. सत्तास्थान, मग ते कितीही छोट्या राज्याचे का असेना, मोह कुणाला सुटलाय? टोळीच्या शरणागतीतून हे चांगले काही निष्पन्न होईल.. गुलजारसिंगच्या मनातील हिशेब सुरू झाला. गुलजार नि त्याची पळवून आणलेली गुलाबोराणी.. दोघे सत्ता सिंहासनावर बसतील. टोळीतील सर्व धोरणे गुलजारसिंग ठरवेल. आणि बाकी सारे फक्त अंमलबजावणी करतील.. मनात मांडे खाणे गुलजारसिंगचे सुरू होते. अजून काही दिवस शरणागतीसाठी बाकी होते. त्याआधीच समशेरसिंग नि दिलदारसिंग दोघांचा खेळ संपवावा नि रातोरात टोळीचे स्थलांतर घडवून आणावे..

गुलजारसिंगाची नि त्याच्या टोळीबांधवांची विचारांची गाडी इकडे अडली. एकतर नवीन जागा शोधणे आले, नाहीतर संतोकसिंगच्या हाती टोळीचा अंत ठरलेला.. सारा टापू संतोकसिंगला तळहातावरील रेघांसारखा ओळखीचा,

त्याच्यापासून दूर जाऊन कुठे नव्याने पालं वसवणे.. नाही म्हणायला एका ठिकाणी वसतीला राहून काही वर्षात एक प्रकारे सुखासीनता आलेली. ती सारी सोडून नव्याने संघर्ष करणे, तो ही संतोकसिंगाशी.. एका गोळीत एकेक जण टिपता येईलही पण पोलिस माग सोडणार नाहीतच, संतोकसिंगने तर पोलिस नि राजकारण्यांशीच नवा घरोबाच जमवलेला.. तरीही काहीतरी करायलाच हवे. आजवर कधी गुलजारसिंगची टोळी असेल असा विचार नव्हता आला. आता गुलजारसिंगच्या मनात तोच विचार घर करून राहिला.

पण ही गुलजारसिंगची सारी सोनेरी स्वप्ने एके दिवशी सकाळी एका क्षणात भंगली. एकेका गोळीत दिलदार, समशेर आणि संतोकसिंग यांचा खात्मा करण्याची दिवास्वप्ने भंगली ती पहाटे पहाटे संतोकसिंग येऊन समोर उभा ठाकल्यावर. संतोकसिंगचा दराराच तसा होता. शाळेतील व्रात्य पोरे हेडमास्तरांना पाहून एकाएकी शांत होतात तसे काहीसे गुलजारसिंगचे झाले. सारे टोळीकर बाजूला जमले. संतोकसिंग काय सांगणार ते ऐकण्याची उत्सुकता तर होतीच पण आजवरची टोळीतील खदखदीची खलबतं सरदार संतोकसिंगच्या कानी गेली असतील तर.. याची भीतीही..

"सरदार आपण? आता?" गुलजारचे बोलणे उघडपणे भ्यायल्यासारखे होते..

"गुलजार, तू दचकला आहेस की घाबरला आहेस?"

"तसं नाही सरदार.."

"तसं की कसं.. सांगू नकोस. इतके ध्यानात ठेवा.. हा सरदार संतोकसिंग एका रात्रीत सरदार नाही झाला. मला दूरवर राहून इकडची बित्तंबातमी समजते.. जास्त मी काही सांगणार नाही. थोडावेळ मी आज इथे आहे. ज्या कोणाला टोळी सोडून

जायचे आहे त्यांनी मी असेतोवर ताबडतोब निघून जावे. त्यांना कोणी हटकणार नाही की मारणार नाही. इथून बाहेर पडल्यावर त्याने स्वतःचा बचाव स्वतःच करावयाचा आहे. जंगलातून बाहेर पडताच पोलिस मागे लागले म्हणून परताल तर तो रस्ता बंद आहे. आज परिस्थिती पूर्ण बदलली आहे. तेव्हा विचार करून निर्णय घ्या. गुलजार सिंग.."

"जी सरदार.."

"तू मोठा.. तू आणि तुझे साथीदार जमा कर.. निघण्याची तयारी कर.."

"नाही सरदार. आम्ही तुमचे मीठ खाल्ले आहे.."

"मीठ की साखर.. हवे ते खा. जायचे असेल तर आता बाहेर पडा. यानंतर थोडीही कुजबूज कानी आली तर गाठ सरदार संतोकसिंगशी आहे हे विसरू नका.."

संतोकसिंगच्या दिलेल्या दमानंतर टोळीतील खलबतं बंद झाली. सध्याच्या घडीला शस्त्रे खाली टाकण्यावाचून पर्याय नाही याची जाणीव सर्वांना झाली. बंडखोरी करून जीव गमावण्यापेक्षा सरदार संतोकसिंगचे ऐकून जे मिळेल तर पदरी पाडून घेण महत्त्वाचे इतके ध्यानी आले..

समशेर आणि दिलदारचा रस्ता आता अधिकच सुकर झाला.. कधी एकदा कजरीला हे सारे सांगतो असे दिलदारला झाले.. तर समशेरला गुरूदासपुरी गीता उघड्या डोळ्यांतील स्वप्नात दिसायला लागली!

२६.

# एक पाऊल अजून पुढे!

शेवटी एकदाचे मास्तर भेटलेच. पहाटे पहाटे समशेर आणि दिलदार मास्तरांच्या घरी पोहोचले. गेल्या काही दिवसांत खूप काही घडून गेलेले. त्यानंतर मास्तरांची ही भेट..

"नमस्ते गुरूजी."

"अरे वा! या! काय नवीन बातमी? कजरीबेटीबद्दल असणार तर गोडच असणार. आणि तुझी भगवद् गीता.. पारायणे सुरू केलीस की नाही समशेर?"

"काय तुम्ही गुरूजी .."

"अरे लाजू नकोस. एका डाकूला लाजणे शोभत नाही समशेर .."

"डाकू? आमची शरणागती.."

"अरे ठाऊक आहे.. गंमत थोडीशी."

"आम्ही दोनवेळा येऊन गेलो गुरूजी."

"असणार. थोडा व्यस्त होतो."

"तुम्ही सरदारांशी बोललात गुरूजी .. त्यादिवशी आम्ही आलो तर.."

"अरे, एखादी डाकूंची टोळी शरण येणे काही साधी गोष्ट आहे? सगळीकडून प्रयत्न करावे लागतात. चारी बाजूने."

"पण गुरूजी बातम्यांमध्ये ते मंत्रीच सारे श्रेय घेऊन गेले .."

"जाऊ देत की. काम चांगले झाले हे महत्त्वाचे. आपले काम आहे काम करणे. त्यांचे श्रेय घेणे. पण याचे खरे श्रेय तुम्हा दोघांना आणि कजरीला."

"आम्हाला?"

"अर्थात. हा दिलदार कजरीच्या मागे लागला नसता तर या समशेरने माझे अपहरण केले असते? नि मला तुम्ही भेटला नसतात तर पुढच्या गोष्टी झाल्या असत्या? गोष्टी घडायच्या असतील तर अशा घडत जातात.."

"पण गुरूजी तुम्ही नसता तर.."

"मी निमित्तमात्र. अरे, निवडणुकांसारखी दुसरी चांगली गोष्ट नाही .. म्हणजे संतोकसिंगला आधी डाकूगिरीची धुंदी होती, ती धुंदी आता निवडून येण्यात दिसायला लागली. आपण नेमकी संधी पाहून घाव घातला की काम फत्ते.. राजकारण ह्यालाच म्हणतात. राजकारण वाईट नाही, पण लोक स्वतःच्या फायद्यासाठी वापरतात ते वाईट. पण वाईटातून चांगले निघते ते असे.. तर दिलदार .. पेढे कधी लग्नाचे?"

"काय गुरूजी तुम्ही .."

"लाजतोयस? तुम्हा डाकू लोकांत लाजण्याची साथ आलीय की काय?"

"गुरूजी, तिच्या घरी कोण मानणार? मी हा असा.. न शिकलेला. काम नाही .."

"दिलदार, तू काळजी करू नकोस. फक्त तुला राजस्थानात जावे लागेल.. तिकडे माझे छोटे घर नि थोडी जमीन आहे.. कजरीबेटीला घेऊन जा. मेहनत कर.. कष्ट केलेस तर कमाई दूर नाही. बाकी मार्ग दाखवायला मी आहेच.."

"पण गुरूजी तुमचे घर.. राजस्थानात?"

"ते सारे नंतर सांगेन बेटा.. पण समज तुला ती माझ्याकडून लग्नाची भेट आहे. खरेतर तुझे बक्षिसच म्हणायला हवे ह्या सगळ्यासाठी. पण तू म्हणशील कजरीच तुझे बक्षिस.. तेव्हा दुसरे काही बक्षिस नको.."

"गुरूजी तुम्ही पण.."

"पण आता कजरीच्या घरी.. तुमच्यात काय म्हणतात ती फिल्डिंग लावावी लागेल तुला .. आधी कजरीसाठी लावली तशी काहीतरी."

"फिल्डिंग? काय तुम्ही गुरूजी.."

"खोटेय की काय? तुम्ही हेच म्हणता ना? आता त्याबद्दल विचार कर. तू समशेर आपली उपसलेली समशेर टाकून गीतापठणाचा विचार कर. सदा सर्वदा तोच विचार केलास की मार्ग सापडेलच. दिलदार इथवर पोहोचेल असा कोणी विचार केला असेल?"

"तुम्ही सांगाल तसे गुरूजी."

"आणि मधून मधून लाजायला हरकत नाही. डाकू लोकं लाजताना जास्तच सुंदर दिसतात .."

"काय तुम्ही गुरूजी. आमची टांग खेचता.."

"ठीक आहे राहिले. आता निघा .. तुम्हाला आपापलींना भेटायचे असेल. रस्ता दूरचा आहे. दिलदार आधी पोस्टमन होता तेव्हा ठीक होते.. आता तो डाकिया नाही नि डाकूही नाही, नाही का?"

"गुरूजी तुम्ही पण ना .. पण गुरूजी, सरदार माझ्यावर रागावले असणार का? हल्ली दोन तीनदा येऊन गेले, माझ्याकडे पाहिले पण नाही, बोलण्याची तर बात दूरची.."

"असेल ही कदाचित तसे दिलदार. पण या सगळ्यात सगळ्यांचेच भले होतेय हे ध्यानी घे. गावातील सारे, तू, कजरी, हा समशेर, सगळे टोळीतील डाकू नि खुद्द संतोकसिंग .. सगळ्यांचा फायदा आहे यात."

"खरे आहे गुरूजी .."

दोघे निघाले. आता पुढे काय? कजरीच्या घरचा किल्ला सर करणे महा कठीण काम. एका सन्मार्गी डाकूला मुलगी द्यायला देवभक्त पुजारीबुवा तयार होतील? संध्याकाळी कजरीला तसे म्हणाला दिलदार, तशी आपल्या शेपट्याशी खेळत ती म्हणाली,

"माझ्याकडे एक चांगली कल्पना आहे.."

"सांग."

"तू ओळखतोस त्यांना, त्यांची मदत घेऊ. म्हणजे ते पोस्टमन काका ओळखायचे त्यांना .."

"कोणाला?"

"ओळख कोणाबद्दल बोलत असेन?"

"काहीतरीच. पोस्टमनला जे ठाऊक ते या दिलदारला कसे ठाऊक. बिचारा तो पोस्टमन कधीच मृत झाला. गेला बिचारा .."

"हो ना. तसा चांगला होता.."

"पुनर्जन्म झाला त्याचा. पूर्वजन्मीच्या गोष्टी या जन्मी नाही आठवत.."

"पण आचार्य लाल यांची मदत घे.. आता आचार्य कोण हे विचार .."

"कोण आचार्य..? शहाणीच आहेस. तुला हे ही माहिती होते? काय भयंकर आहेस तू? अजून काय काय ठाऊक आहे तुला?"

"तुला काय वाटले? तू इतरांना फसवू शकशील.. पण मला? आणि मालती कोण? कळले ना की नाही? गावातल्या कजरीचं लग्न ठरलं तर एका माणसाचा चेहरा त्या दाढीच्या आत बघण्यासारखा झाला होता.. मावशीचा हात पहायचा होता तुला.."

"कोण म्हणाले? तुझा पहायचा होता. मला काय वाटलं होते सांगू?"

"काय वाटणार? पण मला गुरूजींनी फक्त डाकू आणि डाकिया बद्दल सांगितलेले, या आचार्यांबद्दल नाही. ते मीच समजले आपोआप.."

"तशी तू आहेसच हुशार. अतिहुशार खरेतर. अगं, मला वाटले की तुला घरच्यांनी घरात कोंडून ठेवले की काय ते पत्र हाती लागल्यावर. तुला शोधायला आलेलो.."

"आणि मावशी आणि बाबा कसला पत्ताच लागू देत नव्हते .. खूप मजा आली."

"मजा कसली.. मला घाम सुटलेला.."

"आता परत सुटेल.. आचार्य लाल .. पूर्ण नाव आठवतेय ना? नाहीतर नवीन काहीतरी सांगशील.."

"म्हणजे?"

"म्हणजे? तू परत एकदा ये. देवीचा आदेश म्हणून .."

"आणि काय करू?"

"ते मी सांगू? मागच्या वेळी स्वतः ठरवलेस ना.."

"तेव्हाची गोष्ट वेगळी. आता वेगळी.."

"एक लक्षात ठेव. लीला.. आता लीला कोण विचारू नकोस. तुला ठाऊक आहे.."

"तिचं काय?"

"तिला मदत कर.."

"मी?"

"अर्थात आचार्य.."

"कशी काय?"

"एका दगडात दोन पक्षी .. एका गोळीत दोन पक्षी.."

"बाप रे! डाकू दिलदार बंदूक घेऊन येणार की काय?"

"ऐक.. लीलाला गावातील एक मुलगा आवडतो. तिचे आणि माझे एकाच वेळी लग्न लावणे शुभ .. हेच तुला सांगायचे आहे.."

"तुझे? कोणाशी?"

"कोणाशी? त्या पांढऱ्या दाढीवाल्या आचार्याशी. तुला कशाला उचापती नसत्या?"

"पण यात माझे काय?"

"ते तू ठरव. घरी कोणाला कसे पटवायचे ते हस्तसामुद्रिक आचार्यच ठरवतील.."

"कठीण काम आहे.. पण तू लपून बसू नकोस. सासऱ्यासमोर तुझा हात हातात घेऊन बसण्याची गंमतच वेगळी .."

"मग कधी येतोस? नाही, कधी येता आचार्य?"

"लवकरच."

"हिंमतलालला जाऊन धन्यवाद देऊन यायला हवेत.."

"म्हणजे? तुला हिंमतलालची गोष्ट ही ठाऊक आहे?"

"अर्थात. त वरून ताकभात कळायला हवे.. तितकी हुशार आहे मी.."

"तितकी? जरा जास्तच हुशार आहेस.."

"जरा त्या लीलाच्या लीला कोणाबरोबर नि त्या मनुष्य प्राण्याचे गुणवर्णन केले तर चांगले होईल. म्हणजे त्या हिशेबाने आचार्य बोलतील.."

"सांगेन आचार्य. आधी लीलाकडून लीलया माहिती मिळवेन मग सांगेन."

"तशी तिने माझी माहिती काढली असेल की नाही?"

"अर्थात."

"मग तू काय केलेस वर्णन. अर्थात तुला शब्द अपुरे पडले असतील .."

"हो ना.. सांगितले तिला.. जगातील सर्वात बावळट आणि बुद्धू कोणी असेल .. तर तो तू.."

"आणि माझा उद्धार करणारी तू? तू तर शंभरपटीने जास्तच बावळटी असायला हवी!"

दिलदार परतला तो नवी उमेद घेऊन. त्याचे स्वप्न साकार होण्याची लक्षणे दिसत होती. एक एक गोष्ट पुढे सरकत होती. एका कजरीपायी इतके सारे घडले.. ती चांगली म्हणून सारे चांगलेच घडले आणि घडणार.. आता पुढील चाल.. आचार्य बनून परत जाणे. मागच्या वेळेचा तपशील नीट आठवणे गरजेचे. त्यात गफलत होऊन चालायचे नाही. सासरेबुवांकडे दूध नि केळी खावी लागतील.. काही हरकत नाही. कजरी संपादन कार्यात एवढे तर करावेच लागेल..

समशेरला सांगून परत वेशांतर करणे आले..

"समशेर, यार.. दिलकी पुकार.."

दिलदारच्या हाकेने समशेर दचकलाच.. कारण तो गीतास्मरण करत मास्तरांच्या आदेशाचे पालन करत होता! त्यात व्यत्यय आणला कुणी तर तो दचकणे स्वाभाविकच होते!

२७.

# पूर्वतयारी!

कजरीच्या घरी दिलदारचे आचार्य बनून जाणे थोडे दूरवर गेले, कारण पुजारीबुवाच आपल्या दूरच्या गावी काही दिवसांसाठी निघून गेले. आता त्यांची वाट पाहाणे आले..

नदीकिनारी कजरीला दिलदार सांगत होता,

"तुला सांगू, प्रियेची वाट पाहणारा प्रियकर असेल पण आपल्या सासऱ्याची आतुरतेने वाट पाहणारा मीच एक असणार जगात."

"का? म्हातारा आचार्य बनायची इतकी हौस आहे?"

"नाही. तुझा हात पकडून बसायची आहे.. तू अशी बसलीयेस नि मी हात पाहून भविष्य घडवतोय.."

"ज्योतिषीबुवा, भविष्य सांगतात .."

"असतील ही. आम्ही घडवतो .. तर मी भविष्य घडवेन.. मग तुझ्या डोळ्यांत डोळे घालून प्रत्यक्ष तुझ्याच घरी बसेन. सर्वांसमोर.. चेहरा वाचन करत! काय छान कल्पना आहे!"

"छान कल्पना आहे म्हणे.. हां.. तशी छानच आहे कल्पना .."

"तुला सांगू काल खूप दिवसांनी कविता सुचली.."

"तू आणि कविता?"

"अर्थात. मला सुचतात. कविता करणारा मी जगातील पहिला डाकू असणार .."

"कविता करणारा डाकू?"

"अर्थात. जगातील पहिला.. डाकू कवी.."

"डाकू की लडाकू? गुरूजी म्हणाले मला, प्रत्यक्ष बंदुकीने लढण्यापेक्षा ही लढाई कठीण आहे. परिस्थितीशी लढणे.."

"असं म्हणाले गुरूजी?"

"आणि असंही म्हणाले, तुला सांगू नकोस हे. नाहीतर चढून बसायचास हरभऱ्याच्या झाडावर.."

"असं का?"

"खरंच."

"ऐक ना माझी कविता .."

"ऐकावीच लागेल? तर ऐकते.."

"अर्थात ऐकावी लागेलच.. तुझ्यावरच केलीय ती.. आणि चांगली नसेल किंवा आवडली नाही तुला, तर दोष तुझा.. कारण तू जशी आहेस तशी ही कविता.."

"वा रे वा! बरं ऐकव.. आलिया भोगासी.."

"चूप. भोग आपले भोग. आणि ऐक आता.. मी एका भुंग्यासारखा.. पण त्यादिवशी तू पहिल्यांदा दिसलीस आणि.. एखाद्या कमळ फुलात भुंगा अलगद अडकावा तसा मी अडकलो .. ती हवीहवीशी कैद ..

पाहिले तुलाच मी
अन घडले ते काही
माझ्याच ह्रदयीचे
मज कळलेच नाही..

झंकारल्या तारा ह्रदयी
चिंब झाल्या भावना
सांग तू आवरू कसा
सांग ना माझ्या मना

गेलीस तू निमिषात ही
वळूनी मन मागे पाही..

होतीस उभी तू
उन्हात वाळवीत केस

टपटपत पडती थेंब ते
ओलांडूनी मनीची वेस

त्या थेंबांचा भार असा
सहन मज झालाच नाही..

आज ही दुनिया कशी
एका क्षणात बदलली
भ्रमरासम अचपळ वृत्ती
पुष्पात ती अडकली

सुटण्याची त्यातूनी
इच्छा मनी न बिलकुल ही..

कशी वाटली?"
"वा! भुंग्याची भुणभूण.. छान.."
"म्हणावेच लागेल .. छान. कारण आहेच ती.. छान. तुझ्यासारखी.."
"तुला इतकी सारी भाषा चांगली कशी येते रे? अगदी कविता करण्याइतकी?"

"अर्थात माझी आई. ती कविता करायची. स्वतःचीच गाणी स्वतः गायची. या जंगलात नसती ना तर खूप मोठी झाली असती. छान होती ती.. तुझ्यासारखी.."

"आज कौतुक जास्तच सुचतेय माझे."

"माझी चूक नाही, तूच आहेस तशी तर.."

"नक्कीच काहीतरी घोटाळा दिसतोय .."

"हे चांगलेय.. कौतुक केलं तरी त्यात घोटाळा शोधतेस तू.. आता आचार्य येतील घरी तेव्हा तुझे लग्न त्या गावच्या सावकाराबरोबर लावायला सांगतो.."

"क्काय?"

"हजारीमल सावकार. पैसेवाला आहे. ढेरपोट्या. त्याची एक बायको नुकतीच गेली. दुसरे लग्न करेलच लवकर. बनशील तू हजारीमलची कजारी शेठाणी.. तुझ्या घरी आचार्य सांगतील तसेच होणार .. तेव्हा आता मी सांगेन तसेच होणार.."

"वा रे! मी सांगेन तसेच होणार.. आचार्या, तुझी ती दाढी उपटून हातात नाही देणार मी?"

"अरे वा! म्हणजे बघ हा दिलदारच तुझा दिलवर.. म्हणजे तुला मी इतका आवडतो.."

"चुप रे.. आता मी रागावले तर बोलणारच नाही. मग बस नुसत्या कविता करत.."

"ठीकेय.. राहिले. पण तू बरी रोज नदीकाठी येतेस? घरातून येऊ देतात?"

"इतक्या दिवसांनी विचारतोयस?"

"मग काय डाकिया बनून हे प्रश्न विचारले असते? तितकी हुशारी दाखवावी लागते. मोहब्बत की राहोंमें चलना संभलके म्हणतात.."

"वा! मोठा हुशार तू! लीला आहे ना.. तिला मी नि मला ती.. एकमेकांना मदत करतो आम्ही.. तिला तिच्या त्याला भेटायला सकाळी जायचे असते. ती पण इथेच येते.."

"काय सांगतेस? पण एक गोष्ट कठीण आहे.. मैं तुझसे मिलने आई मंदिर जाने के बहाने असले गाणेही गाऊ शकत नाही.."

"का? गाऊ शकतो!"

"आता कुठेय हुशारी? मंदिरातच राहणाऱ्या तुम्ही .. मंदिर जाने का बहाना कोठून शोधणार?"

"ते ही खरेच रे.. मग आम्ही गातो.. मैं तुझसे मिलने आई नदीमें नहाने के बहाने.. आहे की नाही छान गाणे? पण इतके दिवस आलेच ना मी..?"

"ते तर खरंच. आपण ह्या खडकाचे नावच प्रेमाचा दगड ठेऊया.. मैलाचा दगड असतो तसा. प्रेमाचा दगड!"

"छान कल्पना .. दोन प्रेमकथा पाहणारा एक मोठा खडक.. प्रेमाचा दगड, प्रेम पत्थर!"

"गुरूजी आहेत म्हणून, नाहीतर तोच दगड तुझ्या घरच्यांनी माझ्या डोक्यात घातला असता.."

"आणि मग मी गाणं म्हटले असते .. लोगों न मारो इसे.. यह तो मेरा दिलदार है!"

"छान! तुला काही गाता यावे म्हणून माझ्या डोक्यात हा काला पत्थर?"

"काय हरकत आहे?"

दोन दिवसांत पुजारीबुवा परतले नि दिलदारच्या वेशांतराची वेळ आली. आधीचे सारे आठवणे गरजेचे. यावेळी काम अधिक जोखमीचे. एकावेळी लीला नि कजरी, दोघींच्या लग्नाचा बार उडवायचा, वर त्यातील एक नियोजित वर, भूतपूर्व दरोडेखोर अशी उपाधी असणारा.. तर तयारी तशीच जबरदस्त हवी. भैरवलालला परत पकडून आणावे? आता हे धोकादायक.. एकतर संतोकसिंगट टोळीने हे काम सोडलेले, आणि त्याहूनही महत्त्वाचे, हा भैरवलाल कुठूनही पुजारीबुवांच्या संपर्कात आला तर मुश्किल.

आणि एके दिवशी कजरीची खबर आलीच.. कजरीकडून.

"तुझा तो ज्योतिषी, भैरवलाल येणार आहे लवकरच घरी."

"काय बातमी आहे! काय म्हणतेस? कशासाठी?"

"ते नाही ठाऊक. घरी सगळ्यांचा जोतिषावर विश्वास खूप. आता हा भैरवलाल आला मध्ये तर कठीण आहे."

"आणि मी येणार तेव्हाच जर आला तो तर अजूनच कठीण आहे. तो तर या वेशांतरसकट ओळखेल मला. त्याला सारी अंडीपिल्ली ठाऊक.."

"अंडीपिल्ली? आमच्या घरात नाही चालणार मांसाहार.. आधीच सांगतेय.."

"आता कुठे गेली तुझी हुशारी? मांसाहार म्हणे!"

"ठीकेय.. पण तू अजूनपर्यंत आला का नाहीस? कसली वाट पाहतोस? आचार्य मुहूर्त काढून देणारेत?"

"मी तयारी करत होतो. एकाच मांडवात दोघींना उजवून टाकायला सासरेबुवांना तयार करायचे तर.. मेहनत तर लागणारच. पण आता मी उद्याच येतो.."

"ये, नाहीतर हा टोळभैरव कोणाच्या गळ्यात बांधून टाकेल मला ठाऊक नाही!"

"खरंय! माझे ठीक आहे. दुसरा कोणी असा धोका पत्करेल.. बिचारा!"

"असे काय? मी जातेच त्या हजारीमलकडे.."

"ऐक ना.. उद्याच आचार्य येणार. आणि मी समशेरला सांगतो भैरवलालला सांगायला, काही झाले तरी त्याने तुझ्या गावाकडे फिरकायचे नाही. डाकूगिरी सोडली तरी नुसता दम तर देता येतोच ना! नाहीतर हा भैरू पैलवान पुजारीबुवांना आमचे उपद्व्याप सांगत बसेल.. अगदी तिखट मीठ मसाला लावून आणि पुजारीबुवांना येईल संशय."

"त्यांना हा भैरव कशासाठी नि कुठे भेटला कोणास ठाऊक. पण गावच्या ज्योतिषापेक्षा काशीचे आचार्य मोठे. ते सांगतील तेच खरे! मी म्हणाले बाबांना की आपण आचार्यांनाच बोलावूया. त्यांचा अभ्यास मोठा नि अधिकार मोठा."

"खरेय ते!"

"खरेय काय? तर ते म्हणाले, त्यांचा काय ठाव ठिकाणा? देवीचा संदेश आला तरच येतील म्हणे. आता पोस्टमनला तर देवीचे थेट पत्रच येणार की नाही? तर दिलदार पोस्टमन, जास्त वेळ दवडू नका. देवीचा संदेश आलाय. उठा. जलदीने या

आणि भैरवलाल येण्याच्या आत सारे काम संपवून टाका. आचार्य.. लवकरच आमच्या घरी यावे.."

"जो हुकूम राणी सरकार, नव्हे कजरी देवी .."

त्या दिवशी रात्री दिलदार आणि समशेर परत तयारीला लागले. भैरवलालला भेटायच्या निमित्ताने गुरुदासपुरात जायला मिळेल म्हणून समशेर खूश होता नि प्रत्यक्ष कजरीच्या घरी जायचे म्हणून दिलदार. काही चुका होऊ नये म्हणून मनातल्या मनात तो तालीम केल्यासारखे बोलू लागला. आता कजरी-दिलदारच्या लग्नाचे भवितव्य ज्योतिषी आचार्य दिलजार लाल काशी यांच्या हातात होते.. आणि कजरीचा हात हातात घेऊन ते आता भविष्य घडवणार होते. यशस्वी झाले तर दिलदारच्या प्रेमकथेला पूर्णत्व येणार होते..

अस्वस्थपणे दिलदार दुसऱ्या दिवशीची वाट पाहात झोपी गेला.

२८.

# पुन्हा आचार्य!

मौर्या पुजारीबुवा आरती संपवून घरी परतले आणि दरवाजावर थाप पडली..

"प्रणाम!"

"आपण आचार्य? वा! या या.."

"देवीका संदेसा आया. चले आए."

"अलभ्य दर्शन. अलभ्य लाभ. तुमची आठवण काढली होती हल्लीच. आपल्यासारख्यांचे चरण आमच्या घराला लागले.. "

"पांव तो लगे आपके घर, पर वह तो हमारे हाथोंमें नहीं. देवीका इशारा हुवा तो जहां भी हो चले जाते हैं. आज रात संदेसा आया. मौर्यागुरूजी जैसे पुण्यशील व्यक्तिके घर जाने के लिए. चले आए."

"बहुत शुक्रिया. रसीलाबेन.. आचार्यजी आए हैं. दूध आणि केळी आणा.."

आतून रसीलाबेन बाहेर आल्या. मागच्या वेळी कपभर दूध होते. यावेळी मोठा प्याला भर! दिलदारला दुधाचे वावडे.. त्यात हा मोठा प्याला. केळी ठीक.. पण दूध? ज्योतिषी झाला म्हणून त्याने चहासारखी पेये पिऊ नयेत असा नियम आहे की काय? दूध न पिण्यासाठी काहीतरी कारण शोधायला हवे .. पण ते महत्त्वाचे की आजचा आपला हा अभिनय? दूरगामी विचार करता महत्त्वाचे ते कजरी संपादन. त्यासाठी

ह्या ग्लासभर दुधाची ती काय तमा! इश्कका जहरी प्याला पीते हैं लोग. तिथे पेलाभर दुधाचे काय!

"मला कालच देवाचा संदेश आलेला. तुम्ही येणार म्हणून. मी म्हणाले ही, भैरवलालना नको, आपले आचार्यच आपल्याला मार्गदर्शन करतील. देवाच्या भक्तीतच एक शक्ती आहे. देवभक्ती मनापासून केली तर तो कोणाना कोणाच्या रूपात येतोच.." दुधाचा प्याला हातात देत रसीलाबेन भक्तिरस निर्मितीत तल्लीन झाल्या.

"घ्या ना आचार्य. केळी घ्या. दूध घ्या. मी मुद्दाम काढून ठेवलेले बाजूला. तुमच्यासाठी.."

ज्या कोणी देवाचा संदेश या रसीलाबेनला जात असेल त्या देवाचा दिलदारला मनातल्या मनात राग आला.. कसाबसा 'आमचा प्याला दुधाचा, डोळे मिटून प्यायचा' म्हणत एका घोटात त्याने दूध घशाखाली उतरवले. फार पूर्वी त्याची आई मागे लागायची तेव्हा प्यायलेल्या दुधानंतर आज खूप वर्षांनी तो इतके दूध परत पीत होता.. त्याच्या दाढी मिशांच्या जंजाळामागे त्याचे वाकडे तोंड कोणाला दिसणार नाही इतकाच काय तो दिलासा होता.

"कैसी हैं रसीलाबेन?"

"मी कशी असणार? सगळी त्याची कृपा. ठेविले अनंते तैसेचि रहावे. दिवस काढतेय. ढकलतेय. आता लीलाच्या लग्नाची काळजी. एक मुलगी सासरी गेली. आता लीलाचा नंबर."

"उसी सिलसिलेमें आया हूं. मैं हस्तसामुद्रिक. विवाह स्पेशालिस्ट. लेकिन आप चिंता मत कीजिए. वह लडकी बडी भाग्यवान है."

"सो तो है. तुम्ही मागच्या वेळी आलात तेव्हा लीला भेटली नव्हती. आज आहे घरी.."

"लीला मतलब आपकी छोटीवाली कन्या.." कजरीचे नाव यावे म्हणून मुद्दाम चूक करत दिलदार म्हणाला.

"नाही हो. मोठी. छोटीवाली अजून छोटी आहे."

"सही है. पर लडकियां बहुत जल्दी सयानी हो जाती हैं. हम तो हाथ पढकर और चेहरा देखकर बता देते हैं उनके विवाह के बारे में."

"तेच म्हटले मी. अलभ्य लाभ. मी भैरवलाल ज्योतिषीना बोलावणे धाडलेले. येणार होते म्हणाले. आता तुम्ही आलात तर.."

"भैरव? वह तो मेराही चेला है. आप उसे संदेश भेज दीजिए. गुरूजी आ गए कहना."

"ठीक आहे ना आचार्य. आता तुम्हीच आलात तर.."

"बुलाइए आपकी दोनों कन्याओंको. आज हाथ देखकर ही बताता हूं. पिछले समय उनकी सिर्फ तस्वीर देखी थी. आज हाथ देख लेंगे. और कन्याओंका क्या? देखते देखते बडी हो जाती हैं. छोटी है समझते हैं पर कब बडी हो गईं पता ही नहीं चलता.."

"खरंय तुमचे आचार्य. आमची लीला आम्हाला लहानच वाटते अजून. पण जनरीत आहे. वेळच्या वेळी सगळे उरकले की बरे असते." दिलदार कजरीच्या रोखाने बोलत होता नि पुजारीबुवा कात्रजचा घाट दाखवल्यासारखे लीलाबद्दल सांगत होते!

"पोरीची जात नि उजवून टाक म्हणतात ना." रसीलाबेनने तिथल्या तिथे आपल्या भाषेला एक नवीन वाक्प्रचार अर्पण केला. पुजारीबुवांनी लीलाला मोठयाने हाक मारली..

"लीला बेटी.. ये तर बेटा खाली पटकन.."

हाक ऐकून आतून कजरी संधीची वाट पाहात टपून बसल्यासारखी प्रकट झाली..

"काय पिताजी?"

"लीला कुठेय बेटी? तिला बोलाव."

"होय पिताजी.."

कजरीला पाहून दिलदारच्या दिलाचा एक ठोका चुकलेला.. तो परत व्यवस्थित सुरू झाल्यावर दिलदार म्हणाला,

"आपकी छोटी कन्या? बडी ही सुशील है.."

"हो ना. नादान आहे अजून. पण शिकेल हळूहळू .."

लीला नि पाठोपाठ कजरी येऊन समोर उभ्या ठाकल्या.

"कजरी बेटा, तू आत जा.." रसीलाबेन बोलल्या नि कजरी निर्विकार चेहऱ्याने नाइलाजाने आत जायला निघाली. घाईघाईत दिलदार म्हणाला,

"अरे नहीं नहीं. दोनोंको बैठने दीजिए. हमने कहा था ना, एक दूसरे के भाग जुडे हुए हैं इनके.. वैसे तो जुडवा बहनें नहीं हैं पर भगवान की लीला अगाध है!जुडवा बहनों जैसे जुडे भाग इनके. लाखोंमें एक!"

पोरींचे कौतुक ऐकून पुजारीबुवा हरखले.

"बस कजरी तू ही. हे झाशीचे पंडित.."

"झाशी नाही रसीलाबेन. काशी."

"जी हां. काशी. हमारे पिताजीसे सीखी हमने यह विद्या."

"तुमचे पिताजी म्हणजे?"

आता आली पंचाईत! ऐनवेळी नाव काय सांगावे? संतोकसिंग? ज्योतिषाचार्य संतोकसिंग? पटकन विचार करत दिलदार म्हणाला,

"पंडित गिरधारीलाल. बडे असामी हुवा करते थे."

"नाम सुना है. पंडित गिरधारीलाल. मोठा माणूस!ज्योतिर्भास्कर!" पुजारीबुवांनी त्या अज्ञात नि काल्पनिक मनुष्याला प्रशस्तीपत्र बहाल केले! मुलींचे लग्न ठरवायला एखादा वधूपिता काहीही नि कशावरही असे बोलू शकतो!

"हमारा क्या है, हम एक जगह ठहरते नहीं. जहां जरूरत हो वहां चले जाते हैं. सब देवी के आदेशसे. लीला बिटिया.. आ जाना सामने. हथेली दिखाना .."

आपल्या पोतडीतून एक भिंग काढून उगाच दिलदार तिचा हात वाचू लागला. उगाच चेहऱ्यावर गंभीर भाव आणत बघू लागला. लीला कजरीची बहीण शोभावी अशीच होती. तीच पहिल्यांदा दिसली असती तर? कजरीऐवजी तिच्या मागे? आपल्याच विचारांचा त्याला तिटकारा वाटला. कजरी सोडून अन्य कोणाचा विचार मनात आणणे म्हणजे पाप.. आजवर कधी पापपुण्याचा कधीच विचार न केलेल्या दिलदारला स्वतःवरच हसू आले.

"ठीक है. अब तुम उधर बैठ जाओ बेटा. गुरूजी क्या है, इन दोनोंका भविष्य एक दूसरेसे जुडा हुवा है. जरा आपकी छुटकीका भविष्य देखूं तो साथमें बताना आसान हो जाए.. लाखोंमें एक ऐसा होता है. बडे भाग्यशाली हैं आप की आपकी ऐसी बेटी है. आओ बेटी.. हमारे पास आओ."

कजरीला बेटी म्हणताना दिलदारला हसू फुटत होते नि कजरीला ही.

"यात हसण्यासारखे काय आहे कजरी? मोठया माणसांसमोर असे दात काढणे चांगले दिसते का? उद्या सासरी गेली की असे दात काढणारेस? तिकडे आमचा उद्धार व्हायचा. मावशीने काही शिकवले की नाही म्हणतील सासरचे लोक. वळण म्हणून काही नको का मुलीच्या जातीला." रसीलाबेन केवळ आईच बोलू शकेल अशा भाषेत बोलली.

"नहीं नहीं. रसीलाबेन यह तो बडी सुशील कन्या है.

आओ तो नजदीक इधर.. बेटा!" कोणाच्या नकळत दिलदारने डोळा मारला नि कजरी तोंडावर रूमाल ठेवून हसू दाबत समोर आली.

"ये कजरी बेटा. हे आचार्य लाल काशीवरून येतात. मोठे ज्योतिषी आहेत. पंडित आहेत. दाखव बेटा हात तुझा.."

सासऱ्यासमोर कजरीचा हात हाती घेऊन नि डोळ्यात डोळे घालून बसायचा तो क्षण आला.. जणू

हाच तो क्षण ज्याची दिलदार वाट पाहात होता.

"दिखाओ अपना हाथ. और अपना चेहराभी."

"चेहरा? तो तर समोरच आहे ना आचार्य? मी काय बुरखा घालून बसलेय की पडदा?"

"कजरी.. आचार्य लडकी थोडी नादान है.. आप बुरा मत मानिए."

"नहीं नहीं. कजरीकी यह बात भी सही है. होशियार है लडकी आपकी. देखूं तो हाथ. यह चंद्र .. गुरू.. शुक्र.. सूर्य .. जीवनरेखा और यह विवाह रेखा.. ऐसे ही रहने देना हाथ .. अब सामने देखना.."

पुढील दहा मिनिटे हातात हात नि डोळ्यांत डोळे घालून दोघे बसून राहिले. बाहेर कसला तरी आवाज झाला नि दिलदार एकाएकी भानावर आला.

२९.

# जोरका झटका धीरेसे..

कजरीचा हात हातात ठेवत बारकाईने पाहात दिलदार म्हणाला,

"इतनी भाग्यशाली कन्या है आपकी. इससे आपके जीवनमें नया प्रकाश आया है. तरक्की होगी तो इसी कन्या की वजहसे. इसके हाथकी रेखा कहती हैं कि इसकी बडी बहनका भी उत्कर्ष इसीकी वजह से है.. इन दोनोंका भविष्य एक दूसरेसे ऐसा जुडा हुवा है जैसे दीया और बाती, फूल और सुगंध, डाकू और बंदूक!"

शेवटच्या उदाहरणानंतर दिलदारने जीभ चावली. लगेच पुढे म्हणाला,

"इतना गहराईसे संबंध है कि दोनोंकी शादी एकही दिन एकही जगह होना तय है.."

"काय? आचार्य, दोघांचे लग्न एकाच वेळी. म्हणजे ही कजरी लग्नाची होईपर्यंत थांबावे लागेल की काय?"

"रसीलाबेन, आचार्य म्हणतात म्हणजे थांबावेच लागेल.. हो की नाही आचार्य?"

कहानीतला हा ट्विस्ट थोडा अनपेक्षित होता. आता सावरून घेणे भाग होते.

"रूकिए थोडा और मुआईना करना होगा. कजरी, हाथ देना तुम्हारा .."

"नहीं. नहीं. अति शुभ मुहूरत नजदीक है. और दोनों की शादी नजदीकी भविष्यमें होना तय है. एक साथ एक दिन एक जगह.. एकही व्यक्ती से.."

"काय?"

"मतलब एक ही व्यक्तीसे आपको इसकी जानकारी मिलेगी.."

"काय सांगता आचार्य! दोघांच्या होणाऱ्या नवऱ्यांची ही माहिती .."

"भगवान के घर से भाग्य लिखकर भेजा जाता है. अपने भालप्रदेशपर पूरा इतिहास लिखा रहता है. जो पढ सके वह दुनिया में कुछ भी कर सकता है.. आओ बेटी.."

लीला येऊन उभी राहणार तोच दिलदार म्हणाला,

"तुम नहीं. तुम्हारे भाग्य की बात इस कजरीसे जुडी है.."

कजरीच्या डोळयांत डोळे घालून नि हात हातात घेऊन दिलदार बसला..

"ठीक है. हमें साफ साफ दिखाई दे रहा है.."

"जल्दी बताइए. मला राहवत नाही. आमचे भाग्य थोर की तुम्ही आमच्या घरी आलात."

"वह तो देवी की इच्छा. और आदेश. आदमी क्या कर सकता है? उसकी इच्छाके बगैर तो पेड का पत्ता नहीं हिल सकता."

"खरं आहे आचार्य!"

कजरीच्या चेहरा वाचनाचा कार्यक्रम पार पडला. नेत्रपल्लवी आपल्या सासऱ्यादेखत करून झाली. परत एकदा हस्तरेषांचे वाचन झाले. काय नि कसे सांगावे? दिलदार विचारात पडला.

"हमारा अनुमान यह है कि हम फिर एकबार लीलाबिटियाको देखेंगे. फिर बताएंगे.."

मग लीलाच्या हातावरील रेषा बघता बघता दिलदारचा विचार करून झाला, काय नि कसे सांगावे सारे..

"तो अब तस्वीर एकदम साफ है. हमें दिखाई दे रहा है साफ साफ.. यह लीला बिटिया है.. उसका वर इसी गांव के एक मोहल्लेमें है.. होनहार और अच्छे हुनरवाला है. घरबार अच्छा है. और 'क' से नाम शुरू होगा उसका. जल्दही उसके बारेमें आपको पता चलेगा. कैसे पता चलेगा? यह तो ईश्वरकी लीला है. यह लीला बिटिया भी तो ईश्वरकी लीला है.. तो जैसे मैं यहां देवी के आदेशसे आ पहुंचा, वह आपके घर अपने आप भगवान के आदेशपर पहुंच जाएगा. आपको सिर्फ शादी करवानी है. बाकी आप आश्वस्त रहें. लीला के नसीब में सुख ही सुख लिखा है. सिर्फ एक बातका खयाल रहे, कजरीकी और लीलाकी शादी एकसाथ ही हो. सब मंगल होगा. कुशल होगा.."

"आणि ह्या कजरीबद्दल? आम्हाला तर वाटत होते अजून दोन वर्षे पोरगी राहिल इकडे. मग सासर तर आहेच आयुष्यभर."

"खयाल मौसी और पिता के सोचसे सही ही है. अपनी बेटीको तो कोईभी अपने पास ही रखना चाहेगा. और वह कजरी जैसी हो तो बात ही और है, उसे तो सभी अपने पास रखना चाहेंगे. लेकिन होनी को कौन टाल सकता है? जो होना है होकर रहेगा. विधीलिखित में बाधा डालनेवाले हम कौन होते हैं? कईबार मनुष्य बिनामतलब अपनेही भविष्यको ललकारता है. फिर यह दुखभरा जीवन क्यों कहकर वही परमेश्वरको, भगवानको कोसता है. हमें चाहिए की भगवान की लीला और होनी को समझे.."

"जी आचार्यजी. तुम्ही सांगाल तसे."

"नहीं. कह मैं नहीं रहा. भगवानही बुलवा रहे हैं हमसे. वह भी आप जैसे सत्पुरूषके लिए. उसके लिएही हमें भेजा होगा देवीने. नहीं तो बाकी लोगोंके घर हम नहीं जाते."

"बडी कृपा है आचार्यजी."

"भगवान की कृपा है. हम उसके सादे सीधे सेवक हैं. जितना हो सके मनुष्य का जीवन सरल कर सके, तो उसमें ही हमें खुशी है.."

"जी आचार्यजी.."

"अब कजरीबिटिया के बारे में. हमें स्पष्ट दिखाई दे रहा है की उसका भी जीवन बहुत सुखी और आनंदमय होगा."

"और क्या चाहिए पंडितजी."

"लेकिन.. एक अडचन, एक बाधा हमें नजर आ रही है. उसे नजर अंदाज अगर आप कर सकेंगे तो ही यह संभव होगा."

"बाधा? आणि नजर अंदाज?"

"बताता हूं. कैसे कहूं समझ नहीं आ रहा. एक चीज याद रखें मन में. जो भी होगा उसमें कजरीका भला ही होगा.."

"असे काय होणार आहे आचार्य?"

"कहता हूं. थोडा पेचीदा मामला दिखता है, लेकिन वैसा है नहीं. थोडा आगे की सोचकर फैसला करेंगे तो आगे रास्ता सीधा सरल है. कई बार आदमी रास्ता देखकर डर जाता है. पर एक बार निकल पडे तो समझ जाता है, यह तो इतना डरावना है नहीं. बल्कि कई बार इस राहमेंही खुशियां मिलती हैं.."

"तुम्ही सांगून टाका आचार्य. आणि तुम्ही सांगाल तसेच आम्ही करू. तुम्ही भविष्य सांगत आहात. त्यात पुढे कजरीचे सुखच दिसत असेल तर आधीच्या अडचणी बाजूला ठेवाव्याच लागतील.."

"सही. सही सोच है आपकी. जैसे भी हो यह साफ अनुमान है, साफ दिखाई दे रहा है, डाकुओंके गिरोहसे कोई है जिससे कजरीका ब्याह होगा. यह निश्चित है.."

"काय? माझी पोर एका डाकूशी लग्न करेल?"

"देखिए, बात तय है. या तो सही ढंग से होगी या उसे भगा ले जाएंगे. लेकिन शादी होगी जरूर.."

"हमें तो अब ही डर लग रहा है. इससे बचें कैसे पंडितजी?"

"बचना तो है नहीं. मतलब बचना तो संभव है नहीं. लेकिन यह भी स्पष्ट रूपसे दिख रहा है, की जो भी लडका होगा, वह होनहार होगा. सन्मार्गी होगा."

"होनहार डाकू? सन्मार्गी डाकू?"

"यह उसका भविष्य कह रहा है, हस्तरेषा और चेहरेकी रेषाएं कह रही हैं. अनुमान यह है कि यह लडका गिरोहसे जरूर होगा पर डकैत नहीं होगा. उसका चरित्र एकदम साफसुथरा होगा.."

"साफसुथरा डाकू? आणि आम्ही नाही म्हटले तर पळवून घेऊन जाईल तो होनहार डाकू?"

"देखिए, दिख तो यही रहा है भविष्य में. शादी होना तो तय है. और एक बात दिख रही है, कजरी बेटी यहांपर नहीं, राजस्थान के रेगिस्तानमें राज करेगी. इतना दिखाई दे रहा है. उसका जीवन शांति और सुखमय होगा. पति अत्यंत सुस्वभावी

और नेकदिल होगा, जरूर कोई दिक्कत समझने में होगी, लेकिन भलाई उसी बात में होगी की शादी आप खुद करवा दे."

"आचार्य, यह तो बडी कठिन बात है. तुम्ही म्हणता तसे करू. पण खुद्द कजरीबेटी.. ती तयार झाली तर ना.."

"पिताजी, मी आचार्यांच्या सांगण्याबाहेर नाही. आचार्य सांगताहेत तर त्यात नक्कीच काहीतरी अर्थ असणार. त्यांना बहुतेक देवीने म्हणूनच हा दृष्टांत देऊन पाठवले असणार.."

"मला पण तेच वाटतेय. देव कोणाच्या रूपात संदेश पाठवेल सांगता येत नाही. आणि देवाचे आदेश न पाळणारे आपण कोण?"

"बात तो सही है. जो मुझे दिखाई दिया मैंने कह दिया. बेटी आपकी है. चिंता तो होगी ही. लेकिन एक बात एकदम साफ है, बच्ची का भविष्य उज्ज्वल है. यह जो लडका है, उसका खयाल रखेगा, मेरी तो राय यही है, आप जो होगा उसे सिर्फ होने में मदद करें. यह जोडियां तो उपरसे बनकर आती हैं. हम कौन हैं इसमें ना करने वाले.."

"तुमचे म्हणणे खरे आहे पण.." पुजारीबुवा अडखळत म्हणाले. पुजारीबुवा तोंडावरही होकार द्यायला तयार नाहीत पाहून दिलदारचा धीर खचू लागला. आणि आता पुढे काय करावे विचार करता करता पुढे काय वाढून ठेवलेय याचा विचार करावा लागावा अशी गोष्ट घडली.. जोरका झटका धीरेसे लागावा तसा..

- दरवाजातून भैरवलाल ज्योतिषी हळूच आत शिरला!

३०.

# भैरवलाल!

"या या. भैरवलाल."

पुजारीबुवांनी स्वागत केले नि दिलदारच्या काळजाचा ठोका चुकला. भैरवलाल! मागे कोणीतरी म्हणालेले, या जन्मातील पापांचे फळ या जन्मीच भोगावे लागते.. ते खरे होणार की काय? समशेर ह्याला भेटलाच नाही की काय? या भैरू पैलवानासमोर बचाव कसा करावा? तो या अवतारात ओळखेल? नाही ओळखले तर काम सोपे, पण तो ओळखल्यावाचून रहायचा नाही. तरीही त्याने ओळखले की नाही ओळखले हे दिलदार कसा ओळखणार होता?

मौर्या गुरूजी तोंडभरून स्वागत करत म्हणाले,

"काय योगायोग भैरवलाल पंडित. तुमचे गुरूजी ही इथेच आहेत.."

भैरवलाल दिलदारला त्या अवतारात पाहून थबकला, मग घाबरला. काही महिन्यांपूर्वी डाकूंच्या टोळीने केलेले अपहरण आठवून त्याला घाम फुटला. हिंमतलालची करामत अशी कामाला येत आहे नि ह्या दिलदारने अशा कुठल्या योजनेसाठी आपले अपहरण करवले.. काही असो, इथून प्रथम बाहेर पडणे महत्त्वाचे.

"आओ, आओ भैरवलाल. हमारे सर्वोत्तम शिष्य. गुरुदासपूर का बडा ज्योतिषी है. हमें पहचाना की नहीं?"

"असे कसे म्हणता आचार्य? शिष्यास कधी गुरूचा विसर पडेल का? हो की नाही पंडित भैरवलाल?" पुजारीबुवा म्हणाले. भैरवलालच्या तोंडाला कोरड पडलेली. कसाबसा म्हणाला, "हो ना. प्रणाम गुरूदेव. प्रणाम!"

दिलदारने त्याला हाताने धरून आपल्या बाजूला उभे केले. न जाणो काही बोलला भैरवलाल, तर त्याला तिथेच थांबवता येईल.

"प्रणाम. भैरवलाल, बडे अरसेके बाद मिल रहे हैं. मौर्यागुरूजी, बडा होनहार और मेहनती है छात्र हमारा. भैरव यहां आनेवाला है मालूम होता तो हम आते नहीं. मतलब हमारे आनेकी जरूरत नहीं थी."

"असे कसे आचार्य? तुम्ही मोठे, तुमच्या ज्ञानाचा आवाका मोठा. हो की नाही भैरवलाल पंडित?"

"अर्थात. मोठ्या लोकांसमोर आपण काय बोलणार?"

"अरे भैरव, वैसा नहीं. मैं यहां इन दोनों कन्याओंके विवाह के सिलसिले में आया था. बडी सुशील और सुंदर हैं दोनों. उसके बारे में सलाह मशवरा करने आया था."

"गुरूजी, आता एकदा आचार्यांनी पाहिले, आता माझे काम काय उरले? मला वाटते मी निघतो."

भैरवलाल तिकडून काढता पाय घेता येईल तर बरे ह्या विचाराने म्हणाला, पण पुजारी बुवा इतक्यात कसले सोडणार होते? आचार्यांनी सांगितले ते अजून एकदा पडताळून पाहता आले तर बरेच.. अर्थात ते आचार्यांसमोर कसे विचारणार? पण दिलदारला विचार कळला असावा. भैरवच्या पाठीवरून खांद्यावर हात ठेवून त्याने

तो दाबला. भैरव समजायचे ते समजला. आधीच घाबरलेला तो.. आता घाम फुटायचा बाकी होता.

"क्या है भैरव, इन कन्याओंकी हस्तरेषाएं पढी मैंने, चेहरा पढा, इनके भावी पतियोंकी जानकारी दी.. तुम भी एकबार देख लेना तो मौर्यागुरूजी का समाधान हो जाएगा. आओ बेटीयों.. भैरवलालजी को हाथ दिखाना .."

"मैं तो कुंडली देखता हूं.." हे वाक्य संपेतोवर परत भैरवलालचा खांदा दाबला गेला..

"वैसे तो मैं कुंडली देखता हूं.. पण आचार्यांनी शिकवलेले हस्तसामुद्रिक .. पाहू तुमचा हात.."

थोडा वेळ गेला नि भैरवलाल काही बोलण्याच्या आत दिलदार म्हणाला,

"देखो भैरव.. इस चंद्र को और गुरू को देखो. सूर्यकी शीतल छाया है इनपर.. अच्छा मौर्याजी, सूर्यकी दो तरह की छायाएं होती हैं, शीतल और उष्ण. लीलाबेटीपर शीतल छाया है. मैंने कहा था, क अक्षरसे पति मिलेगा. सुख ही सुख लिखा हुवा है.."

"जी आचार्यजी.."

"अब कजरीबेटी का हाथ देखना.."

बेटी म्हणताना दिलदारने नजर दुसरीकडे वळवली. कजरीने रूमालामागे हसू दाबले..

"इसकी हथेली देखिए. चेहराभी मैंने गौरसे देखा है. सुशील और भाग्यशाली कन्या. हांलाकि मैंने देखा है भैरव, की इसका विवाह एक होनहार और सरल मार्गी डाकूपुत्र से होगा.. यह होना तय है.."

इथे भैरवलालच्या डोक्यात प्रकाश पडला. या डाकूंच्या फंदात पडणे असे ही धोकादायक.. विचार केल्यासारखा दाखवत म्हणाला,

"गुरूजी, आचार्य म्हणतात ते अगदी बरोबर आहे. हे विवाह होणार म्हणजे होणारच. त्यात कोणताही बदल संभवत नाही."

"और मैंने यह भी देखा है भैरव, बेटीका भाग्य बहुत ही जोरोंपर है.. डाकूपुत्र होने के बावजूद लडका होनहार होगा. यह शुक्र और शनि का मिलाप वही कह रहा है. देखो भैरव, भालरेषा को पहचानो.." मग हळूच त्याला म्हणाला,"अपनी भालरेषा और आयुष्यरेषा संभालो.."

"बिलकुल आचार्यजी. गुरूजी आजवर एखादी गोष्ट आचार्य म्हणाले तशी झाली नाही असे झाले आहे का? ते म्हणतात तर तसेच होईल. त्यांचे ज्ञान अगाध आहे. सूर्यांची शीतल छाया आज मला त्यांच्याकडून शिकायला मिळाली. धन्य आहे आचार्यजी."

"आम्ही नशीबवान खरे, असे काही घडणारच आहे, तर त्याची पूर्वसूचना मिळाली की पुढील तयारी करता येते. या लीलाचे काही नाही, पण या कजरीचा विवाह डाकूशी .. नाही म्हटले तरी बापाचे हृदय कळवळते ना.."

दिलदारच्या हाताची बोटे भैरवच्या खांद्यात परत रूतली.. चावी दिलेले खेळणे चालावे तसा भैरव परत बोलायला लागला,

"गुरूजी, तुम्ही बिलकुल चिंता करू नका. बेटीच्या आयुष्यात सुखच सुख आहे. फक्त आधी थोडे कठीण वाटेल तुम्हाला, पण मुलगा अत्यंत चांगला नि प्रेमळ असेल.. आचार्य स्वतः सांगताहेत ना.. त्यांना सगळेच ठाऊक आहे.."

"म्हणजे..?"

"आचार्यांना सगळेच भविष्यातले दिसते.."

"वह तो भगवान की देन है. लेकिन हम सिर्फ देवीके आदेशपर काम करते हैं. देवीका संदेसा आया तो ही यह भविष्य. अन्यथा हरिनाम..!"

"आता तुम्ही दोघे मोठे ज्योतिषी सांगता आहात तर तसेच होईल. कजरीला मागणी घालायला तो मुलगा स्वतः येईल.. मी तयार आहे."

"देवाजीचीच इच्छा आहे तशी. तर दुसरे काय करणार? पण देवाने काहीतरी विचार करून ठरवले असणार. आणि या गाठी वरून बांधून येतात. आपण त्यात काय करणार?" रसीलाबेनने खूप वेळाने तोंड उघडले.

"सही बात है रसीलाबेन. होनी को कौन टाल सकता है?"

"गुरूजी, तुम्ही मनात किंचितही किंतु आणू नका. आचार्य सांगताहेत तसे करा. यातच सर्वांचे भले आहे.." भैरवने आपल्या भल्याची निश्चिती केली!

शेवटचा हिरवा कंदील मिळाला नि दिलदारला आपले काम फत्ते झाल्याचे जाणवले.

"तो अब हम चलते हैं.. चलो भैरवलाल. बहुत दिनोंके बाद मुलाकात हो रही है.. निकलते हैं."

"जेवून जा आचार्य.. पंडित भैरवलाल.."

"नहीं नहीं. वापस आएंगे.."

"कधी?"

"आचार्यजी तर येतीलच परत.." भैरव म्हणाला नि त्याने जीभ चावली. दिलदारच्या चेहेऱ्याकडे पाहात म्हणाला, "आता आम्ही निघतो. जेवणासाठी परत कधीतरी .."

"हां. हमें नया संदेसा आ गया देवी का. हम निकलेंगे. चलो मेरे प्रिय छात्र भैरव.."

"असं म्हणता?"

"बस थोडा पानी पिला देना.. फिर हम प्रस्थान करते हैं.."

"जरूर. कजरीबेटा पाणी आण तर.."

समोर पाण्याचा ग्लास हातात घेऊन कजरी उभी. पाणी पिता पिता ठसका लागून त्यातील थोडे पांढऱ्या दाढीवर सांडले..

"जपून आचार्य.."

"क्या करे.. दाढी की आदत जो नहीं.." दिलदार बोलून गेला. मग एकाएकी जीभ चावत म्हणाला,"हमें आदत जो नहीं है ग्लास से पानी पीनेकी.. कमंडलूसे ही जलप्राशन करते हैं ना.."

काहीतरी सावरून घेत दिलदार म्हणाला.

"आता लग्नाला तरी या आचार्यजी. म्हणजे पोरींच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात असला म्हणजे .."

"नाही हो. आचार्य लग्नाला कसे येऊ शकतील? म्हणजे येतील पण येणार कसे?" बोलता बोलता भैरव चपापला.

"खरं आहे. लग्नाला कसा येणार आचार्य?" हळूच दिलदार म्हणाला .. मग प्रकट म्हणाला, "देवी का आदेश! देवी का आदेश हो तो आऊंगा. नहीं तो कैसे आ सकता हूं.."

नमस्कार करत दिलदार बाहेर पडला. भैरवलाल सुटका झाल्यासारखा अधिकच जोरात निघाला ..

रस्त्यात भैरवलाल होता होईतो पुढे चालण्याचा प्रयत्न करत होता..

"भैरवलाल, समशेर भेटला नाही का?" दिलदारने थोडे दूर गेल्यावर विचारले.

"नाही. गुरूजींनी बोलावले. मी आलो. मला नव्हते ठाऊक .. पण मी आळीमिळी गुप्प चिळी. एक शब्द सांगणार नाही कोणाला .."

"ते तू सांगणार नाहीस ठाऊक आहेच.. तुझी बिदागी तुला मिळेल. उद्या मी स्वतः आणून देईन."

"ठीक आहे. द्या किंवा नका देऊ.. पण माझी छोटी बालबच्ची आहेत. मला यातून दूर ठेवा.."

"भैरवलाल.. चिंता करू नकोस. फक्त यातील कोठे बाहेर बोलू नकोस.."

"नाही. नाही बोलणार. मनातल्या मनात पण नाही

मला बाकी काही नको.. मी निघतो पुढे .."

भैरवलाल जवळजवळ धावत पुढे निघाला. दूरवरून दिलदारने मागे पाहिले. वाड्याच्या वरच्या मजल्यावरील खिडकीत त्या दोघांना बघत उभ्या असलेल्या कजरीची आकृती दिसत होती.

३१.

# *गंगेत घोडे न्हाले!*

दिलदारला परतल्यावर समशेरला पाहून प्रश्न पडला.. हा भैरवलालला भेटला? की नाही भेटला? आणि का नाही भेटला? भेटला असेल तर भैरवलालची येण्याची हिंमत झाली नसती.

"समशेरा, आज कजरीच्या घरी या आचार्यास कोण भेटावा?"

"कोण?"

"तू सांग?"

"मी? मी काय सांगणार? मला कोण भेटले विचार."

"कोण?"

"तू सांग.."

"आधी मी विचारलेय.. समशेर."

"मग आधी तू बोल.."

"भैरवलाल! भैरवलाल येऊन उभा राहिला. नशिबानं शेवटीशेवटी आला नाहीतर काही खरं नव्हतं. तू भैरवलालकडे गेलाच नाहीस?"

"मी? अरे राहिले. मला गीता भेटली.. कशी ते विचार .."

"म्हणून. म्हणून तुझं लक्ष नाही दिसत. भैरवलाल आचार्यासमोर, म्हणजे माझ्यासमोर. मला वाटलं सपलं सारे.. पण वेळ निभावली.."

"काय सांगतोस काय! अरे मी चाललोच होतो तर रस्त्यात गीता दिसली. टांग्यातून चाललेली. मग तिच्या टांग्याचे चाक निखळले. ती रस्त्यावर. रस्ता सामसूम होता सगळीकडे गावाबाहेर. टांगेवाला कसाबसा उठला. मग मी उचलून घरी नेले.."

"कोणाला? टांगेवाल्याला?"

"अर्थात गीताला.."

"काय सांगतोस काय! अगदी भरधाव सुरूवात होतेय दिसतेय प्रेमकथेला. मग पुढे?"

"पुढे काय? घरात शिरलो. ती धक्क्यातून सावरली नव्हती, ती सावरेपर्यंत थांबलो. मग काहीबाही बोलणे झाले."

"बघ. माझी मदत झाली तुला."

"तुझी? ती कशी?"

"कशी काय? मी तुला भैरवलालला दम द्यायला पाठवले नसते तर भेटली असती गीता.. गीतावहिनी?"

"हुं. ते ही खरंच."

"खरंच आहे ते. मग आता पुढे?"

"अरे आजचा तो परिणाम तर जाऊ देत. मग विचार करतो. पण तुझे काम फत्ते झालेले दिसतेय. नाहीतर आला असतास तोंड लटकावून.."

"झाले. एकदाचे झाले. सासरा नामक मांजरीच्या.. नव्हे बोक्याच्या गळयात घंटा बांधून झाले."

"ससुरा मान गया?"

"मग? आचार्य लाल काशीवरून गेले तिथे. मानणारच. भैरवलाल मला पाहून घाबरला जाम. मला पाहून घाबरणारा पहिलाच कोणीतरी! मी ही त्याचा घाबरू दिले. आता फक्त जाऊन कजरीच्या घरी रीतसर मागणी घालणे बाकी आहे. आणि एकावर एक मोफत .. लीला म्हणजे तिच्या मोठया बहिणीचे पण ठरवून आलो.. आता एका मांडवात दोन शाद्या.. तुझी ठरवलीस फटाफट तर इजा बिजा तिजा करून टाकू.."

"माझी? आता कुठे सुरूवात .."

"हुं. प्रेमांकुर आता फुटला. त्याचे रोप होईल. पालवी फुटेल. मग वृक्ष होईल त्याचा. त्याला फुले फळे लगडतील. वेळ तर लागेलच. आणि झाड वाढवायचे तर मेहनतही लागेल.. खतपाणी घाल नीट.."

"तू काय अनुभवी माणूस. तुझे ऐकावे लागेल.. ऐकून घ्यावे लागेल.. ऐकतो. ही प्रेमबाग कशी फुलवायची.. दिलदार माळीबुवांकडून ऐकतो. बोलावे आचार्य माळीबुवा .."

प्रीतीची फुलबाग फुलवण्यासाठी दिलदार माळीबुवांनी घेतलेली मेहनत समशेरला दिसत तर होतीच. त्याहून अधिक दिलदार काय सांगणार होता? एकच वाक्य हरिनाथ मास्तरांचे सांगितले त्याने, 'खरेखुरे प्रेम आणि इच्छा असेल तर ते

गंगेसारखे दुथडी भरून वाहिल नि त्यात साऱ्या अडचणी वाहून जातील. आणि प्रेमाची नौका किनाऱ्यास पोहोचल्यावाचून राहणार नाही हे नक्की!'

आपल्याहून सीनियर, काॅलेजातील कोणी ज्युनियरास टीप्स देतो नि तो ज्युनियर लक्ष देऊन ऐकत असतो, तसे काहीसे समशेरचे झाले. शेवटी दिलदारने शून्यातून आपली प्रेमकथा पुढे सुफळ संपूर्ण करत आणली होती! समशेर आता कुठे त्या प्रवासाची सुरूवात करत होता.

एवढी मोठी गोष्ट सांगायची तर प्रथम हरिनाथ मास्तरांनाच .. दोघेही भररात्री हरिनामपुरी निघाले. कजरीच्या घराबाहेर रात्री थबकले. घोड्याच्या टापांचा आवाज कजरीने ऐकलेला.. दोन्ही घोडेस्वारांकडे पाहून तिने हात केला.. दिलदार मनाशीच खुदकन हसला.

हरिनाथ मास्तरांची अपेक्षा होती तसतसे घडत होते. आधी टोळीची शरणागती नि आता दिलदारची कजरीच्या आघाडीवर प्रगती. शेवटी प्रेमानेच सारे जग जिंकता येते. दिसायला बंदुकीच्या गोळीचा धाक दिसतो. दहशत दिसते. लोक मान तुकवताना दिसतात, त्या जोरावर एखाद्या प्रदेशावर राज्य करता येईल पण मनावर राज्य करायला नि ते जिंकायला प्रेमच हवे. दिलदारच्या कजरीवरील प्रेमाने कितीतरी बदल घडताना दिसत होते. मास्तर समाधानी होते.

"आलात दोघे. मैदान मारून?"

"काल कजरीकडे गेलेलो गुरूजी. आचार्य बनून. मौर्यागुरूजींना पटवून आलोय.."

"अतिशय मेहनत करतोयस. तसा मी खोटेपणाच्या विरूद्ध आहे, पण थोडे राजकारण करायचे तर डावपेच खेळावे लागतात. त्यांना तुझा नेक इरादा पटवून देणे शक्य नाही. आता तुमचे शुभमंगल होऊन कजरी सुखात राहिली की आपोआप पटेल. हे आचार्य प्रकरण म्हणजे.. तू नाटकात वगैरे काम करायचा विचार करायला हरकत नाही. कजरी बेटीने सांगितलेले मला तू आचार्य बनून गेलेलास ते."

"ते आधी. आता परत.."

"ते कळले मला. आता पुढे काय?"

"जोवर त्या आचार्यांच्या बोलण्याचा परिणाम आहे तोवर लग्नाची मागणी घालून येईन. मग पुढे .."

"पुढे काय? तुला सांगितले तसे. राजस्थानातील घरी तू नि कजरीबेटी. सुखाने रहा. मी येईनच आशीर्वाद द्यायला. आणि तुमचे काय डाकू समशेरसिंग?"

"गुरूजी, काल गीतापठण करून आलाय. पहिला अध्याय .. आता बाकी कधी आणि कसे.."

"करेल. समशेरच्या समशेरीत तेज आहे. ती तळपेल.."

"गुरूजी तुमचा आशीर्वाद असेल तर.."

"तो तर आहेच.. आता शरणागती जवळ आलीय.. लवकरच सारे काही मार्गी लागेल .."

"होय गुरूजी .."

मग संध्याकाळी कजरी नदीकिनारी भेटली.. त्याच प्रेम दगडाच्या पाशी. दिलदार हरिनाथ मास्तरांना भेटून आला की नेहमीच खुशीत असायचा तसा होता.

"एवढा उशीर काय रे केलास?"

"तुला माहितीय ना? गुरूजींना भेटायला गेलेलो.."

"तरीही. मी वाट पाहात होते.. "

"गुरूजी भेटले की बरे वाटते. तेवढे एकच कोणी आहेत की ज्यांचा आधार वाटतो. गुरूजी म्हणाले भविष्य उज्ज्वल आहे.."

"तुमचे नाही आचार्य.. माझे भविष्य सांगा .."

"तुझा हात हातात देऊन बसत असशील तर अनंत काळ भविष्य सांगायला तयार आहे मी. आणि चेहरा वाचन ही करेन. पण तुझे ठाऊक नाही, पण माझे भविष्य उज्वल आहे.."

"आणि भैरवलाल ज्योतिषी काय म्हणतात?"

"बाप रे! त्याला बघूनच घाम सुटला मला."

"नि तुला पाहून त्याला!"

"गुरूजी काय म्हणाले?"

"गुरूजी? खूप खूश होते. म्हणाले, चट मंगनी पट ब्याह! लगेच उरकून टाका.."

"चल. गुरूजी असे काही म्हणाले नसणार. तूच बसला आहेस गुडघ्याला बाशिंग बांधून. उतावळा नवरा .."

"मी आणि उतावळा? मग लवकर घरी ये म्हणून मागे कोण लागलेले?"

"मी?"

"नाहीतर मी? पण विचार कर, मी येण्याआधी भैरव तिथे पोहोचला असता तर..?"

"किंवा तू गेल्यावर आला असता तर?"

"काय होणार होते? तू गेली असतीस हजारीमलच्या घरी शेठाणी बनून. कमरेला किल्ल्यांचा जाडजूड जुडगा नि भरलेली तिजोरी. बघ अजून विचार कर.."

"आता परत बोललास तर हा दगड घालेन डोक्यात. पण त्याचा उपयोग नाही. तुझ्या डोक्यात ही तेच दगड भरलेले आहेत. या दगडानी काय होणार?"

"असं म्हणतेस? पण आम्ही गेल्यावर तुझे बाबा काय म्हणाले? जोरका झटका लागला असणार.."

"मला म्हणाले, बेटी सारे काही ठीक होईल. विधिलिखित बदलता येत नाही. मी म्हणाले त्यांना, मी तयार आहे .. तुम्ही अजिबात चिंता करू नका. तुम्ही आचार्य म्हणाले तसेच करा ..!"

" किती साळसूदपणे म्हणाली असशील तू. तशी डांबीसच आहेस तू. आणि नादान .. तुझ्या घरी तुझा हा पराक्रम ठाऊक नाही म्हणून, नाहीतर नादान म्हणायला कोणी धजावणार नाही तुला .."

"शहाणाच आहेस. आणि हे सारे आताच केले नसते तर.. तुझ्याबद्दल घरी काय सांगणार होते मी? यही डाकू मेरा दिलवर है?"

"गुरूजी पण हेच म्हणाले."

"हेच म्हणजे?"

" तू डाकू तो डाकूच राहशील. माझ्या दिलावर डाका घालणारा डाकिया रूपातला दिलवर दिलदार डाकू.."

काही दिवसांतच संतोकसिंगची टोळी समशरेसिंगची टोळी या नावाने शस्त्रे टाकती झाली. शरणागतीची बातमी दूर दूर पसरली. दिलदारवरचा डाकूत्वाचा शिक्का पुसला तर गेला. पुजारीबुवा सगळ्या बातम्या ऐकून होते. अस्वस्थ होते पण त्यांचा इलाजही नव्हता. दिलदारशी लग्न कजरीचे होणार ही काळ्या दगडावरची रेघ होती.

पुढे गहन खलबतं झाली. लीलाच्या केशव अग्रवालने आधी नि त्या नंतर दिलदारने पुजारी बुवांच्या घरी एकामागून एक जाण्याचे ठरले. लीला नि कजरी, पुजारीबुवांच्या दोन्ही पोरी चलाख खऱ्या. आपल्या प्रेमप्रकरणांचा सुगावा लागू न देता आपल्या प्रेमकथेला पूर्णत्वाकडे नेऊ लागल्या. आणि 'होनी को कौन टाल सकता है' म्हणत मौर्यागुरूजी आनंदाने पुढे पाऊल टाकते झाले. आणि गंगेत दोन घोडे न्हाते झाले!

३२.

# सुखांत

काही दिवसातच मंदिरात मंडप घातला गेला.

अगरवाल आणि अगरवाल धान्याचे होलसेल व्यापारी, या दुकानाचे मालक देवचंद अग्रवाल. त्यांचा एकमेव सुपुत्र केशव नि ईश्वरलाल मौर्या गुरूजींची ज्येष्ठ कन्या लीला यांचा विवाह संपन्न झाला. पाठोपाठ संतोकसिंग ठाकूर यांचे पुत्र दिलदारसिंग आणि मौर्यागुरूजींची द्वितीय कन्या कजरी हिचा. अर्थात एकूण परिस्थिती पाहून हा दुसरा विवाह पहिला पार पडल्यावर लावला गेला. अगरवाल व्यापारी म्हणजे गावातील मोठे प्रस्थ. त्यांचे दुकान दोन वेळा संतोकसिंगच्या टोळीने लुटलेले. त्या संतोकसिंग पुत्राशी कजरीचा विवाह एकाच वेळी होणे अशक्य. तेव्हा तडजोड केली गेली. लीलाची बिदाई झाली. तिची दूरची एक बहीण पाठराखीण म्हणून पाठवली गेली. नि त्यानंतर दिलदारसिंग संतोकसिंग ठाकूर समशेरसिंगसह मंदिरात दाखल झाला. मोजून दोन जणांची वरात. त्यात एक स्वतः नवरा मुलगा, घोड्यावरून आलेला! दुसरा अर्थातच समशेर. हरिनाथ गुरूजी मात्र जातीने हजर होते. कजरीबेटीचा विवाह म्हणजे मोठी घटना त्यांच्यासाठी. मौर्यागुरूजी या डाकूविवाहाबद्दल साशंक होते पण आचार्यांचे भविष्यकथन जास्त प्रभावी ठरले. ठरल्याप्रमाणे सारे पार पडले. आचार्य लाल कदाचित येतील असा पुजारीबुवांचा अंदाज होता, तो मात्र फोल ठरला. दिलदार तिथे असताना आचार्य कसे येणार? पण

जी गोष्ट तिथे कजरी, दिलदार, समशेर नि हरिनाथगुरूजींनाच ठाऊक होती, पुजारीबुवांना कुठून माहिती असणार? लग्न लागले, सात फेरे झाले, घरचाच ब्राह्मण त्यामुळे साग्रसंगीत पार पडले. अनिष्ट ग्रहांची छाया कजरीवर पडू नये म्हणून पुजारीबुवांनी पोथ्यापुराणातून वेगवेगळया पूजा धुडांळून त्या ही पार पाडल्या. विवाह सोहळा पार यथासांग पडला. दिलदार नि कजरी सर्वांच्या पाया पडून आशीर्वाद घेते झाले. पुजारीबुवा, रसीलाबेन बरोबर हरिनाथ मास्तरांचे डोळे भरून आले. पुजारीबुबा नि मावशीचे डोळे मुलगी परक्या घरी चालली म्हणून तर होतेच पण कजरीच्या भविष्याबद्दलची साशंकता त्यात जास्त होती. तर मास्तर हरिनाथ कजरी-दिलदार प्रेमकथेचे साक्षीदार .. दिलदारच्या कजरी दर्शनापासून नंतरच्या खटपटी लटपटी आठवून त्यांचे मन नि डोळे भरून येत होते.

बिदाई नंतर कजरीला घेऊन दिलदार मास्तरांच्या घरी आला. त्याला जायला स्वतःचे असे दुसरे घर तरी होतेच कुठे? मास्तरांच्या छोट्याश्या घरात मास्तरांनी जमेल तसे दोघांचे स्वागत केले. दिलदार नि कजरीच्या आयुष्यातील नव्या पर्वाची सुरूवात मास्तरांनी करून दिली. दिलदारला मास्तरांचे ऋण कसे फेडू असे झाले होते. त्याच्या प्रेमकथेला मूर्त रूप आले ते मास्तरांमुळेच. एक दरोडेखोरांची टोळी सन्मार्गी लागली ती ही त्यांच्याच प्रयत्नाने. दिलदारचा एखाद्या भरल्या घरात राहण्याचा हा पहिलाच अनुभव. घर नि त्याची ऊब कधी अनुभवली नव्हती त्याने, आई गेल्यावर असे प्रेम ही अनुभवले नव्हते त्याने. मास्तरांच्यामुळे सारे असे पूर्णत्वाला गेलेले.

दिलदार कजरीची प्रेमकथा एखाद्या लोककथेप्रमाणे सांगितली जाईल.. कजरीची स्थिती वेगळी नव्हतीच. मास्तर नसते तर एखाद्या डाकूंच्या टोळीशी संबंध जोडला जाणे याचा विचार ही ती करू शकली नसती. त्यात मास्तर संतोकसिंगच्या टोळीच्या शरणागतीसाठी कजरीला श्रेय देत होते. मास्तरांची गोष्टच वेगळी .. हरिनाथ मास्तर आपल्या मुलीची घ्यावी तशी कजरीची काळजी घेत होते.

दिलदार आता एकटा होता. संतोकसिंगने त्याचे नाव टाकले असावे.. तो आपल्या निवडणुकीच्या व्यापात नि उपद्व्यापात मग्न होता. विवाहप्रसंगी तर त्याचे येणे अपेक्षित नव्हतेच, पण त्यानंतर ही दिलदारला भेटायला तो आला नव्हता. दिलदारला आता नवीन माणसं जोडण्यापासून सगळी सुरूवात नव्याने करायची होती. मास्तर होते, पण किती दिवस ते त्यांना मदत करणार होते?

मग काही दिवसांतच दोघे तिकडून राजस्थानातील मास्तरांच्या घरी रवाना झाले. मास्तर दोघांबरोबर काही दिवस राहिले. नवविवाहित दांपत्याला नव्याचे नऊ दिवस अनुभवायला मिळत होतेच. घरच्या संपन्नतेतून साध्या आयुष्याकडे कजरीचा प्रवास झालेला तो निखळ प्रेमापोटी. सारे आनंदात नि खुशीने सुरू झाले. दिलदार आपले गृहस्थाश्रमी जीवन जगत होता. कजरी खूश होती. नि त्यामुळे दिलदारही. मास्तरांचे घर फार मोठे नव्हते, पण दोघांसाठी पुरेसे होते. जवळच्या शेतजमिनीवर दिलदार मेहनत करणार होता. असेच काही महिने गेले. हरिनाथ मास्तर एकदा त्यांच्या घरी आले..

"गुरूजी तुम्ही? इतक्या दूर आलात. दमले असाल.."

"हो बेटा. आठवण आली तुमची. राहवले नाही. हा दिलदार तुला परेशान तर करत नाही ना?"

"काय तुम्ही गुरूजी.."

"अरे समशेरची गोष्ट जोरदार पुढे चाललीय. समशेर भेटला तेव्हा सांगत होता."

"काय सांगता गुरूजी?"

"अरे, तुझा आदर्श ठेवलाय पुढे तर पुढेच जाणार ना तो.. दिलदार कामाचे कसं काय?"

"गुरूजी शेतावर जातोय. शिकतोय."

"अरे, माझ्या ओळखीतले एक आहेत, भंवरलाल. त्याची गाठ घालून देतो. तो शिकवेल. शेतीचे तंत्र शिक. मेहनत कर. घाम गाळल्यावाचून यश नाही. आणि गाळलेल्या घामातून एक दाण्यातून हजारो मोत्यांसारखे दाणे पिकवशील, मग बघ कसा आनंदी होशील. आपली जमीन चांगली आहे. एकेकाळी पीक घेतलेय.."

चष्म्याच्या पाठून मास्तरांचे डोळे भरून आल्यासारखे झाले. जुनी आठवण आली असावी काहीतरी.

"आणि तू कजरी बेटी? सुखात आहेस ना? कष्टाची भाजी भाकरी पंचपक्वानाहून गोड लागते.."

"होय गुरूजी. एक गोष्ट विचारायची होती.. दिलदार पण तयार आहे .."

"कशाबद्दल?"

"गुरूजी, मी इथल्या शाळेत शिक्षिकेची नोकरी धरू? पोरांना शिकवेन. थोडी कमाई होईल. नि जीव ही रमेल.."

कजरी म्हणाली नि अनपेक्षितपणे मास्तरांच्या डोळ्यांतून पाणी वाहताना दिलदार नि कजरीने पाहिले.

"काय झाले गुरूजी?"

न राहवून मास्तर म्हणाले, "पोरांनो, या असे जवळ बसा.. इतके दिवस सांगू की नको सांगू विचार करत होतो. आज आलो ते सांगण्यासाठीच."

"काय गुरूजी .."

"अरे दिलदारबेटा .. गोष्ट खूप जुनी आहे. पण कालच घडल्यासारखी डोळ्यांसमोर उभी राहते. हे माझे घर. मास्तरकी होती. नवीन नोकरी. त्यात थोडीफार शेती होती. नव्याने लग्न झालेले. शोभा म्हणजे माझी पत्नी, शाळेत होती शिक्षिका म्हणून इथल्याच.."

"तुमची पत्नी?"

"होय. मग आता कुठे?"

"आमच्या लग्नाला थोडेच महिने झाले असतील. मग घडू नये ते घडले.."

"म्हणजे?"

"त्यावेळी इकडे राजस्थानात डाकूंच्या टोळ्या होत्या. हैदोस नुसता. लूटालूट, अपहरण नि बायकांना पळवणे.. शोभा तेव्हा तीन महिन्यांची गरोदर होती .."

"बाप रे!"

"भररात्री तिला पळवून नेले डाकूंनी. तिला पळवणारी टोळी होती ती.. संतोकसिंगची. त्यावेळी ती टोळी राजस्थानात होती. त्यापाठोपाठ पोलिस अगदी हात धुवून त्यांच्या पाठी लागले. संतोकसिंग पळून गेला.."

"मग पुढे?"

"पुढे? तो इकडे चंबळच्या खोऱ्यात येऊन राहिला असावा इकडे आपले साम्राज्य उभे केले.."

"आणि तुमची पत्नी?"

"कित्येक वर्ष नव्हता पण हल्लीच तिचा पत्ता लागला."

"कुठेत त्या?"

"देवाघरी."

"अरेरे!"

"ती गेली. पण तिची निशाणी सापडली.."

"निशाणी?"

"तिचे नाव शोभा .. दिलदार तीच तुझी आई रे .."

"गुरूजी .."

"आणि संतोकसिंगशी बोललो मी त्यादिवशी .. त्या अपहरणानंतर काही महिन्यातच तिच्यापोटी हा दिलदार जन्मला.. गरोदरपणात पळवून नेलेली माझी शोभा.. जंगलात तुझा जन्म झाला. जंगलातच तू वाढलास. दिलदार, तू माझाच खराखुरा पुत्र.. तुला जंगलात पाहिले .. मातृमुखी तू. तुझी गोष्ट ऐकली नि खात्री पटली. तू माझाच मुलगा.. शोभा खरीखुरी शिक्षिका होती. तिने तुला शिकवले असणार सारे. माणसासारखे कसे बनावे हे त्यातले मुख्य. त्या जंगलात कशी काय राहिली असेल? पण आमच्या प्रेमाची निशाणी तू.. तुझ्यासाठीच बिचारी इकडे अशी राहिली असणार. संतोकसिंग त्या दिवशी आलेला. त्याच्याशी बोललो. तर संतोकसिंगला पटली खात्री.. तू त्याचा नाहीसच म्हटल्यावर त्याने तुझे नावच टाकले.. तसे ते पथ्यावरच पडले. कारण तूच त्याचा मुलगा नाही म्हटल्यावर त्याने

टोळीच्या शरणागतीचा मार्गच पत्करला. नि तू माझा मला परत मिळालास. तुमच्या त्या जंगलातून परत निघालो तेव्हाच मला खात्री पटलेली.. मग कजरीच्या घरी गेलो. मला ठाऊक होते, कजरीच्या हाती सारे काही आहे. तुझ्यासाठी कजरी जीव ओवाळून टाकतेय.. मला शोभाचा ठावठिकाणा असा लागेल असे कधी वाटलेच नव्हते .. आणि तुझा तर अगदीच अनपेक्षित.."

"पण गुरूजी, तुम्ही हे घर सोडून तिकडे गेलात?"

"काय करणार? शोभाच्या आठवणी आहेत या घरात. मला एकट्याने राहवेना, नि साहवेना. मग त्या आठवणी मागे सोडून मी निघून गेलो. फिरत फिरत गावागावात शाळेत शिकवत राहिलो. ही कजरी माझीच विद्यार्थिनी. आता गेली काही वर्षे मी हरिनामपुरात आहे. त्यादिवशी या पोरांनी पळवून नेले. नशीब चांगले माझे. जंगलात महिनाभर राहिलो. दिलदारच्या चांगुलपणाची खात्री झाली. मन भरून आले अगदी. समशेरपण चांगला मुलगा आहे. खरेतर त्यातील कित्येकांना डाकूगिरीहून वेगळे काही असू शकते हेच ठाऊक नाही. त्यांना संधी मिळायला हवी. या दिलदार कजरीच्या प्रेमकथेने सारे कसे जुळून आले. अगदी सगळेच जुळून आले. त्यात मला माझा हा एकुलता दिलदार ही भेटला. तुला ठाऊक आहे, शोभाने ठरवलेले, मुलगा पोटी आला तर त्याचे नाव हरीशरण किंवा हरीवंश ठेवायचे.."

दिलदारच्या डोळ्यांत पाणी भरून आले. आजवर गुरूजी म्हणून हाक मारली तोच आपला खरा पिता. आणि त्या पित्याच्या मायेनेच हे सगळे घडवून आणले. कजरी मिळाली, नवे आयुष्य मिळाले नि प्रत्यक्ष आपल्या खऱ्या पित्याची भेट झाली. पित्याचे प्रेम मिळाले. आजवर टोळीतील कित्येकांना त्याने मगरूरीने वागताना पाहिलेले. त्यातील समशेर गुरूजींच्या मायेने फिरवलेल्या एका हाताने

बदलला. इतरांना अशी माया नि प्रेम काय असते ते ठाऊक असते तर ते ही आतून बदलले असते.. काही न बोलता त्याने आपल्या पित्याला मिठीत घेतले. मास्तरांचा हात त्याच्या पाठीवर फिरत राहिला. मास्तरांचे डोळे भरून आले.. दिलदारचे ही डोळे वाहात होते नि कजरीलाही हे सारे पाहून गहिवरून येत होते. पित्याच्या घरी माया नि प्रेम होते.. तेच या नव्या सासरच्या घरी मिळणार होते. त्या घराच्या भूमीवर त्या तिघांच्या अश्रूंचा जणू अभिषेक घडला..

दिलदार नि कजरीची प्रेमकथा अशी सुफळ संपूर्ण झाली. पुढे दोघेही सुखाने नांदू लागले. परिकथेशी दोघांचाही तसा संबंध लहानपणी आला नसावा, दिलदारचा तर येणे शक्यच नव्हते. पण त्याची गरज तरी काय होती? प्रत्यक्ष एक परिकथाच तर ते जगत होते. पूर्वीच्या कित्येक प्रेमकहाण्या त्यांच्या दु:खद अंतामुळे प्रसिद्ध झाल्या नि वर्षानुवर्षे लोकांना मनामनात घर करून राहिल्या. तशीच ही दिलदार कजरीची प्रेमकहाणी. सुखद अंतामुळे प्रसिद्ध झाली. खरेतर अंत का म्हणावा? दिलदार मेहनतीने हुशार शेतकरी झाला. दिलदारच्या आईची आठवण काढत कजरी शिक्षणाचे व्रत पुढे चालवत राहिली. पुढे संसारवेल बहरली .. हरिनाथ मास्तर कृतकत्य झाले.. आपली पोर एका डाकूपुत्राशी विवाह करूनही सुखात नांदताना पाहून पुजारीबुवांना आचार्यांबद्दल अजूनच आदर वाटायला लागतो. त्यांची वाट ते अधूनमधून बघतात पण देवीच्या आदेशावाचून आचार्य येणार नाहीत इतकेच त्यांना ठाऊक आहे!

चंबळच्या खोऱ्यातील दिलदार कजरीची ही प्रेमकथा! एका डाकूची प्रेमकहाणी म्हणून प्रसिद्ध तर आहेच.

-आणि पुढे ही लोककथांतून सांगितली जाईल ..










डॉ. नितीन मोरे यांची ५५+२ प्रकाशित पुस्तके










डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य

लाडोबा
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
INSTANT कालिदास


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

एका डॉक्टरची कोविडकथा

डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

# चक्रमादित्य भाग १ ते ५




























डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0




HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!


डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी




डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे
आणि


डॉ. नितीन मोरे
ग.आ.च्या(प्रेम)कविता


वाळूतील


राग दरबारी


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच


आधुनिक कहाण्या








डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते


अंजताईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची
'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी
अक्षरे




सुलट
२५८
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे छप्पन्नावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५५६पुस्तके), अनील

वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी (५३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३८), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (४), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)